१५१ इतिहास
म. ग्रं. सं. ठाणें


विषय इतिहास

संग्रहालय क्रमांक १५१

लेखक नाटेकर विष्णु वासुदेव

सन १८९५

पुस्तकाचें नांव हिन्दुस्थान आणि ब्रिटिश वसाहती


आर्तिकमहासागर
आर्तिक महासागर
ग्रीनलंड
उत्तर
अमेरिका
अतलांतिकमहासागर
पासिफिक
महासागर
दक्षिण
अमेरिका
अतलांतिक
महासागर
युरोप
आशिया
आफ्रिका
हिंदी महासागर
आस्ट्रेलिआ
कर्क वृत्त
मकरवृत्त
विषुववृत्त
उत्तरध्रुव वृत्त
इराण
चीन
जपान
पेकिन
बर्लिन
पारिस
इजिप्त
ब्राझिल
पेरू
सेंटहेलेना
केपटाऊन
कपऑफगुडहोप
सेंटपॉल
मारिशस
आम्स्टरडाम
स्पिट्सबर्जेन
नोव्हा झेम्ब्ला
ऐसलंड
अलास्का
सेंटजॉर्जिया
केपहॉर्न
फाकलंडबेटे
स्टेटनबेट
ऑकलंडबेटे
माकेरीबेट
न्यूझीलंड
फिजीबेटे
फिलिपिनबेटे
मेलबोर्न
पनामा
हवाना
झांजिबार
सिकोलिस

১০৮

[library stamp]

# हिंदुस्थान

आणि

# ब्रिटिश वसाहती.

हीं ब्रिटिश लोकांनीं मिळविलीं कशीं

व

हीं ते ताब्यांत कां ठेवितात.

प्रोफेसर सायरिल रानसम, एम. ए.,

ह्यांच्या पुस्तकाच्या आधारानें केलें तें

विष्णु वासुदेव नाटेकर,

हेड मास्तर, शाळा ठाणें नंबर २, ह्यांनीं

ठाणें येथें जगत्समाचार

छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

१८९९

किंमत १ रुपया.

हिंदुस्थान सरकारच्या १८६७ च्या २५ व्या
आक्टाप्रमाणें नोंदून सर्व हक्क स्वाधीन
ठेविले आहेत.

( श्री ५६ १८

# प्रस्तावना.

इंग्लंदांतील लीड्स् नांवाच्या शहरांतील यार्कशायर कॉलेजांतील **प्रोफेसर रानसम, एम्. ए.,** ह्यांनीं त्या शहरांतील मजुरांच्या माहितीसाठीं "**ब्रिटिश वसाहती आणि हिंदुस्थान**" ह्या विषयावर कांहीं व्याख्यानें दिलीं. हीं व्याख्यानें मजुरांसाठीं असल्यामुळें त्यांतील माहिती ठोकळ असणें साहजिकच होतें. शिवाय ती माहिती त्यांनीं फार सुलभ रीतीनें सांगितली होती. इंग्लंदांतील मजुरांसाठीं दिलेली ही माहिती आपल्या देशांतील पुष्कळांस व विशेषेंकरून निवळ मराठी जाणणारांस उपयुक्त व वाचण्यासारखी वाटेल, असें समजून हा प्रयत्न केला आहे. इंग्लंदांत तर ह्या पुस्तकाच्या फार थोड्या अवकाशांत तीन आवृत्ति निघाल्या; ह्यावरून त्या देशांतील लोकांस हा विषय किती पसंत पडला असावा, हें सहज समजेल. शिवाय थोड्याच दिवसांपूर्वीं परलोकवासी झालेले प्रसिद्ध **प्रोफेसर सीली** ह्यांनींहि ह्या पुस्तकाबद्दल आपली संमति व्यक्त केली होती.

**प्रोफेसर रानसम** ह्यांनीं आपल्या पुस्तकाची भाषा व्याख्यानपद्धतीचीच ठेविली आहे; परंतु भाषांतरांत तशी भाषा ठेवणें इष्ट न वाटल्यामुळें बरेच ठिकाणीं आपस जुळण्यासारखे फेरफार केले आहेत; व मूळ

पुस्तकांतील संबंध मराठी वाचकांस समजण्यास अ
आहे असें वाटलें, तेथें स्पष्टीकरणार्थ टिपा दिल्या आहे
ब्रिटिश अमलांतील एकंदर वसाहती व देश हीं प्रारं
एका ठिकाणीं दिलीं आहेत. मूळ पुस्तकांत प्रथ
वसाहतींसंबंधी दोन प्रकरणें असून नंतर हिंदुस्थानासंबं
दोन प्रकरणें आहेत; परंतु हिंदुस्थानासंबंधी प्रकर
वाचकांस विशेष सुलभ व मनोरंजक वाटण्याचा संभ
असल्यामुळें तीं येथें प्रथम दिलीं आहेत; व ह्या फ
काच्या अनुरोधानेंच पुस्तकाच्या नांवांतहि थोडा फर
केला आहे. वसाहतींसंबंधी प्रकरणांचा आपल्य
देशाशीं साक्षात् संबंध नसल्यामुळें तीं वाचकांस विशे
महत्त्वाचीं वाटणार नाहींत; तथापि ज्या ब्रिटिश राष्ट्रां
आपण सांप्रत राहत आहों, त्याचा विस्तार कसकस
होत गेला, व सांप्रत केवढा आहे, ह्याविषयीं थोडी बहु
माहिती सर्वांस असणें आवश्यक आहे, असें कोणीहि
कबूल करील. ह्या वसाहतींसंबंधी प्रकरणांतील पहिल्या
प्रकरणांत इंग्लंदच्या इतिहासाचा पुष्कळ ठिकाणीं सं
आला असल्यामुळें बरेच ठिकाणीं टिपा देऊन तो भ
सुलभ करण्याचा प्रयत्न केला आहे. प्रस्तुत का
इंग्लंदच्या इतिहासाची थोडी बहुत माहिती मरा
वाचकांसहि असणें इष्ट दिसतें; व ट्रेनिंग कॉलेजाच
अभ्यासक्रमांत अलीकडे हा विषय सामील करण्याचा
हेतु हाच असावा.

इंग्रजी पुस्तकाच्या बऱ्याच भागाचें भाषांतर माझे परलोकवासी बंधु ती. रा. रा. रामचंद्र वासुदेव नाटेकर ह्यांनीं केलें होतें; राहिलेल्या भागाचें भाषांतर माझ्या हातून झालें आहे. आधीं मराठी भाषेंत उपयुक्त पुस्तकांची उणीव; व तशांतहि जीं थोडीं बहुत होतात त्यांना वाचकांची उणीव. पुस्तकांची उणीव नाहींशी व्हावी म्हणून आपल्या युनिव्हर्सिटीचे व्हाइस चान्सेलर **डा. रामकृष्ण गोपाळ भांडारकर** ह्यांच्या अध्यक्षतेखालीं थोड्याच दिवसांपूर्वीं "**डेक्कन व्हर्नाक्युलर सोसायटी**" नांवाची संस्था स्थापित झाली आहे. वाचकांची उणीव नाहींशी होण्याचा सुदिन कधीं येईल तो येवो. कित्येक विद्वानांनीं ह्या पुस्तकाचा हस्तलेख वाचून व कित्येकांनीं ह्याचे प्रूफ वाचून जे **अभिप्राय** दिले ते **पुस्तकाच्या शेवटीं छापिले** आहेत. ह्या सर्वांचे व ज्या दुसऱ्या कित्येक मित्रांनीं उपयुक्त सूचना केल्या त्यांचे अत्यन्त आभार मानितों.

पुणें. ता. १।२।९९. **वि. वा. नाटेकर.**
हेडमास्तर, शाळा ठाणें नं. २.

# ब्रिटिश लोकांच्या वसाहती व त्यांच्या ताब्यांतील इतर देश ( मिळालेल्या सनांसह ) हे

## १ युरोप.

जिब्राल्टर ... .... .... १७०४
हेलिगोलंड .... .... ... १८०७
माल्टा व गोझो .... ... १८००

## २ एशिया.

एडन......१८३९ हिंदुस्थान (ब्रह्मदेशासह) १६०० (आरंभ)
सिलोन... १७९६ हॉंगकांग...... १८४२
पूर्वेकडील सामुद्रधुन्यांच्या आसपासच्या वसाहती १७८६
लाबुआन ... ... .... ...१८४६
सैप्रस... ... .... १८७८

## ३ आफ्रिका.

केप कालनी व दक्षिणेकडील इतर वसाहती...... १८०६
सिएरालिओन व पश्चिमेकडील इतर वसाहती...... १६३१
मारिशस व पूर्वेकडील इतर वसाहती... ... १८१०

## ४ अमेरिका.

कानड्याचें राज्य ( ह्यांत क्वीबेक, आंतारिओ, नोवा स्कोशिआ, न्यू ब्रंझ्विक, प्रिन्स एदवर्द अयलंद, मानितोबा, वायव्य कोनांतलि प्रदेश आणि ब्रिटिश कोलंबिया, हे प्रांत येतात. ) ... ... १७६३
न्यू फौंडलंद .......१७१३ हांडुरास .. १७८३
बर्म्युडा बेटें .. ...१६१२ वेस्ट इंडीज बेटें १६५५
ब्रिटिश गियाना ... १८०३ फाकलंद बेटें... १७६५

## ५ ओशिआनिया.

आस्ट्रेलिया ......१७७० तासमानिया... १८०३
न्यू झीलंड ......१८३९ फिजी बेटें .. .... १८७८

# हिंदुस्थान
## आणि
# ब्रिटिश वसाहती.

## प्रकरण पहिलें.

### इंग्रज लोक हिंदुस्थानांत येण्यापूर्वी ह्या देशाची स्थिति कशी होती व येथील मुख्य सत्ता त्यांनीं कशी मिळविली.

विषयांचा अनुक्रम. पृष्ठ.


१. उपोद्घात. .... .... .... १३
२. हिंदुस्थानचा आकार. .... .... १५
३. त्याच्या क्षेत्रफळाचा अजमास. .... १६
४. जाति, भाषा आणि धर्म. .... .... १७
५. ह्या देशावर वारंवार स्वाऱ्या कां झाल्या? २०
६. हिंदूंची ( आर्यांची ) स्वारी. .... २१
७. अफगाण लोकांची स्वारी..... .... २२
८. मोगल लोकांची स्वारी. .... .... २३
९. मोगलांच्या सत्तेचा ऱ्हास..... .... २४
१०. युरोपियन लोकांच्या वसाहतींचा प्रारंभ. २६
११. ईस्त इंडिया कंपनी. .... .... २७

१२. कंपनीचीं आरंभीचीं ठिकाणें. .... २७
१३. हिंदुस्थान जिंकण्याची फ्रेंचांची योजना. २८
१४. इंग्लिश व फ्रेंच ह्यांची चढाओढ. .... ३१
१५. प्लासीची लढाई. .... .... .... ३३
१६. वांदिवाशची लढाई. .... .... ३४
१७. कंपनी बंगाल प्रांताचा राज्यकारभार मिळविते. ३५
१८. कंपनीच्या राज्यकारभाराचा परिणाम..... ३६
१९. कंपनीच्या राज्यव्यवस्थेसंबंधानें पार्लमेंटानें केलेली सुधारणा. .... .... ३८
२०. इंडियन सिव्हिल सर्व्हिस. .... .... ३९
२१. कंपनीच्या लढायांचीं कारणें. .... ४१
२२. लढायांतून इंग्लिशांसच नेहमीं जय कां मिळत गेला? .... .... .... ४४
२३. हिंदुस्थानांतील मोठें बंड. .... .... ४८
२४. बंड मोडलें त्याचा प्रकार. .... .... ४९
२५. कंपनीचा शेवट. .... .... .... ५१
२६. राणी "एंप्रेस" ( बादशाहीण ) असा किताब घेते. .... .... .... ५१
२७. वरील इतिहासाचे मुख्य काळ. ... ... ५२

# प्रकरण दुसरें.

## हिंदुस्थानची हल्लींची स्थिति कशी आहे व हा देश इंग्रज लोक ताब्यांत कां ठेविनात.

१. हिंदुस्थानची लोकसंख्या. .... .... ५५
२. हिंदुस्थानांतील नेटिव्ह संस्थानें. .... ५७
३. हिंदुस्थानची राज्यपद्धति. .... .... ५९
४. ह्या देशांतील सैन्य. ... .... ६५
५. येथील जमेच्या बाबी. .... .... ६६
६. देशाचें संरक्षण. .... .... .... ६७
७. ह्या संरक्षणासंबंधानें अफगाणिस्थानचें महत्त्व. ६८
८. ह्याच संबंधानें सुएझच्या कालव्याचें महत्त्व. ६९
९. हिंदुस्थानापासून इंग्लंदास फायदे काय आहेत. ७०
१०. हिंदुस्थानच्या व्यापाराची वृद्धि. .... ७३
११. हल्लींचा येथील व्यापार. .... .... ७४
१२. इंग्लंदाहून येथें येणारे व्यापाराचे जिन्नस. ७४
१३. येथून इंग्लंदांत जाणारे मुख्य जिन्नस. ७६
१४. हिंदुस्थानच्या स्थितीची सुधारणा. .... ७७
१५. पाट बंधाऱ्यांची आवश्यकता. .... ७९
१६. ह्या संबंधानें इजिप्तचें उदाहरण. .... ७९
१७. हिंदुस्थानांतील रेल्वे.... .... ८१
१८. सुएझ कालव्यांतून हिंदुस्थानशीं व्यापार. ८५

१९. हिंदुस्थान इंग्लिशांच्या ताब्यांतून गेल्यानें होणारे तोटे .... .... ८६
२० ह्या देशासंबंधानें इंग्लिशांचें नीतिदृष्ट्या कर्तव्य. ८८
२१ जगाच्या शांततेवर ब्रिटिश राष्ट्रानें होणारे परिणाम. .... .... .... ९१

---

# प्रकरण तिसरें.

## ब्रिटिश वसाहतींची पूर्वस्थिति कशी होती व त्या त्यांनीं कशा मिळविल्या.

१. उपोद्घात. .... .... .... ९३
२ इंग्रजांच्या वसाहतीसंबंधी राज्याचा प्रारंभ. १०१
३. अमेरिकेंतील वसाहती. .... .... १०४
४. लढाई करून मिळविलेल्या वसाहती. १०८
५. डच लोकांबरोबर वसाहतीसंबंधानें युद्धें. ११०
६. फ्रेंच लोकांबरोबर वसाहतीसंबंधानें युद्धें. ११२
७. राष्ट्राचें कर्ज ही वसाहती मिळविण्यास पडलेली किंमत होय. .... .... ११८
८ मार्लबरोनें केलेल्या युद्धामुळें मिळालेल्या वसाहती. .... .... १२१
९. सात वर्षांच्या युद्धामुळें मिळालेल्या वसाहती. .... .... १२३

१० अमेरिकेंतील वसाहती (युनायटेड स्टेट्स) इंग्रजांच्या हातून जातात. .... १२६
११. प्रजासत्ताक फ्रेंच राष्ट्राशीं युद्ध केल्यामुळें मिळालेल्या वसाहती. .... १२९
१२. नेपोलियनाबरोबर युद्ध केल्यामुळें मिळालेल्या वसाहती.. .... .... १३०
१३. १८१५ नंतर मिळालेल्या वसाहती. १३२
१४. ह्या वेळापर्यंतच्या हकीगतीचा सारांश. १३३

# प्रकरण चौथें.

## ब्रिटिश वसाहतींची सांप्रतची स्थिति व त्या त्यांनीं आपल्या ताब्यांत कां ठेविल्या पाहिजेत.

१. ब्रिटिश लोकांच्या हल्लींच्या वसाहती. १३६
२. वसाहतींसंबंधी राज्याचा विस्तार. ... १३८
३. त्याची लोकसंख्या. ... .... १३९
४. वसाहतींतील उत्पन्न. ... ... १४१
५. मूळ देशाचा वसाहतींशीं संबंध. ... १४२
६. मागील काळांत झालेले वसाहतींचे उपयोग. १४७
७. कैद्यांना पाठविण्याकडे त्यांचा उपयोग. १४८
८. हद्दपार केलेल्या लोकांस राहण्यास त्यांचा उपयोग. .... .... १४८

९. लष्करी कामाकडे त्यांचा उपयोग. .... १४९
१०. खंडणी वगैरे संबंधानें त्यांचा उपयोग. १५०
११. वसाहतींचे हल्लींचे उपयोग. ... १५०
१२. वसाहतींबरोबरच्या ब्रिटिश व्यापाराचें महत्त्व. १५१
१३. त्यांच्या बरोबरच्या व्यापाराची वृद्धि. १५२
१४. ब्रिटिश पदार्थांचा वसाहतींत जो खप होतो त्याचें महत्त्व. ... .. १५३
१५. इतर राष्ट्रांनीं आपापल्या व्यापाराचें संगोपन केलें असतां त्यापासून ब्रिटिश राष्ट्रावर होणारा परिणाम. .. १५५
१६. वाढत चाललेल्या इंग्लिश लोकसमूहाला राहण्याकडे वसाहतींचा उपयोग. ··· १५९
१७. बाह्य प्रदेशीं जाणाऱ्या लोकांनीं इतर देशांत जाऊन राहण्यापेक्षां ब्रिटिश वसाहतींतच राहण्यास जावें, ह्या गोष्टीचें महत्त्व ··· १६१
१८. वसाहतींमुळें इंग्लिशांचें सामर्थ्य वाढतें. १६३
१९. वसाहतींपासून त्यांना लष्करी मदत होते. १६५
२०. वसाहतींबरोबरचा इंग्लिशांचा व्यापार बुडाला असतां होणारे परिणाम. .... .... १६६
२१. वसाहती निरंतर ताब्यांत कशा राखाव्या. १६७

# हिंदुस्थान आणि ब्रिटिश वसाहती.

## प्रकरण पहिलें.

### इंग्रज लोक हिंदुस्थानांत येण्यापूर्वी ह्या देशाची स्थिति कशी होती व येथील मुख्यसत्ता त्यांनीं कशी मिळविली.

उपोद्घात.

लहानशा दोन बेटांतील लोकांनीं, आपल्या बेटांच्या ११ पट ज्या द्वीपकल्पाचें क्षेत्रफळ, आणि आपल्या बेटांतील लोकसंख्येच्या ७ पट जेथील लोकसंख्या, असें एक मोठें द्वीपकल्प जिंकिलें; व सरासरीनें दर २००० लोकसंख्येस १ शिपाई ह्या प्रमाणानें सैन्य ठेवून तें द्वीपकल्प त्यांनीं आपल्या ताब्यांत ठेविलें; असें जर कोणीं सांगितलें तर त्या लोकांच्या धारिष्टाचें कोणालाहि आश्चर्य वाटणें साहजिक आहे. त्या द्वीपकल्पाची हवा अशी कांहीं चमत्कारिक होती कीं, तद्देशीय लोकांच्या मदतीशिवाय ह्या जिंकणाऱ्या लोकांना तेथें राहतांच आलें नसतें; म्हणून तद्देशीय

लोकांनीं, ह्या लोकांना अगदीं मदत करावयाची नाहीं, इतका नुसता कट केला असता, तरी तेवढ्यानेंच ह्या लोकांना तेथें राहणें अशक्य झालें असतें. अशी वस्तुस्थिति असतांहि त्यांनीं तें मोठें द्वीपकल्प घेतलें, हें ऐकून तर अधिकच आश्चर्य वाटेल. असा वास्तविक प्रकार असून त्या बेटांतील लोकांना हें पराक्रमाचें कृत्य वाटत नसून ही एक साहजिक रीतीनेंच घडलेली गोष्ट वाटत होती, व म्हणून ह्या द्वीपकल्पासंबंधी प्रकरणांत ते फार थोडें मन घालीत असत, हें ऐकून तर पराकाष्ठेचें आश्चर्य वाटेल.

तथापि ज्या कांहीं गोष्टी वर सांगितल्या आहेत, त्या अक्षरशः खऱ्या आहेत. **ग्रेट ब्रिटन व आयर्लंड** हींच तीं दोन बेटें; आणि हिंदुस्थान हेंच तें द्वीपकल्प. ब्रिटिश बेटांच्या ११ पट ह्याचें क्षेत्रफळ असून ७ पट लो. सं. आहे. तसेंच, दर दोन हजारीं १ शिपाई, ह्याच प्रमाणानें ह्या महाद्वीपांत त्यांनीं सैन्य ठेविलें आहे. हा सर्व प्रकार आश्चर्य वाटण्याजोगा नाहीं काय? आणि सर्व जगाच्याहि प्राचीन इतिहासांत ज्या स्थितीला साम्य सांपडावयाचें नाहीं, अशा प्रकारची ही स्थिति इंग्लिशांस कशी व कां प्राप्त झाली, ह्याचा विचार करणें इष्ट नाहीं काय?

प्रथमतः हिंदुस्थानच्या आकाराविषयीं विचार करूं. एशिया खंडाच्या दक्षिण किनाऱ्यावरील एका द्वीपकल्पाला

हिंदुस्थानचा आकार. हिंदुस्थान हें नांव आहे. ह्याच्या पूर्व पश्चिम दोन बाजू दक्षिणेकडे एकमेकींस एका बिंदूंत येऊन मिळतात, व ह्यांच्या योगानें जें भूशिर होतें त्याला केप कामोरिन म्हणतात. उत्तरेकडे जेथें त्या बाजू संपल्या आहेत त्या ठिकाणीं पर्वतांची एक अवाढव्य रांग आहे. हे पर्वत पूर्वेकडून पश्चिमेकडे वक्ररेषेनें गेले आहेत; व एशिया खंडांतील इतर देशांपासून हिंदुस्थानास निराळें करण्यास हे एक प्रकारची भिंतच झाले आहेत. ह्या पर्वतांच्या ओळींस हिमालय पर्वत म्हणतात. हिंदुस्थानचे स्वाभाविकपणें ३ भाग झाले आहेत. सिंधु आणि गंगा ह्या दोन मोठ्या नद्यांचे उगम हिमालयांत असून पहिली आरबी समुद्रास व दुसरी बंगालच्या उपसागरास मिळते. सिंधु व तिला मिळणाऱ्या नद्या ह्यांच्या योगानें ज्या प्रदेशास पाणी मिळतें तो प्रदेश पहिल्या भागांत येतो; आणि गंगा व तिला मिळणाऱ्या नद्या ह्यांच्या योगानें ज्या प्रदेशास पाणी मिळतें तो दुसऱ्या भागांत येतो. ३ रा भाग त्रिकोणाकृति असून त्याच्या दोन बाजूंस समुद्र आहेत; आणि सिंधु नदीच्या मुखाच्या किंचित् दक्षिणेपासून त्याच्या समोरच्या किनाऱ्यापर्यंत रेषा ओढिली असतां त्या त्रिकोणाचा पाया निघतो. तेव्हां हे ३ भाग म्हणजे, सिंधूच्या कांठचा प्रदेश, गंगेच्या कांठचा प्रदेश, व "डेक्कन" ( दक्षिण ) हे होत.

सिंधूच्या काठच्या प्रदेशांत बहुतेक पंजाब येतो; गंगेच्या काठच्या प्रदेशांत बंगाल येतो; आणि डेक्कनमध्यें दक्षिण हिंदुस्थानांतील प्रदेश म्हणजे नर्मदेच्या दक्षिणेकडील सर्व प्रदेश येतो. हिंदुस्थानांत अति महत्त्वाचें शहर दिल्ली. गंगेस मिळणारी जी यमुना नदी तिच्या कांठीं हें शहर असून गंगेचें मुख व सिंधूचें मुख ह्या दोहोंपासून सरासरी सारख्या अंतरावर मध्यावर आहे. दिल्ली शहर कोठें वसलें आहे ती जागा व हे ३ भाग जर लक्षांत ठेविले, तर हिंदुस्थानच्या इतिहासाविषयीं जें कांहीं पुढें सांगावयाचें आहे तें सहज समजेल. हिंदुस्थानची रचना कशी काय आहे त्याविषयीं आतां विचार करूं. साधारणपणें पाहिलें असतां युरोपांतल्यापेक्षां एशिया खंडांतील प्रत्येक गोष्ट फार अवाढव्य आहे. आल्प्स् पर्वत जितका उंच आहे त्याच्या दुप्पट हिमालय पर्वत उंच आहे. हिंदुस्थानांतील नद्याहि युरोपांतल्या नद्यांपेक्षां अधिक लांब रुंद आहेत; व मैदानें जास्त विस्तीर्ण आहेत. एशिया खंडांतील इतर

त्याच्या क्षेत्रफळाचा अजमास.

कित्येक देशांशीं तुलना करून पाहिलें असतां हिंदुस्थान देश अगदीं लहान दिसतो; तरी युरोपाशीं तुलना केली असतां तो फार विस्तीर्ण देश आहे, असें ध्यानांत येईल. फार कशाला, युरोप खंडांतून रशिया गाळला असतां जो कांहीं प्रदेश उरेल, तेवढाच आकार अजमासें हिंदुस्थानाचा आहे. ह्यासाठीं फारच क्षुल्लक अशा ग्रीस, स्वित्झरलंद, पोर्तु-

गाल, नार्वे व स्वीडन ह्यांसारख्या देशांची गोष्ट सोडू-नच द्या; परंतु युरोपांतील मोठालीं सर्व राष्ट्रें—ग्रेट ब्रिटन व आयर्लंड, फ्रान्स, जर्मनी, स्पेन, ऑस्ट्रिया व तुर्कस्थान—हीं एकत्र केलीं असतां जो प्रदेश होईल, त्यापेक्षांहि हिंदुस्थान देश मोठा आहे, असें समजलें पाहिजे. तेव्हां हिंदुस्थानावरील इंग्लिशांची राज्यसत्ता म्हणजे रशिया-शिवाय राहिलेल्या युरोपावरील त्यांची राज्यसत्ता असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं.

आतां हिंदुस्थान देश आकारानें जरी जवळ जवळ युरोपाइतका आहे, तरी इतर बाबतींत युरोपाहून फार भिन्न आहे. फ्रान्स, जर्मनी व स्पेन ह्यांसारखे पुष्कळ देश युरोपांत आहेत. ह्या प्रत्येकांत जे लोक राहतात ते सर्व एकच भाषा बोलतात; आणि त्यांच्या रितीभाती सारख्या असून धर्महि बहुतांशीं एकच आहे. जर्मनी किंवा फ्रान्स ह्यांतील प्रत्येक मनुष्याच्या ठिकाणीं स्वदे-शप्रीति असते; जरूर पडल्यास स्वदेशासाठीं लढण्यास तो तयार असतो; आणि रशियन लोक किंवा स्पेन देशांतील लोक ह्यांना स्वदेशावर स्वारी करण्यास मदत करण्याचें त्याच्या कधीं स्वप्नींहि येत नाहीं.

हिंदुस्थानांत अशा प्रकारची स्थिति आढळावयाची नाहीं. येथील स्थिति कशी आहे ह्याची कल्पना होण्यास

**जाति, भाषा आणि धर्म.**

अगदीं साधें उदाहरण घेतलें पाहिजे. सर्व युरोप खंडास एकाएकीं मोठा थोरला धक्का बसला,

व त्यामुळें सर्व देश, लोक भाषा व धर्म ह्यांची निरनिराळ्या भागांत कमजास्त प्रमाणानें अशी कांहीं गुंतागुंत झाली कीं, ती सोडवितां म्हणून यावयाचीच नाहीं; असा प्रकार घडला असतां युरोप खंडाची जी स्थिति होईल तिची कल्पना करा, आणि तशीच सांप्रत हिंदुस्थानची स्थिति आहे, असें समजा. हिंदु, मुसलमान, बुद्ध, शिख, ख्रिस्ती, पारशी वगैरे भिन्न जातींचे व धर्मांचे लोक ह्या देशांत एकमेकांशेजारीं राहत आहेत. तसेंच सर्व युरोपखंडांत जितक्या प्रकारच्या भाषा चालतात त्यांहून अधिक प्रकारच्या भाषा हिंदुस्थानांतील एकाच रस्त्यानें जाणारे येणारे लोक बोलतात, असें दिसून येईल. फ्रेंच व जर्मन ह्या लोकांत जसा अत्यन्त द्वेष आहे, तसा जातिद्वेष हिंदुस्थानांतील भिन्न भिन्न जातींच्या लोकांत आहे; व त्या लोकांच्या हरहमेष गांठी पडत आहेत. हिंदुस्थानांतील रहिवाशांमध्यें अति मोठी संख्या *हिंदूंची; पण त्यांच्यांत देखील अनेक जातिभेद आहेत; व ह्या जातिभेदांमुळें कित्येक धंदे पिढीजाद होऊन बसले आहेत. ह्या निरनिराळ्या जातीं

*सन १८९१ तील खानेसुमारीप्रमाणें हिंदुस्थानची एकंदर लोकसंख्या सुमारें २८॥। कोटि असून मुख्य मुख्य जातींची पुढें लिहिल्याप्रमाणें आहे:—हिंदु २०॥। कोटि; मुसलमान ५॥। कोटि; बुद्ध ७० लक्ष; शिख १९ लक्ष; जैन १४ लक्ष; पारशी ८९ हजार; इस्रायल १७ हजार; आणि ख्रिश्चन २२॥। लक्ष.

तील लोक एकमेकांचा द्वेष करितात, व एकमेकांस तुच्छ मानितात. कुणवी वगैरे हलक्या जातींतील मनुष्य ज्यांतलें पाणी प्याला आहे, अशा उष्टया भांड्यास ब्राह्मण किंवा क्षत्रिय वगैरे उच्च जातींतील एखाद्या मनुष्याचा स्पर्श झाला तर तो आपणास विटाळ झाला असें समजतो. मुसलमानांत देखील ह्याप्रमाणें धर्मसंबंधी मोठाले भेद आहेत; आणि जात, भाषा व धर्म हीं तिन्ही ज्यांचीं एकच आहेत, असा हिंदुस्थानांतल्या लोकांचा एक देखील महत्त्वाचा वर्ग सांपडणार नाहीं.

अशी ही विलक्षण वस्तुस्थिति कशानें घडून आली, असा प्रश्न सहजच उद्भवतो. ह्याचें उत्तरहि स्पष्ट आहे. निरनिराळ्या राष्ट्रांनीं ह्या देशावर अनेक वेळां स्वाऱ्या करून हा देश जिंकिला, व त्यामुळेंच देशाची अशी स्थिति झाली आहे. तसेंच ह्या स्वाऱ्यांमुळें देशाचें फारच नुकसान झालें आहे. हिंदुस्थानांतील मूळचे लोक, त्यांना ज्यांनीं प्रथम जिंकिलें ते लोक, त्यांनाहि पुन्हा दुसऱ्या लोकांनीं येऊन जिंकिलें ते लोक, अशी ही मोठी परंपरा असून हे लोक हिंदुस्थानांत राहत गेल्यामुळें अनेक भाषा, अनेक जाति आणि अनेक धर्म देशांत उत्पन्न होणें साहजिकच आहे. ह्यापुढें दुसरा असा प्रश्न उत्पन्न होतो कीं, हिंदुस्थानावर अनेक स्वाऱ्या कां झाल्या ?

हिमालय पर्वताच्या योगानें हिंदुस्थान देश ज्या देशांपासून निराळा झाला आहे, त्या देशांशीं ह्याची

ह्या देशावर वारंवार स्वाऱ्या कां झाल्या? तुलना केली असतां हा देश एक उत्कृष्ट बगीचाच आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सिंधु व गंगा ह्यांच्या पाण्यामुळें अतिशय सुपीक झालेलीं मैदानें कोणीकडे, व हिमालय पर्वताच्या उत्तरेस व पश्चिमेस असणारे उंच डोंगरसपाटीच्या जमिनीचे नापीक प्रदेश कोणीकडे? ह्या दोहों प्रकारच्या प्रदेशांच्या सुपीकपणांत विलक्षण तफावत आहे. म्हणून त्या नापीक प्रदेशांत राहणाऱ्या लोकांचे थव्यांचे थवे हिमालयामधील खिंडींतून, दूध व मध ह्यांचा प्रवाह ज्यांतून वाहत आहे अशा ह्या हिंदुस्थानांतील फार सुपीक प्रदेशांत येण्याविषयीं हजारों वर्षें उत्कंठित असत, ह्यांत नवल तें काय? उद्यां रशियाच्या मनांत जर हिंदुस्थानावर स्वारी करावयाचें आलें तर त्यांतहि कांहीं विशेष नाहीं. कारण मध्य एशियेंतील लोकांनीं आजपर्यंत ज्या कारणानें अनेक वेळां स्वाऱ्या केल्या, तेंच कारण रशियालाहि स्वारी करण्याविषयीं मोह उत्पन्न करण्यास पुरे आहे. असें झालें असतां ज्या अनिवार मोहामुळें मध्य एशियेंतील डोंगरी लोकांनीं हिंदुस्थानांतील लोकांस लुटून स्वतःस श्रीमंत केलें, त्याच अनिवार मोहाला रशियन लोकहि वश झाले, एवढेंच काय तें होईल. तसेंच रशियन आले तरी तेहि मध्य एशियेंतील लोक ज्या मार्गानें आले होते त्याच मार्गानें येणार.

हिमालय पर्वत हिंदुस्थानाला गांवकुसाप्रमाणें आहे खरा,

परंतु त्यांतून जाण्या येण्यास खिंडी नसत्या तर तो फार फायदेशीर झाला असता. नकाशाकडे थोडेसें लक्ष दिल्यास असें दिसून येईल कीं, सिंधु नदीस येऊन मिळणाऱ्या एका नदीचा उगम अफगाणिस्थानांत असून खैबर खिंडीच्या रस्त्यानें पर्वतामधून ती हिंदुस्थानांत वाहत येते. ज्या खिंडींतून स्वाऱ्या करणारे लोक असंख्य वेळां आले आहेत ती हीच खैबर खिंड होय. सिंधु नदीस मिळणाऱ्या ह्या नदीवरच अफगाणिस्थानची राजधानी जें काबूल शहर तें वसलेलें आहे. काबूलच्या कांहीं पश्चिमेकडे हिरात हें शहर आहे. म्हणून हिरात ज्याच्या कबज्यांत आहे त्याला काबुलास येण्यास कांहींच अडथळा राहिला नाहीं. ह्याप्रमाणें तो काबूल येथें येऊन दाखल झाला म्हणजे, हिंदुस्थानावर स्वाऱ्या करणारे लोक ज्या नदीच्या कांठांनीं ह्या देशांत शिरले होते, त्या नदीशीं तो येऊन ठेपला, असें होईल.

ह्या रस्त्यानेंच एकामागून एक विजयी लोक हिंदुस्थानांत आले असून त्यांची लांबच लांब मालिका लागून गेली आहे. ती फार मोठी असून इतकी प्राचीन काळापर्यंत पोहोंचली आहे कीं, तिचा पाठीमागें तल्लास लावीत जाण्याचा प्रयत्न करूं लागलों, तर आपली कल्पना-शक्ति गुंग होऊन जाईल. तथापि हिंदु ( आर्य ), अफगाण व मोगल ह्या ३ लोकांनीं हिंदुस्थानावर ज्या मोठा-

हिंदूंची ( आर्यांची ) स्वारी.

ह्या स्वाऱ्या केल्या तेवढ्यांबद्दलच तूर्त विचार करावयाचा आहे. हिंदूंची स्वारी इतक्या प्राचीनकाळीं झाली कीं, त्या स्वारीच्या संबंधानें ध्यानांत ठेवण्यासारख्या गोष्टींचा लेखी इतिहास उपलब्ध नाहीं; परंतु इतकें मात्र ठाऊक आहे कीं, हिंदु लोक मध्य एशियांतून हिमालयाच्या खिंडींतून ह्या देशांत आले; आणि त्या आर्य लोकांनीं येथील मूळच्या रहिवाशांस पहाडांत व जंगलांत हाकून देऊन त्यांचे सुपीक प्रदेश बळकाविले.

नंतर ह्या देशांत त्यांनीं आपल्या मर्जीप्रमाणें सुधारणा सुरू केली. युरोप खंड ज्या काळीं रानटी स्थितींत होतें, त्या काळीं हिंदुस्थान देश पुष्कळ रीतीनें हल्लीं इतका सुधारलेला होता. तत्वज्ञान, कविता, कला, शिल्पशास्त्र, व उत्तम प्रकारच्या व्यवस्थित मंडळ्या हीं त्या काळीं ह्या देशांत होतीं. परंतु साधारण नियमाप्रमाणेंच पुढें ह्या देशाची स्थिति झाली. हें सुधारलेलें राष्ट्र निर्बळ झालें; आणि रानटी लोकांच्या टोळ्यांपासून स्वसंरक्षण करण्याचें सामर्थ्य ह्या राष्ट्राच्या आंगीं राहिलें नाहीं. ह्या हिंदु लोकांनीं ज्याप्रमाणें स्वाऱ्या केल्या, त्याप्रमाणें स्वाऱ्या करण्यास ते रानटी लोक टपूनच बसले होते. हे रानटी लोक म्हणजे अफगाण लोक होत. विल्यम दि काकरर ह्यानें ज्या सुमारास इंग्लंदावर स्वारी केली, त्याच ( इ. स. १००० च्या ) सुमारास अफगाण लोकांनीं हिंदुस्थानावर हल्ला केला. अफगाण लोक मुसलमान होते, व

अफगाण लोकांची स्वारी.

ते ख्रिस्ती लोकांना जितकें पाण्यांत पाहतात तितकेंच हिंदूनाहि पाण्यांत पाहत असत. स्वधर्मप्रसाराच्या वेडानें अफगाण लोकांस उत्तेजन आलें होतें; व हिंदुस्थानावर स्वारी केल्यानें आपणांस पुष्कळ लूट मिळेल, असाहि मोह त्यांस उत्पन्न झाला होता. म्हणून गिझनीच्या महंमुदास पुढारी करून ते झपाट्यानें हिंदु लोकांवर सरसावून आले. हिंदूंचें व अफगाणांचें युद्ध मोठ्या निकराचें झालें, परंतु अखेरीस अफगाणांस जय मिळाला, व त्यांनीं हळूहळू हिंदुस्थानांत मुसलमानी राज्यें स्थापिलीं; आणि बहुतेक ठिकाणीं त्यांनीं हिंदूंस दास्यत्वाच्या स्थितीस नेऊन पोहोंचविलें. ही दुसऱ्या स्वारीची हकीगत झाली.

मोगल लोकांची स्वारी.

परंतु अफगाण लोकांच्या हातीं फार काळपर्यंत शांततेनें सत्ता राहिली नाहीं. इंग्लंदांत ८ वा हेन्री राजा राज्य करीत होता त्या सुमारास (इ. स. १५०० च्या सुमारास ) मध्य एशियांतून मुसलमान लोकांची एक नवी टोळी हिमालय पर्वतांतून हिंदुस्थानाकडे शिरकाव करूं लागली, व हिनें अफगाण लोकांच्या फौजेच्या पिछाडीवर हल्ला केला. हे नवीन आलेले लोक मोगल होत. ह्यांच्या पूर्वीं आलेल्या अफगाण लोकांपेक्षां हे जास्त बळकट होते; व कालेंकरून त्यांनीं अफगाण लोकांस जिंकिलें; आणि दिल्ली शहर बळकावून त्या ठिकाणीं आपल्या पुढाऱ्यास "मोठा मोगल" (ग्रेट मोगल ) ही संज्ञा देऊन त्याची स्थापना केली.

हिंदुस्थानचे आरंभींचे मोगल बादशाह फार हुशार होते. ८ वा हेन्री व आन राणी ह्यांच्या कारकीर्दीच्या दरम्यान, म्हणजे १६ व १७ ह्या शतकांत त्यांनीं हिंदु लोकांस व अफगाण लोकांस जिंकून टाकिलें; आणि कांहीं काळपर्यंत बहुतेक हिंदुस्थान देश आपल्या ताब्यांत आणिला. ह्याप्रमाणें हिंदु, अफगाण व मोगल ह्या तिघांच्याच स्वाऱ्या विशेषेंकरून लक्षांत ठेवण्यासारख्या आहेत.

मोगलांच्या सत्तेचा ऱ्हास.

आतां दिल्लीच्या मोगल बादशहांच्या अमलाखालीं हिंदुस्थान आलें नाहीं तोंच त्यांच्या अमलांतील मुलूख कमी कमी होत चालला. ह्याचीं कारणें २ होतीं:—१ लें कारण, मोगलांचा अंमल पिढीजाद जुलमीच होता, हें होय. ज्या ठिकाणीं निरुद्योगानें व विलासानें आयुष्य घालविण्यास फार मोठा मोह उत्पन्न होतो, अशा एशिया खंडांतील देशांत पिढीजाद जुलमी अमलांत सार्वभौम राजांचा स्वभाव हमेषा बिघडतो. पहिला राजा नेहमी सामर्थ्यवान् असलाच पाहिजे; कारण तो असा नसेल तर त्याला राज्य मिळवितांच कसें येईल? त्या राजाचा मुलगाहि बहुधा पराक्रमी निघतो; परंतु राजवाड्यांत जन्मलेला, दासदासींनीं जिवापाड श्रम घेऊन वाढविलेला व हरएक प्रकारच्या विलासाची सवय लागलेला असा नातू अथवा पणतू अतिशय बिघडतो, व फार दुर्बळ

निघतो. अशा प्रकारचा पुरुष गादीवर आला म्हणजे मुख्य सत्तेचा अर्थात् ऱ्हास होऊं लागतो. अशीच स्थिति मोगल घराण्याची झाली, व हेंच त्याच्या ऱ्हासाचें पहिलें कारण झालें.

२ रें कारण, मोगलांच्या राज्याचा विस्तार इतका मोठा झाला कीं, एका मनुष्यास त्याजवर अंमल करितां येईना; म्हणून ठिकठिकाणीं सुभेदार नेमून त्या त्या ठिकाणचा अधिकार त्यांच्या हवालीं करणें प्राप्त झालें. मोगलांच्या वेळीं सुभेदारांस नबाब किंवा राजा म्हणत. आतां वर ज्या प्रकारच्या विलासी बादशहाचें वर्णन केलें आहे, तशा प्रकारचे बादशाह मोगलांच्या गादीवर आले; तेव्हां हे सुभेदार त्यांचा अधिकार तुच्छ मानूं लागले. बादशहांस न विचारितां त्यांनीं आपले अधिकार आपल्या मुलांस दिले, मनास मानेल त्याप्रमाणें वागूं लागले, व स्वतंत्र राजे बनण्यासाठीं त्यांनीं हरएक प्रकारचा प्रयत्न केला. शेवटीं परिणाम असा झाला कीं, मोगल बादशाह दुर्बळ होऊन हे सुभेदार किंवा नबाबच प्रबळ झाले.

असे प्रकार घडले तेव्हां जुन्या हिंदु सरदारांपैकीं कांहीं सरदार आपलीं डोकीं वर काढूं लागले; आणि नबाबांचा पक्ष किंवा बादशहांचा पक्ष ह्यांपैकीं ज्या प्रसंगीं जो आपणांस फायदेशीर दिसेल तो धरून ते हळू हळू बहुतेक स्वतंत्र होत चालले. अशा प्रकारें मोगलां-

च्या सत्तेचा ऱ्हास झाल्यामुळें सर्वत्र अव्यवस्था होणें साहजिकच होतें. राज्य चालविणारे सर्व आपापसांत भांडूं लागले तर चांगली राज्यव्यवस्था चालणें अशक्यच आहे; म्हणून दरोडखोरांच्या--पेंढाऱ्यांच्या—टोळ्या उद्भवल्या; व त्यांचे जे पुढारी होते त्यांनीं आपणांस प्रत्यक्ष स्वतंत्र राजे करून घेतलें; आणि मोंगल बादशाह व त्यांचे नबाब ह्या दोघांच्याहि सत्तेस ते तृणवत् मानूं लागले. ह्या सर्व गोष्टींचा परिणाम असा झाला कीं, हिंदुस्थानांत झपाट्यानें झोटिंग पादशाही सुरू झाली; व्यापार मंदावला; व धंदा काय तो शिपायगिरीचा राहिला. हे शिपाई लोक पगार घेऊन, ही नाहींतर ती, कोणती तरी बाजू धरून लढाई करीत असत.

अशा ह्या अव्यवस्थित स्थितीचा ज्यांच्यावर वाईट परिणाम व्हावयाचा असे कित्येक लोक त्या वेळीं हिंदुस्थानांत होते. हे युरोपियन व्यापारी होत. मोंगलांच्या पहिल्या स्वारीच्या सुमारास केप आफ गुड होपास वळसा घालून त्यांनीं हिंदुस्थानास येण्याचा रस्ता शोधून काढिला होता; व व्यापारासाठीं हिंदुस्थानांतील समुद्र किनारच्या गांवांतून ह्यांनीं वखारी घातल्या होत्या. पोर्तुगीज, डच, इंग्लिश व फ्रेंच अशा क्रमानचें हे लोक हिंदुस्थानांत आले. जे इंग्लिश लोक प्रथम आले, ते ईस्त इंडिया कंपनीपैकीं इसम होते. हल्लीं जशा रेलवे कंपन्या आहेत, तशाच प्रकारची

युरोपियन लोकांच्या वसाहतींचा आरंभ.

ईस्त इंदिया कंपनी ही एक कंपनी होती. हीमध्यें अनेक भागीदार होते; व कामाच्या व्यवस्थे-करितां ते आपल्यांतीलच कांहींजणांस निवडीत असत; त्यांना दायरेक्तर्स म्हणत असत. एलिझाबेथ राणीच्या मरणापूर्वी थोडेच दिवस म्हणजे इ. स. १६००त ही कंपनी स्थापित झाली होती; व इंग्लिश सरकाराकडून हिला व्यापार करण्याविषयीं सनद मिळाली होती.

ईस्त इंदिया कंपनी.

ह्या कंपनीनें प्रथमतः इ. स. १६११त सुरत येथें वखार घातली. नंतर १६३९त मद्रास येथें दुसरी वखार घातली. हीं दोन्ही ठिकाणें दक्षिण हिंदुस्थानांत असून पहिलें पश्चिम किनाऱ्यावर व दुसरें पूर्व किनाऱ्यावर आहे. ज्या जमिनीवर त्यांनीं आपल्या वखारी बांधिल्या होत्या ती जमीन त्या त्या ठिकाणच्या मुख्य अधिकाऱ्यांपासून त्यांनीं भाड्यानें घेतली होती. एखाद्या जर्मन मनुष्यास *लीडस् येथें एखादा कारखाना स्थापावयाचा झाला, तर ज्याप्रमाणें कोणा तरी जमिनदारापासून आपल्याला घरें वगैरे तो भाड्यानें घेतो, त्याचप्रमाणें कंपनीनें हिंदुस्थानांत केलें. कंपनीचें तिसरें ठिकाण मुंबई बेट होय. स्पेन देशांतील लोकांशीं लढण्यासाठीं पोर्तुगीज लोकांना इंग्लिशांनीं जी मदत केली, तिच्यामोबदला पोर्तुगीज

कंपनीचीं आरंभीं चीं ठिकाणें.

*हें शहर इंग्लंदांत यार्कशायरमध्यें एर नदीच्या कांठीं असून लोंकरीच्या कारखान्याकरितां प्रसिद्ध आहे.

लोकांनीं हें बेट इंग्लिशांस दिलें होतें. पुढें १६९६ सालीं बंगालच्या नबाबापासून गंगा नदीच्या मुखाजवळ कलकत्ता येथें एक नवी वसाहत कंपनीनें भाड्यानें घेतली. मद्रास, मुंबई व कलकत्ता ह्या तीन वसाहती हिंदुस्थानांतील ब्रिटिश अमलाचीं हल्लींचीं मुख्य स्थानें आहेत. इंग्लिश कंपनी ह्याप्रमाणें वसाहती करीत असतां पोर्तुगीज, डच व फ्रेंच हेहि वसाहती करीत होते.

१८व्या शतकाच्या आरंभीं हिंदुस्थान ज्या बेबंद पातशाहीच्या स्थितींत पडलें होतें, ती स्थिति व्यापारास धोक्याची होती, हें उघड आहे. ह्या वेळेपर्यंत युरोपियन व्यापाऱ्यांनीं आपलें तनमनधन केवळ

हिंदुस्थान जिंकण्याची फ्रेंचांची योजना.

व्यापाराला अर्पिलें होतें, व ह्या देशांतील नेटिव्ह लोकांचीं आपापसांत जीं भांडणें चालत असत, त्यांमध्यें ते अगदीं मन घालीत नसत. त्यांच्यापाशीं फौजफांटा कांहीं नव्हता; व आपणांस कोणाकडून त्रास पोहोंचूं नये, इतकीच काय ती त्यांची इच्छा असे. परंतु पुढें हा प्रकार बदलला. त्या काळीं फ्रेंच व इंग्लिश हे वसाहतींसाठीं झगडत होते. ह्यामुळें त्या वेळच्या त्या अव्यवस्थित स्थितींत, इंग्लिश व्यापाऱ्यांचा नायनाट करून स्वदेशासाठीं हिंदुस्थानांत सार्वभौम सत्ता संपादण्याची अमोलिक संधी आपणांस आपोआप आली आहे, असें हिंदुस्थानांतील फ्रेंच लोकांच्या मनांत आलें, व ही गोष्ट साहजिकच आहे.

ही कल्पना प्रथम डुप्ले नांवाच्या फ्रेंच मनुष्याच्या मनांत आली. मद्रासच्या किंचित् दक्षिणेस असलेल्या पांदिचेरी येथील फ्रेंचांच्या वसाहतीचा हा गव्हर्नर होता. ह्याला ईश्वरानें मोठी कुशाग्र बुद्धि दिली होती. ह्यानें आपला उद्देश सिद्धीस नेण्यासाठीं २ कल्पना लढविल्या. त्यावेळीं ह्या देशांतील संस्थानिकांत तंटे सुरू होते; व विशेषतः ठिकठिकाणच्या गाद्यांविषयीं अनेक भांडणें सुरू होतीं. अशा वेळीं प्रथम एका पक्षास व नंतर दुसऱ्या पक्षास अशी मदत करण्यांत जो फायदा होणार, त्यापेक्षां प्रथमतःच जो पक्ष जास्त फायदा करून देण्यास तयार असेल त्याला मदत केली असतां अतोनात फायदा होईल, व आपलें वर्चस्व अशा रीतीनें दोन्ही पक्षांवर स्थापितां येईल, असें डुप्लेला वाटलें. अशा प्रकारें नेटिव्ह संस्थानांत ढवळाढवळ करणें ही त्याची १ली कल्पना. परंतु आपली मदत महत्त्वाची व फायद्याची आहे, असें संस्थानिकांस कसें वाटेल, असा प्रश्न उत्पन्न झाला. ह्याचा उलगडा करण्यास त्यानें २री कल्पना लढविली.

ज्या कवायतीच्या ज्ञानामुळें दंगा करणाऱ्या हत्यारबंद लोकांचीहि दाणादाण करून त्यांना नम्र करितां येतें, ज्या ज्ञानामुळें राष्ट्रास कोणत्याहि प्रकारचें विशेष भय राहत नाहीं, व ज्या ज्ञानामुळें रानटी लोकांची सुधारणा करण्याचें अनेक पटीनें सामर्थ्य आंगीं येतें, असें युरोपियन कवायतीचें ज्ञान नेटिव्ह लोकांस अगदीं

नाहीं; मात्र ते जात्या शूर आहेत, असें दुप्लीला आढळून आलें. ह्या प्रकारच्या कवायतीचें त्यावेळीं हिंदुस्थानांत नांवहि नव्हतें. म्हणून आपल्या जवळ कवायत शिकलेलें सैन्य असल्यास नेटिव्ह राजांस आपणांस पाहिजे तसें वागवितां येईल, असें त्यास वाटलें. परंतु कवायत शिकलेलें सैन्य आणावें कोठलें, असा प्रश्न उत्पन्न झाला. तेव्हां त्याची २री कल्पना आली. कवायत शिकून तयार झालेली अशी एखादी मोठी टोळी आपणांपाशीं हिंदुस्थानांत नाहीं खरी, परंतु कवायत शिकलेले जे कांहीं युरोपियन हवालदार आपल्यापाशीं आहेत, त्यांच्याकडून नेटिव्ह शिपायांस हें कवायतीचें ज्ञान देतां येईल, व युरोपियन कामगारांच्या आधिपत्याखालीं जवळ जवळ युरोपियन लोकांइतकें उपयोगी पडण्याजोगें त्यांस करितां येईल, असें त्यास दिसून आलें. ह्या २ कल्पनांमुळें त्याला हिंदुस्थान जिंकण्याची किल्लीच सांपडली, असें म्हणण्यास हरकत नाहीं. नेटिव्ह शिपाई मिळविणें कठीण नव्हतें. युरोपियन लोकांची नौकरी पतकरण्याविषयीं ह्यांना शंका वाटण्याचा संभव नव्हता; कारण स्वदेशाभिमान म्हणून काय पदार्थ आहे, तें ह्यांना माहीतच नव्हतें; आणि एखाद्या मुसलमानाला, एखाद्या हिंदूबरोबर किंवा दुसऱ्या पंथाच्या मुसलमानाबरोबर लढणें व एखाद्या फ्रेंच किंवा इंग्लिश मनुष्याबरोबर लढणें ह्या दोन्ही गोष्टी सारख्याच वाटत असत. हिंदु किंवा

मुसलमान हे आपले देशबांधव आहेत, तेव्हां ह्यांच्याब-बरोबर आपण कसें लढावें, हा विचार त्यांच्या मनांत यावयाचाच नाहीं. अशीच स्थिति हिंदूंचीहि होती. तसें-च आपल्या धन्याचें निमक एकवार चाखिलें म्हणजे मरे-पर्यंत विश्वासुकपणानें त्याची चाकरी करणें, हेंच अब्रूचें काम आहे, अशी ह्या नेटिव्ह शिपायांची समजूत असे, व ही गोष्ट डुप्लीला माहित होती. ह्यामुळें नेटिव्ह शिपायांस पगार देऊन व त्यांना युरोपियन अंमलदारां-कडून कवायत शिकवून त्यांचें एक सैन्य डुप्लीनें तयार केलें; व ह्या सैन्याच्या जोरावर तो नेटिव्ह संस्थानि-कांच्या भांडणांत पडूं लागला; व हिंदुस्थानांत त्याचें लवकरच इतकें वजन बसलें कीं, हा देश जिंकून घेण्याचा जो विचार त्याच्या मनांत घोळत होता तो सिद्धीस जाण्याची चांगली संधी आली आहे, असें लोकांस वाटूं लागलें.

इंग्लिश व फ्रेंच ह्यांची चढाओढ.

जेव्हां फ्रेंचांनीं असा प्रकार सुरू केला, तेव्हां इंग्लिशांना त्यांचें अनुकरण करण्यावाचून मार्गच उरला नाहीं. जर आपण असें केलें नाहीं, तर आपला सर्व व्यापार आपल्या हातून खचित जाईल, व कदाचित् हे फ्रेंच लोक आपणांस हिंदुस्थानांतून अजीबात हकलून देतील, असें त्यांस दिसून आलें, म्हणून केवळ स्वसंरक्षणार्थ त्यांनीं फ्रेंचांचा कित्ता वळविला, पगार देऊन शिपाई ठेविले,

त्यांस कवायत शिकविली व नेटिव्हांच्या भांडणांत तेहि पडूं लागले. अर्थात् ते नेहमीं फ्रेंचांच्या उलट बाजूला मिळत. ह्यामुळें फ्रेंचांच्या व इंग्लिशांच्या वसाहतींत साहजिकच उघडपणें लढाई सुरू होई; आणि युरोपांत व अमेरिकेंत इंग्लिश व फ्रेंच ह्यांचें युद्ध सुरू होई तेव्हां हिंदुस्थानांतहि त्यांच्यांत युद्ध सुरू होई.

आज फ्रेंचांचा जय तर उद्यां इंग्लिशांचा जय होई; व ह्यामुळें मद्रास आणि पांदिचेरी हीं वारंवार एकाच्या ताब्यांतून दुसऱ्याच्या ताब्यांत जात येत असत. फ्रेंच लोक स्वतःच इंग्लिशांच्या वसाहतींवर हल्ला करून राहत नसत; तर नेटिव्ह संस्थानिकांसहि तसें करण्याविषयीं ते भर देत; व अशा रीतीनें दोहोंकडून घेर-ल्यामुळें इंग्लिश व्यापाऱ्यांस जीव की प्राण होत असे. परंतु इंग्लिशांच्या सुदैवानें डुप्लीस त्याच्या स्वतःच्या सरकाराकडून कांहींच मदत मिळाली नाहीं. त्याच्या बुद्धीची परीक्षा फ्रेंच सरकारास करितां आली नाहीं. जर करितां आली असती तर जर्मनींत ज्या फ्रेंच शिपायांची निष्कारण कत्तल होत होती, त्यांपैकीं कांहीं शिपाई फ्रेंच सरकारानें हिंदुस्थानांत डुप्लीच्या मदतीस पाठविले असते; आणि ह्या शिपायांनीं जगाचा इतिहास फिरवून टाकिला असता. सारांश, डुप्लीला फ्रेंच सरकारानें मदत तर केली नाहींच; परंतु उलट त्यास स्वदेशीं परत बोलाविलें. त्याच्या योग्यतेचा एकहि फ्रेंच सरदार पुढें हिंदुस्थानांत आला नाहीं.

अशा आणीबाणीच्या वेळीं इंग्लिश व्यापाऱ्यांच्या सुदैवानें त्यांच्या कारकुनांतच अमानुष सामर्थ्याचा, लष्करी कामांत अति विलक्षण बुद्धीचा, व नेटिव्हांची खोड त्यांच्याच हातून मोडविण्यास समर्थ, असा एक मनुष्य निघाला. हा मनुष्य राबर्ट क्लैव्ह होय. हिंदुस्थानांतील ब्रिटिश राज्याचा पाया घालणारा हाच मनुष्य, असें म्हणण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं. आपल्या शिपायांची चांगली व्यवस्था करून त्यांचें त्यानें एक छोटेंसें युरोपियन पद्धतीचें सैन्य उभारिलें; आणि फ्रेंच व नेटिव्ह ह्यांनीं हल्ले केले तेव्हां त्यांची पिछेहाट केली.

भांडण येथवर येऊन ठेपलें तेव्हां दोन लढाया लक्षांत ठेवण्यासारख्या झाल्या. १ ली लढाई प्लासीची; ही इ. स. १७५७ त झाली. ह्या लढाईत खुद्द क्लैव्ह साहेबानें १ हजार इंग्लिश शिपाई व २ हजार नेटिव्ह शिपाई, इतक्या सैन्यानिशीं बंगालच्या नवाबाच्या किमानपक्ष २० हजार सैन्याचा अगदीं पराभव केला. बंगालच्या नबाबानें फ्रेंचांच्या जोरावर गंगा नदीवरील इंग्लिशांच्या ठिकाणांवर हल्ला करून तीं घेतलीं होतीं; आणि कंपनीच्या नोकरांपैकीं बहुतेकांस कलकत्त्याच्या प्रसिद्ध अंधार कोठडीमध्यें ( ब्लाक होलमध्यें ) टाकिलें होतें. ह्या प्लासीच्या लढाईवरून असें दिसून आलें कीं, इंग्लिश व त्यांचे कवायत शिकलेले नेटिव्ह शिपाई हे हिंदुस्थानांतील

प्लासीची लढाई.

राजांच्या अवाढव्य परंतु कवायत न शिकलेल्या फार मोठ्या सैन्यास पुरून उरण्यासारखे आहेत.

२री लढाई वांदिवाशाची. ही इ. स. १७६०त मद्रासजवळ इंग्लिश व फ्रेंच ह्यांमध्यें झाली. खुद्द क्लैव्ह साहेब ह्या लढाईत नव्हता; परंतु इंग्लिश सैन्यावर सर ऐर कूट ह्या नांवाचा दुसरा एक बडा योद्धा होता.

वांदिवाशची लढाइ.

हिंदुस्थानांत आरंभीं आरंभीं इंग्लिशांच्या ज्या लढाया झाल्या त्यांत क्लैव्ह साहेबाच्या खालोखाल पराक्रमी हाच सरदार होता. ह्या लढाईत इंग्लिशांस जय मिळाला; व युरोपियन लोकांची लढण्याची पद्धति ह्या लढाईमुळें नेटिव्हांस चांगली समजली, म्हणून इंग्लिश सैन्यांतील नेटिव्ह शिपायांनीं कूट साहेबाचे आभार मानिले. ह्या लढाईतील जय अति महत्त्वाचा होता. इंग्लिश शिपायांपेक्षां फ्रेंच शिपाई चांगले अशी आजपर्यंत नेटिव्ह शिपायांची समजूत होती; परंतु ह्या वांदिवाशच्या लढाईमुळें त्यांचें मत बदललें. बंगालच्या नबाबाशीं लढून प्लासी येथें मिळालेला जय व फ्रेंचांबरोबर लढून वांदिवाश येथें मिळालेला जय, ह्यांच्या योगानें हिंदुस्थानच्या इतिहासांत फार मोठाले फेरफार झाले; म्हणून ह्या दोन लढाया चांगल्या लक्षांत ठेविल्या पाहिजेत.

बंगालचा नबाब व फ्रेंच ह्यांचा पराभव करूनच क्लैव्ह साहेब स्वस्थ राहिला नाहीं. हिंदुस्थानांतील एका

कंपनी बंगाल प्रांताचा राज्यकारभार मिळवितें.

प्रांताच्या एका भागाचें राज्य त्यानें कंपनीस प्रथम मिळवून दिलें. बंगालच्या नबाबाचा राज्यकारभार त्याच्या नांवानें आपण करण्याचें पतकरून त्यानें ही गोष्ट केली. त्यानें नबाबास प्रत्यक्ष राज्यपदावरून काढिलें नाहीं. आपल्या पदवीचा, आपल्या भव्य राजवाड्यांचा व नबाब ह्या नात्यानें मिळत असलेल्या द्रव्याच्या राशींचा उपभोग नबाब घेतच होता; परंतु तो नांवाचा मात्र नबाब राहिला होता; कारण राज्याधिकार त्याजकडे कांहींच नव्हता. त्याच्या सर्व मुलखाचा राज्यकारभार करण्याचें काम कंपनीकडे आलें होतें. ग्रेट ब्रिटन व आयर्लंद ह्यांचें क्षेत्रफळ ह्या मुलखाच्या सुमारें $\frac{४}{५}$ होईल, इतका हा मुलूख मोठा होता. कंपनीचा अधिकार पक्का करण्यासाठीं क्लैव्ह साहेबानें दिल्लीच्या मोगल बादशहास कांहीं द्रव्य देऊन ह्या व्यवस्थेच्या मान्यतेबद्दल त्याजपासून लेखी संमति मिळविली.

आतां क्लैव्ह साहेबाचा राज्य मिळविण्याचा हा आरंभींचा प्रकार चांगला लक्षांत ठेवण्यासारखा आहे; कारण ह्याच प्रकाराचें अनुकरण करून कंपनीनें पुढें दुसरे प्रांत मिळविले, नेटिव्ह राज्यांचा समूळ नाश कंपनीनें कधींच केला नाहीं. कधीं कधीं ती गादीवर नवीन इसमास बसवी; कधीं कधीं हद्दपार झालेल्या राजघराण्यांतील पुरुषास परत आणून गादीवर बसवी; परंतु

नेटिव्ह राजांपासून एखादा प्रांत घेऊन आपल्या स्वतः-च्याच नांवानें त्याचा राज्यकारभार तिनें कधींहि चालविला नाहीं. तिचें कृत्य विशेष सौम्यपणाचें होतें; नेटिव्ह राजांचे मुखत्यार अशा नात्यानें ती नेहमीं कारभार करी. नेटिव्ह राजांच्या हातांत कवडीचाहि अधिकार नसे; तथापि गादीवर तीं बाहुलीं असलींच पाहिजेत. हुकूम त्यांच्या नांवानें सुटत, त्यांच्याच सत्तेनें कर गोळा करीत; परंतु खरोखर हुकूम कंपनी करी, व राजाची खाजगी नेमणूक वजा करून बाकीचा सर्व पैसा कंपनीच्या खजिन्यांत जाई. तिनें लवकरच नेटिव्ह राजांचीं न्यायाचीं कोर्टेंहि आपल्या हातांत घेण्यास आरंभ करून न्यायाधीश नेमण्यास सुरवात केली. हे न्यायाधीश पोलिसांवर देखरेख करीत, व कंपनीचे हुकूम अमलांत आणीत.

कंपनीच्या राज्यकारभाराचा परिणाम.

ही राज्यक्रांति बंगाल्यांतील लोकांस प्रथमतः कोणत्याहि प्रकारें हितावह वाटली नाहीं; व तसें होणें साहजिकच होतें. त्यांजवर हे नवीन राज्य करणारे म्हटले म्हणजे इंग्लिश व्यापाऱ्यांची कंपनी. हिचा मुख्य उद्देश काय तो पैसा गोळा करण्याचा. आपल्या भांडवलावर व्याज काय सुटतें, हाच काय तो त्यांचा नेहमींचा मुख्य विचार. शिवाय, जितका पैसा इंग्लंदांत पाठवितां येईल तितका पाठविण्यास कंपनींतील भागीदार आपल्या हिंदुस्थानांतील मुखत्यारांस निक्षून हुकूम करीत.

फायद्यावांचून एखादी पै खर्च झाली तरी देखील ते भागीदार कुरकूर करीत. शिवाय कंपनीचे नौकर गरीब असत; त्यांचा पगारहि होईल तितका कमी करण्यांत येत असे; व ह्यामुळें आपली प्राप्ति वाढविण्यास लांच घेणें, किंवा स्वतःच्या नांवावर व्यापार करणें ह्यांतील कोणता तरी मार्ग त्यांस स्वीकारावा लागे. “ मुला, पैसा मिळव, साधल्यास प्रामाणिकपणानें मिळव, परंतु पैसा मिळविल्यावांचून राहूं नको, ” अशा प्रकारचा उपदेश बापानें मुलास केला असतां जो परिणाम होणार तसाच परिणाम वरील स्थितीचा झाला; व ह्याच तत्वास अनुसरून बंगालचा राज्यकारभार होऊं लागला.

ह्याचा परिणाम स्वाभाविकपणेंच पुढें लिहिल्याप्रमाणें झाला. ह्या कंपनीच्या जुलमी अमलाखालीं गरीब नेटिव्ह धुळीस मिळाले. नेटिव्ह राजांच्या अमलांत त्यांची जी स्थिति होती, तीहून वाईट स्थिति त्यांची कंपनीच्या अमलांत झाली. नेटिव्ह राजांनीं आपल्या नियमित अधिकाराचें उल्लंघन केलें तर कंपनी त्यांस पदच्युत करी; परंतु कंपनीपासून आपली सुटका करून घेणें नेटिव्हांस अशक्यच होतें. ह्याचा परिणाम असा झाला कीं, वारंवार दुष्काळ पडूं लागले, आणि भुकेनें व रोगानें इतके लोक मेले कीं, त्यांच्या प्रेतांनीं गंगा नदी भरून गेली. ह्या भयंकर स्थितीची हकीगत हळू हळू इंग्लंदांत गेलीच, व ती ऐकून इंग्लिश लोकांचें अंतःकरण जागृत झालें.

हिंदुस्थानांतील दुसरा मोठा गव्हर्नर जो वारन हेस्तिंग्स् ह्याच्या कारकीर्दींत पार्लमेंटानें हें प्रकरण हातीं घेतलें. ह्याच्या कारकीर्दींतच मद्रास, मुंबई व बंगाल हे तीन इलाखे एकत्र करून त्यांजवर बंगालच्या गव्हर्नरास "गव्हर्नर जनरल" असा हुद्दा देऊन मुख्य नेमण्याचा ठराव झाला. ह्या नवीन ठरावाप्रमाणें वारन हेस्तिंग्स् हाच पहिला गव्हर्नर जनरल झाला. डुप्लेसारखाच हेस्तिंग्स् हुशार होता; व डुप्लेनें जो बेत योजिला, परंतु जो त्याला सिद्धीस नेतां आला नाहीं, तो बेत ह्यानें सिद्धीस नेला. कित्येक राजांबरोबर त्यानें लढाया केल्या, कित्येकांविरुद्ध त्यानें खलबतें केलीं, व सर्व कामांत त्यास यश येत गेलें. हैदरअल्ली हा एक साहसी शिपाई होता, व त्यानें स्वसामर्थ्यानें आपणास म्हैसूरचा सुलतान केलें होतें, आणि इंग्लिशांस हिंदुस्थानांतून हकलून लावण्याचें भय घातलें होतें. ह्या हैदरअल्लीपासून त्यानें मद्रासचें संरक्षण केलें. अयोध्येच्या राजाविरुद्ध खलबत करून त्याजपासून त्यानें अतोनात पैसा उकळिला; व ह्या पैशानें दायरेक्तर लोकांचें शांतवन करून हैदरअल्लीशीं लढाया करण्यांत आलेला खर्च भरून काढिला. आपल्या रयतेस दाबांत आणण्यासाठीं एखाद्या नेटिव्ह राजानें कंपनीचे शिपाई मदत घेण्याची इच्छा दर्शविल्यास पैसे घेऊन त्या राजास तो मदतहि देत असे.

कंपनीच्या राज्यव्यवस्थेसंबंधानें पार्लमेंटानें केलेली सुधारणा.

परंतु हीं त्याचीं कृत्यें इंग्लंदांत पसरलीं तेव्हां कंपनीच्या अमलाविरुद्ध मोठी ओरड झाली. प्रसिद्ध वक्ता व मुत्सद्दी जो बर्क साहेब यानें नेटिव्ह लोकांचा पक्ष घेतला; व हेस्टिंग्स् ह्याला त्याच्या वर्तणुकीबद्दल दूषण देण्यांत येऊन त्याची चौकशी झाली. पुष्कळ वर्षें ही चौकशी चालून अखेरीस तो दोषमुक्त झाला. परंतु प्लासी व वांदिवाश येथील लढाया ज्याप्रमाणें हिंदुस्थानच्या इतिहासांत अति महत्त्वाच्या आहेत, त्याचप्रमाणें ही चौकशीहि फार महत्त्वाची आहे; कारण ह्या चौकशीमुळें कंपनीच्या अमलांत फार सुधारणा झाली. आजपर्यंत कंपनीचा अंमल म्हणजे नेटिव्ह लोकांस मोठा तळतळाट असे; परंतु ह्यापुढें तो सुखप्रद होऊं लागला. व्यापार करणें व राज्य करणें असे दोन्ही अधिकार आजपर्यंत कंपनीकडे होते; परंतु ह्यापुढें हे दोन्ही अधिकार एकाचकडे असूं नयेत, असें पार्लमेंटानें ठरविलें.

इंदियन सिव्हिल सर्व्हिस.

ह्या हालचालीमुळेंच " इंदियन सिव्हिल सर्व्हिस" ( हिंदुस्थानांतील मुलकी काम चालविणाऱ्या अधिकाऱ्यांची मंडळी ) निघाली. हिंदुस्थानांतील इंग्लिश जज्य, माजिस्त्रेट, कलेक्टर व इतर कामगार ह्यांचा ह्यांत समावेश होतो. ह्या लोकांचा व्यापाराशीं कांहीं संबंध नव्हता. त्यांस चांगला पगार मिळे; व ह्यामुळें लांच घेण्याचा त्यांस कोणत्याहि प्रकारें मोह पडत नसे. जे नेटिव्हांवर प्रेम करीत असत, व ईश्वरे-

च्छेनें ज्या लोकांचें कल्याण करण्याचें आपल्या हातीं आलें आहे त्यांच्यासाठीं जे आपलें सुखसमाधान, आपलें आरोग्य, फार कशाला, आपले प्राणहि खर्ची घालण्यास तयार असत, अशा प्रकारचे कित्येक नामांकित इंग्लिश घराण्यांतील लोक ह्या इंडियन सिव्हिल सर्व्हिसमध्यें होऊन गेले. ह्या लोकांच्या अमलांत पूर्वींच्या प्रत्येक गोष्टीचें स्वरूप बदललें. ज्या ज्या प्रांतांत इंग्लिशांचा अंमल असे, त्या त्या प्रांतांत व्यवस्था, सुयंत्रित राज्यकारभार, निर्भयता व उद्योग हीं असत, व ह्यामुळें त्या त्या प्रांतांची भरभराटी असे; आणि ज्यांत अंदाधुंदी, अव्यवस्था, चोऱ्या व बलात्कार हीं सुरू असत, अशा नेटिव्ह संस्थानांशीं इंग्लिशांच्या प्रांतांची तुलना केली असतां विलक्षण तफावत दिसून येई.

ह्याप्रमाणें राज्यव्यवस्थेच्या संबंधानें यश येत होतें, तरी देखील कंपनीच्या लढाया पूर्वींप्रमाणें चालूच होत्या. फ्रेंच लोकांचा पराभव झालाहोता व म्हणून कंपनीच्या वसाहतींवर त्यांजकडून हल्ला होण्याचें भय राहिलें नव्हतें. असें असतां, स्वस्थपणें व्यापार करणें, व मिळालेल्या मुलखाचा राज्यकारभार चालविणें, ह्याच गोष्टींकडे लक्ष देऊन कंपनी स्वस्थ कां बसली नाहीं, असा प्रश्न साहजिक उद्भवतो. कंपनीच्या भागीदारांची प्रतिवर्षी जी सभा इंग्लंदांत भरत असे, त्या सभेंत भागीदारहि हाच प्रश्न काढीत असत. तसेंच कोणताहि नवीन गव्ह-

नेर जनरल हिंदुस्थानांत नेमून पाठविते वेळीं कंपनीचे दायरेक्तर (व्यवस्थापक) ह्यांचाहि त्याला सक्तीचा हुकूम असे कीं, त्यानें मागील गव्हर्नर जनरलांप्रमाणें लढायांत विलकूल पडूं नये. तसेंच तो गव्हर्नर जनरल इंग्लंदांतून निघते वेळीं ह्याप्रमाणें शांतता राखण्याचें अभिवचनाहि देई; परंतु हिंदुस्थानांत आल्यावर थोड्याच दिवसांनीं त्याला लढायांत पडावें लागे.

असें कां होई, हें स्पष्ट होण्यासाठीं एक सोपें उदाहरण घेऊं. कल्पना करा कीं, १० घरांची एक

कंपनीच्या लढायांचीं कारणें.

आळी आहे, व त्या आळींतील नंबर १च्या घरांत तुम्ही राहत आहां; नंबर ९च्या किंवा १०च्या घरास आग लागली; तुमच्या घराच्या बाजूला वारा वाहूं लागला नाहीं, तोंपर्यंत तुम्हांला त्याजबद्दल फारशी काळजी बाळगावयास नको. परंतु कल्पना करा कीं, नंबर २च्याच घरास आग लागली आहे; तसेंच त्या घरांतील निमे लोक ज्वाला प्रज्वलित करण्याचा प्रयत्न करीत असून निमे त्या विझवून टाकण्याचा प्रयत्न करीत आहेत, असेंहि तुम्हांला कळून आलें. ज्वाला तुमच्या घरापर्यंत खास पसरतील असें उघड दिसत आहे; आणि कसें होईल, काय होईल, ह्या भीतीमुळें तुम्हांला व तुमच्या कुटुंबांतील माणसांना नेहमींचा कामधंदा सुचत नाहींसा झाला आहे. अशा स्थितींत तुम्ही काय कराल? उघडच आहे कीं, तुम्ही

बेधडक नंबर २च्या घरांत शिरलां असतां, आग विझविणारांना मदत करून आग वाढविणारांचा पाडाव केला असता, व आग लावणारांस पुन्हा वर डोकें काढितां येऊं नये, अशाविषयीं योग्य खबरदारी घेतली असती; आणि असें करणेंच सयुक्तिक झालें असतें.

आतां ईस्त इंदिया कंपनीनें जें केलें तें हेंच. हिंदुस्थानांतील नेटिव्ह संस्थानांचा राज्यकारभार इतका वाईट होता कीं, त्यांत बहुतेक ठिकाणीं अंदाधुंदीच होती. ज्यांत अंदाधुंदी नाहीं, अशीं अपवादक संस्थानें थोडींच. ह्या अंदाधुंदीमुळें कंपनीचा व्यापार सुरळीत चालत नसे; व स्वतःच्या मुलखाबाहेर कंपनीस कांहींच करितां येत नसे. एवढेंच होऊन राहिलें नाहीं; कारण इंग्लिशांस अद्यापि फ्रेंचांची भीति होतीच. प्रत्येक नेटिव्ह संस्थानिकाच्या दरबारीं फ्रेंच हेर असत, व ते त्यांना इंग्लिशांविरुद्ध उठण्याविषयीं भर देत असत. शिवाय युरोपांतील किंवा इतर ठिकाणच्या इंग्लिशांच्या वसाहतींवर हल्ला करणें जसें शक्य आहे, तसेंच त्यांच्या हिंदुस्थानांतील मुलखावरहि हल्ला करणें शक्य आहे, असें नेपोलियन ह्यासहि वाटत होतें. म्हणून वारंवार असें घडे कीं, एका प्रांतांत कंपनीनें स्वस्थता केली नाहीं तोंच दुसऱ्या प्रांतांत हात घालणें तिला भाग पडे. कारण आपल्या शेजारच्या प्रांतांत अव्यवस्था उत्पन्न झाल्यास तिचा संसर्ग आपल्या मुलखास होईल कीं काय, अशी कंपनीला

भीति असे; व शेजारच्या संस्थानांतून असणाऱ्या फ्रेंचांच्या कारस्थानांचीही तिला भीति असे. म्हणून कंपनीच्या दायरेक्तरांचे सक्तीचे हुकूम व गव्हर्नर जनरलांचीं शांतता ठेवण्याविषयींचीं अभिवचनें सर्व एकीकडे राहत; व कंपनीला वारंवार युद्धप्रसंग करावे लागून वरचेवर मुलूख काबीज करावा लागे.

म्हैसूरच्या टिपू सुलतानाचा पराभव केला नाहीं तोंच इंग्लिशांस मराठ्यांशीं लढावें लागलें. मराठ्यांस जिंकून त्यांच्या मुलखाची चांगली व्यवस्था केल्यानंतर मोगलांच्या मुलखांतून दंगेखोरांस त्यांना हाकून द्यावें लागलें. हें झाल्यावर पंजाबांत सिंधु नदीच्या तीरीं राहणाऱ्या शिख लोकांबरोबर व त्या नदीच्या मुखाशीं असणाऱ्या सिंध प्रांतांतील अमिरांबरोबर त्यांस लढावें लागलें. ह्याप्रमाणें क्रमाक्रमानें हिमालयाच्या दक्षिणेकडील एकून एक संस्थान आपल्या हस्तगत होऊन तेथील राज्यकारभार आपल्या हातीं येईपर्यंत अथवा तेथील संस्थानिक आपणास खंडणी देऊन आपल्या तंत्रानें चालण्यास कबूल होईपर्यंत कंपनीस स्वस्थ बसतां येईना. ह्या लढायांसंबंधी कशी हकीगत येथें सांगणें अशक्य आहे. एवढें सांगितलें म्हणजे पुरे आहे कीं, अयोध्येचें मोठें राज्य इ. स. १८५६त इंग्लिशांनीं खालसा केलें, व त्या वेळेपासून हिंदुस्थानची सार्वभौम सत्ता प्रत्यक्ष जरी नव्हे, तरी वस्तुतः इंग्लिश कंपनीकडे आली.

परंतु वरील लढायांतून इंग्लिशांसच नेहमीं जय कसा मिळत गेला, असा प्रश्न साहजिकच उत्पन्न होतो. ह्या देशांतील लोकांपेक्षां इंग्लिश लोक शूर होते, एव-

लढायांतून इंग्लिशांसच नेहमीं जय कां मिळत गेला?

ढ्याच उत्तरानें ह्या प्रश्नाचें समाधान होत नाहीं. कारण स्वयंपाक, बाजारची नेआण, व इतर हलक्या प्रकारचीं श्रमाचीं कामें हीं इंग्रजांकडून ह्या उष्ण देशांत झालींच नसतीं; व अर्थात् हीं करण्यास जर त्यांना एतद्देशीय चाकर मिळाले नसते, तर त्यांना उपाशीं मरण्याचाच प्रसंग आला असता. तेव्हां अशा स्थितींत त्यांच्या नुसत्या शौर्याचा काय उपयोग झाला असता? ह्यावरून त्यांचा नेहमीं जय होण्याचें शौर्याखेरीज आणखी कांहीं कारण असलें पाहिजे हें उघड आहे. शिवाय, त्यांनीं ज्या लढाया जिंकिल्या त्या ज्या सैन्याच्या जोरावर जिंकिल्या, त्या सैन्यांत सर्व इंग्लिश लोकच होते काय? हमेषा नेटिव्ह शिपायांची संख्या इंग्लिश शिपायांच्या संख्येच्या कधीं तिप्पट, कधीं पांच पट, अशी असे. ह्यास्तव सैन्यांतील इंग्लिश व नेटिव्ह शिपायांच्या संख्यांच्या प्रमाणाकडे लक्ष दिलें असतां असें दिसून येईल कीं, नेटिव्ह संस्थानिकांचा इंग्लिशांनीं मुख्यत्वें नेटिव्ह शिपायांच्या जोरावरच पराजय केला आहे. साधारणपणें म्हटलें असतां त्यांच्या जयाचीं कारणें २ होतीं:—( १ ) नेटिव्ह राजांचें दौर्बल्य व त्यांच्यांत

ऐक्याचा अभाव; व (२) नेटिव्हांच्या शूर परंतु कवायत न शिकलेल्या सैन्याशीं लढण्यास इंग्लिशांचें कवायत शिकलेलें सैन्य.

मोगलांच्या सार्वभौम सत्तेच्या ऱ्हासानंतर मोगलांचे मांडलिक राजे, हिंदु सरदार, व बंडखोरांचे पुढारी ( पेंढारी वगैरे ) हे सर्वच अधिकारासाठीं भांडूं लागले. ह्याप्रमाणें अधिकारप्राप्तीसाठीं जो हा कलह सुरू झाला, त्यांत इंग्लिश व्यापारीहि पडले. सर्वांत अधिक योग्यतेचा जो असतो तोच भांडणांत यशस्वी होतो, ह्या डारविन नांवाच्या प्रसिद्ध तत्ववेत्त्याच्या मताप्रमाणें ह्या भांडणांत इंग्लिश व्यापारीच यशस्वी होऊन सर्वांत अधिक योग्यतेचे ठरले. तथापि ह्या प्रकरणाचा अधिक विचार केला पाहिजे; व इंग्लिश व्यापारी व त्यांचे प्रतिस्पर्धी ह्यांस ज्या साधक बाधक गोष्टी होत्या, त्यांची तुलना केली पाहिजे; आणि नंतर इंग्लिश व्यापाऱ्यांचें वर्चस्व होण्याचें कारण शोधिलें पाहिजे. प्रत्येक परिणामास कारण असतेंच, व ह्याचें कारण शोधण्यास आपणांस दूर जावयास नको.

इंग्लिश व्यापाऱ्यांना पहिली मोठी अनुकूल गोष्ट म्हटली म्हणजे त्यांची **मंडळी ( कंपनी )** होती, ही होय. कंपनी असणें ही गोष्ट फायदेशीर कशी, हें प्रथम दर्शनीं ध्यानांत येणार नाहीं; म्हणून आपण ह्याचा जास्त विचार करूं. "एक्सूपेन्शन् ऑफ् इंग्लंड" (इंग्लंद—

चा विस्तार ) ह्या नांवाचें प्रोफे. सीली ह्यांनीं जें पुस्तक केलें आहे, त्यांत त्यांनीं ही गोष्ट स्पष्ट केली आहे: प्रथमतः कंपनीचे प्रतिस्पर्धी राजे हे निरनिराळ्या व्यक्ति असल्यामुळें त्यांस आपलें सामर्थ्य आपल्यामागून गादीवर येणारांस देतां येत नसे. ह्यामुळें एखादा बलिष्ठ राजा मरून त्याच्या गादीवर त्याचा निर्बळ मुलगा आला कीं, राज्यांत बखेडा सुरू झाला. बलिष्ठ राजाला बलिष्ठच मुलगा होईल, असा नियम कोठें आहे? पराक्रमी सेनाधिपतीला पराक्रमीच मुलगा झाला आहे, अशीं उदाहरणें इतिहासांत किती आढळतील? तसेंच एखाद्या नेटिव्ह राजाच्या पदरीं पराक्रमी सेनापति असला तर त्याला लढाईंत मरण्याची, मारेकऱ्यांच्या हातून ठार होण्याची किंवा तापानें वगैरे मरण्याची भीति आहेच; आणि तो मेला कीं त्याच्या सैन्यांत अव्यवस्था झालीच. परंतु कंपनीची गोष्ट अशी नव्हती; ती एकच व्यक्ति नसल्यामुळें तिचा नाश होणें फार कठीण. शिवाय कंपनीला आपल्या पदरीं लष्करी कामांत व राज्यव्यवस्थेच्या कामांत प्रवीण लोक ठेवितां येत असत; कारण त्यांस चांगले पगार देण्याचें सामर्थ्य तिच्या आंगीं असे. तसेंच योग्य पगार देऊन कवायत शिकलेले शिपाईहि तिनें आपल्या पदरीं ठेविले होते. सारांश, ( १ ) कंपनी असणें, ( २ ) बुद्धिमान् लष्करी लोक व राज्यकार्यधुरंधर लोक नौकरीस ठेवण्याचें सामर्थ्य आंगीं असणें, आणि ( ३ )

चांगले पगार देऊन कवायत शिकलेलें सैन्य ठेवणें, ह्या तीन गोष्टींच्या अनुकूलतेमुळेंच ईस्त इंदिया कंपनीला तिच्या प्रतिस्पर्ध्यांशीं टक्कर मारण्याचें सामर्थ्य आलें. परंतु इतक्या ३च गोष्टी तिला अनुकूल होत्या, असें नाहीं. दारूगोळ्यानें भरलेले व वेढा घातला असतांहि घेतां येणार नाहींत, असे मजबूत किल्ले तिच्या ताब्यांत होते. शिवाय ही कंपनी इंग्लिशांची असल्यामुळें तिला इंग्लिश सरकारचा मोठाच पाठिंबा होता. इंग्लिश आरमाराच्या वर्चस्वामुळें इंग्लंदाशीं तिचें दळणवळण निर्भयपणाचें झालें होतें; इतकेंच नव्हे, तर त्या आरमारामुळें फ्रेंचांस युरोपांतून मदत येण्यास प्रतिबंध झाला होता. तसेंच, इंग्लिश सरकारास पैसे दिले असतां त्या सरकाराकडून कंपनीला शिपाईहि मिळत असत; आणि क्लैव्ह साहेबाच्या वेळेपासून कवायत शिकविलेल्या कांहीं पलटणी नेहमीं तिच्या पदरीं असत. ह्या सर्व गोष्टी अनुकूळ असल्यामुळेंच कंपनीचें तिच्या प्रतिस्पर्ध्यांवर वर्चस्व झालें.

अखेरीस इंग्लिशांपासून नेटिव्ह संस्थानांसाहि नेहमीं फायदे होऊं लागले. एखाद्या नेटिव्ह संस्थानांत दंगे वगैरे सुरू झाल्यास कंपनी हातांत तरवार घेऊन लढण्यास तयार होई; व त्यामुळें तेथें शेवटीं सुव्यवस्था होऊन उत्तम राज्यकारभार सुरू होई. जेथें ऐक्य व शांतता असे, अशा संस्थानांबरोबर तिला लढाया कर-

ण्याचें कारणच नसे, हें उघड आहे. प्रत्येक नेटिव्ह संस्थानांत इंग्लिशांचा अंमल पसंत करणाऱ्या नेटिव्ह लोकांचा एक पक्ष असे; आणि ह्या लोकांस स्वदेशाभिमान म्हणून काय पदार्थ आहे हें माहीतच नव्हतें, म्हणून आपल्या राजास पदच्युत करून तेथें इंग्लिशांचा अंमल सुरू करण्यास आपणाकडून होईल तितकी मदत करण्यास हा पक्ष तयार असे. ह्यामुळें फक्त राजांचीच अदलाबदल होत असे असें नाहीं, तर तेथील पूर्वीची वाईट राज्यव्यवस्था बंद होऊन तेथें चांगली राज्यव्यवस्थाहि सुरू होई. सारांश, पैशाची चंगळ, शांत डोक्याचे मुत्सद्दी, पराक्रमी सैन्य व मदत करण्यास पाठीशीं दुसरें राष्ट्र, इतक्या गोष्टी अनुकूळ असल्यामुळें कंपनीस यश येत गेलें, ह्याबद्दल आश्चर्य मानण्यास जागा राहत नाहीं. तिला यश आलें नसतें तर मात्र तिचा कारभार फार अव्यवस्थित होता, असें म्हणण्यास सबळ कारण होतें.

तथापि कंपनीला यशच आलें, व इ. स. १८५६त तिजकडे हिंदुस्थानची सार्वभौम सत्ता आली. तिला ही स्थिति प्राप्त होऊन फार काळ लोटला नाहीं तोंच

हिंदुस्थानांतील मोठें बंड.

ह्या देशांतील मोठ्या बंडामुळें तिच्या तेथील सत्तेस मुळापर्यंत धक्का बसला. नेटिव्ह शिपायांचा प्रामाणिकपणा, हाच काय तो कंपनीच्या एवढ्या यशाचा आधारस्तंभ होता, असें वर स्पष्ट ज्ञा-

लेंच आहे. नेटिव्ह शिपायांनीं ज्या कारणांनीं बंड केलें तीं कारणें येथें सांगण्याची आवश्यकता नाहीं; तथापि त्यांच्या बंडामुळें कांहीं थोड्या काळपर्यंत इंग्लिशांच्या हिंदुस्थानांतील सत्तेची चलबिचल झाली होती, ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. त्यांनीं तें बंड मोडून टाकिलें ही गोष्ट महत्त्वाची नाहीं; पण तें कोणत्या रीतीनें मोडिलें, हें समजणें महत्त्वाचें आहे. बंडाच्या वेळचें हावलाक साहेबाचें शौर्य व लार्ड लारेन्स साहेबाचें धैर्य, ह्यांविषयीं इतिहासांत सविस्तर माहिती आहेच; फार कशाला, पुष्कळ वृद्ध मनुष्यांस त्या वेळच्या त्या गोष्टीहि प्रत्यक्ष आठवत असतील. परंतु दुसऱ्या कित्येक गोष्टी जर अनुकूळ नसत्या तर इंग्लिशांच्या नुसत्या शौर्यानेंच बंड कधींहि मोडलें गेलें नसतें. २००० बंडवाल्यांस १ इंग्लिश शिपाई ह्या प्रमाणानें बंडवाल्यांची संख्या होती; तर इतक्याशा इंग्रजांना बंड मोडून हिंदुस्थानांत सर्वत्र शांतता कधींहि राखितां आली नसती.

बंड मोडलें त्याचा प्रकार.

नेटिव्ह लोकांत **एकी** नव्हती म्हणूनच इंग्लिशांस हिंदुस्थानची सत्ता प्राप्त झाली होती; व ह्याच कारणानें नेटिव्ह शिपायांकडूनच नेटिव्ह शिपायांचें बंडहि त्यांना मोडितां आलें. जर नेटिव्हांत एकी असती तर ह्या दोन्हीहि गोष्टी घडल्या नसत्या. प्रथमतः बंडाचा उद्भव खरोखर नेटिव्ह

सैन्यांतच झाला; म्हणजे त्यांत प्रजेचा कांहीं संबंध न्व्ह-ता. तसेंच, सर्वच नेटिव्ह सैन्य उठलें होतें, असेंहि नाहीं. मुंबई व मद्रास इलाख्यांतील थोडेच शिपाई फितूर झाले होते. बंगाल्यांतील शिपा-यांत देखील पुष्कळ प्रामाणिक राहिले होते. "हिंदु-स्थानांतील **लोकांचें बंड**" असें स्वरूप ह्या बंडाला कधींच आलें नाहीं. दिल्लीचा वेढा, हावलाक साहेबाची बंडवाल्यांवर चाल, लखनौचा वेढा, अशा आणीबा-णीच्या प्रसंगीं, नेहमींसारखी नेआण करणें, जखमी शिपायांची शुश्रूषा करणें, स्वयंपाक करणें, वगैरे कामें नेटिव्ह शिपायांनींच केलीं; व हिंदुस्थानास स्वतंत्र कर-ण्याचा आव घालून लढणाऱ्या त्या बंडखोरांच्या तोफांच्या माऱ्यांत सांपडून कदाचित् आपण मरूं, अशाबद्दल देखील त्या प्रसंगीं त्यांनीं पर्वा केली नाहीं. इतकेंच न्व्हे, तर इंग्लिशांनीं नुकतेच जिंकिलेले जे पंजाबांतील शिख लोक ते इंग्लिशांपेक्षां बंगाली लोकांचा अधिक द्वेष करीत; व म्हणून ह्या बंगाली बंडखोरांबरोबर लढण्यास ते एका पायावर तयार असत. त्याचप्रमाणें शेजारच्या हिमालय पर्वताच्या डोंगरांतून राहणारे जे थोडेसे गुरखे लोक होते, ते आरंभीं आरंभीं इंग्लिशांस फार त्रास देत असत; परंतु ह्या वेळीं ते त्यांना अनुकूळ झाले होते. सारांश, फितूर न झालेले नेटिव्ह शिपाई व स्नेही राजां-ची मदत, ह्यांच्या योगानें इंग्लिशांना हें बंड मोडितां

आलें. हिंदुस्थानांत एकी नाहीं, ही गोष्ट ह्या बंडाच्या इतिहासावरून स्पष्टपणें दिसून आली. तसेंच, ह्या देशांत अनेक जाति व धर्म असल्यामुळें "राष्ट्र" ही संज्ञा ह्याला देतां येत नाहीं; भूगोलविषयक दृष्टीनें मात्र पाहिजे तर ह्या देशास राष्ट्र म्हणतां येईल, ही गोष्टहि ह्या बंडामुळें चांगली कळून आली.

ह्या बंडामुळें एक मोठा परिणाम घडून आला. तो कोणता म्हणाल, तर फार दिवसांची जी ही ईस्त

कंपनीचा शेवट.

इंडिया कंपनी तिचा शेवट. जिच्या संबंधानें एवढा मोठा इतिहास झाला, व जिनें आजपर्यंत इतक्या उलाढाली केल्या, ती कंपनी ह्या बंडामुळें मोडली, आणि तिचा अधिकार ह्यापुढें प्रत्यक्ष इंग्लंदच्या राजाकडे गेला. हिंदुस्थानाशीं फक्त ह्या कंपनीनेंच व्यापार करावा, अशी जी सनद कंपनीला मिळालेली होती, तिची मुदत संपून बरींच वर्षे झालीं होतीं, व आतां तिचा राज्यकारभाराचाहि अधिकार गेला. ही जी व्यवस्था झाली ती सर्वांस हितावहच होती.

ह्या बंडामुळें घडून आलेली आणखी एक महत्त्वाची गोष्ट अद्यापि सांगावयाची आहे. आरंभीं आरंभींच्या मोगल बादशहांनंतर सर्व हिंदुस्थान एकछत्री

राणी "एंप्रेस" (बादशाहीण) असा किताब घेते.

अमलाखालीं कधीं आलें नव्हतें, तें कंपनीनें उत्तम रीतीनें आपल्या अमलाखालीं

आणिलें त्या मोगल घराण्यांतील शेवटच्या बादशहांच्या हातीं राज्यसत्ता कांहींच राहिली नव्हती; तथापि त्यांचें पूर्वीचें वैभव अगदींच नष्ट झालें नव्हतें; व ते नामधारी बादशाह होतेच. परंतु ह्या बंडामुळें मोगल घराणें अगदींच लयास गेलें; व कांहीं वर्षेपर्यंत हिंदुस्थानांत नामधारीहि सार्वभौम राजा नव्हता. परंतु इ. स. १८७७त ही स्थिति बदलली. ह्या वर्षी राणीनें "हिंदुस्थानची बादशाहिण" ( एंप्रेस ऑफ् इंडिया ) अशी पदवी धारण केली; आणि दिल्लीच्या बादशहांच्या दुर्बलतेमुळें जी सत्ता त्यांच्या हातून गेली, ती इंग्लिशांनीं मिळविली असून मी इंग्लिशांची राणी असल्यामुळें ह्यापुढें त्यांच्या वतीनें ती सत्ता मीं आपल्या हातीं घेतली आहे, व माझ्या २५ कोटि प्रजेवर ह्यापुढें न्यायानें व दृढनिश्चयानें राज्य करण्याचा ठराव केला आहे, अशा अर्थाचे जाहीरनामे देशांत सर्वत्र लागले.

कंपनीच्या एकंदर इतिहासांत पुढील सन विशेष लक्षांत ठेवण्यासारखे आहेतः—१७४८;१७७३;१७९३; १८१३;१८३३ व १८५३. कंपनीच्या राज्यसत्तेस १७४८त आरंभ झाला; १७७३त रेग्युलेटिंग आक्ट पास होऊन सांप्रतचें " ब्रिटिश हिंदुस्थान " बनण्यास प्रारंभ झाला, व कंपनीच्या अधिकाराची मुदत २०।२० वर्षांची ठरली; व १८१३,१८३३ आणि १८५३ ह्या वर्षी तिच्या सनदांत कांहीं फेरफार होत

गेला. तसेंच लार्ड क्लैव्ह, लार्ड वेलस्ली, लार्ड हेस्टिंगस् व लार्ड दलहौसी हे ४ पुरुष वरील काळांत ध्यानांत ठेवण्यासारखे झाले. पहिल्यानें ब्रिटिश सत्ता पूर्व किनाऱ्यावर मद्रासपासून कलकत्त्यापर्यंत स्थापिली; दुसरा व तिसरा ह्यांनीं मराठ्यांची सत्ता नष्ट करून देशाच्या मध्यभागीं व पश्चिम किनाऱ्यावर सत्ता स्थापिली; व चौथ्यानें वायव्येकडील प्रदेशांत सत्ता स्थापून ब्रिटिश सरहद्द सिंधु नदीपर्यंत वाढविली.

शेवटीं हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या इतिहासासंबंधानें ४ काळ विशेष लक्षांत ठेवण्यासारखे आहेत, असें दिसून येईल. **१ ला काळ** लार्ड क्लैव्हचा. ह्या काळांत मुख्यत्वें ३ गोष्टी घडल्या त्याः—(१) फ्रेंच लोकांचा पराजय; (२) इंग्लिश शिपाई व नेटिव्ह शिपाई ह्यांच्या एकत्र सैन्यानें नेटिव्ह राजाचा केलेला पहिला पराजय; व (३) नेटिव्ह राजाच्या वतीनें बंगाल प्रांताच्या राज्यकारभाराचा कंपनीनें केलेला स्वीकार. **२ रा काळ** वारन हेस्टिंगस्चा. कंपनीच्या अंतःस्थितीची सुधारणा व इंग्लिश कामगारांनीं राज्यव्यवस्थेची केलेली उत्तम सुधारणा, ह्या महत्त्वाच्या गोष्टी ह्या काळांत घडल्या. **३ रा काळ** इ. स. १८५८ हा होय. कंपनीचा शेवट आणि इंग्लिश राष्ट्राकडून सर्व राज्याकारभाराचा स्वीकार, ह्या गोष्टी ह्या काळांत घडल्या. **४ था काळ** इ. स. १८७७. ह्यांत राणी सरकारानें "हिंदुस्थानची बादशाहीण" असा किताब घेतला.

वरील इतिहासाचे मुख्य काळ.

## प्रकरण दुसरें.

### हिंदुस्थानची हल्लींची स्थिति कशी आहे व हा देश इंग्रज लोक ताब्यांत कां ठेवितात.

हिंदुस्थानांतील ब्रिटिश राज्यसत्तेविषयीं पूर्णपणें विचार करणें सांप्रत अत्यन्त महत्त्वाचें आहे; कारण अलीकडील थोड्या वर्षांत ह्या देशांत विद्येचा विलक्षण प्रसार झाल्यामुळें राजकीय महत्त्वाच्या अनेक गोष्टी हल्लीं येथें घडून येऊं लागल्या आहेत, व त्यांमुळें ह्या विषयास फार महत्त्व आलें आहे. म्हणून हिंदुस्थानची हल्लींची स्थिति कशी आहे, व ब्रिटिश सत्ता येथें कायम राखण्यासाठीं युरोपांतील राष्ट्रांशीं लढायाहि इंग्लिशांनीं कां कराव्या, हें समजून घेण्यासारखें आहे.

ह्या प्रश्नाचा व्यवहारदृष्ट्या विचार करावयाचा आहे. हिंदुस्थानासारखें विस्तीर्ण राज्य आपल्या ताब्यांत असावें, अशा प्रकारच्या वैभवाची इंग्लिशांना विशेष पर्वा आहे किंवा नाहीं, ह्याचा विचार येथें कर्तव्य नाहीं. तथापि हें राज्य त्यांच्या ताब्यांत असल्यामुळें त्यांना कोणते महत्त्वाचे फायदे सांप्रत होत आहेत, व कांहीं भयंकर प्रसंग गुदरून हें त्यांच्या ताब्यांतून गेल्यास त्यांचे व त्यांच्या वंशजांचे कोणते तोटे होणार आहेत, ह्याविषयीं विचार करावयाचा आहे. हिंदुस्थानाचें कांहींका होईना, आपला त्याच्याशीं कांहीं संबंध

नाहीं, असें इंग्लंदांतील मजूर व त्यांच्या बायका नेहमीं म्हणतात; परंतु ही त्यांची मोठी चूक आहे हिंदुस्थान इंग्लिशांच्या ताब्यांत राहणें, ही गोष्ट इंग्लंदांतील कोणत्याहि स्थितींतील मंडळीला जितकी महत्त्वाची आहे, तितकीच ती मजुरांनाहि आहे; व हें पुढील एकंदर हकीगतीवरून स्पष्ट होईल. तसेंच ह्या देशाशीं इंग्लिशांचा जो संबंध आहे, त्याचें महत्त्व सांप्रत पुष्कळ वाढलें आहे, अद्यापि वाढत आहे, व पुढेंहि वाढणार आहे. ह्या सर्व गोष्टी स्पष्ट रीतीनें कळून येण्यास बरेच आंकडे विचारांत घ्यावे लागतील.

प्रथमतः हिंदुस्थानचा आकार केवढा आहे, व येथील लोकसंख्या किती आहे, याचा विचार करूं.

हिंदुस्थानची लोकसंख्या.

मागें दाखविलेंच आहे कीं, रशिया खेरीज सर्व युरोप खंडाचा जेवढा विस्तार आहे, तेवढा एकट्या हिंदुस्थानाचा आहे. परंतु युरोप खंडांतील तेवढ्याच प्रदेशाची लोकसंख्या सुमारें २४ कोटि असून हिंदुस्थानची २५॥ कोटि आहे. (पृष्ठ १८ मधील टीप पहा.) म्हणून हिंदुस्थानशीं इंग्लिशांचा व्यापार म्हणजे, रशियाखेरीज सगळ्या युरोप खंडांतील लोकसमूहापेक्षां जास्त लोकसमूहाशीं त्यांचा व्यापार असें स्पष्ट झालें; व अशा दृष्टीनेंच ह्या व्यापाराचा त्यांनीं विचार केला पाहिजे. हिंदुस्थानची ही २५ कोटि प्रजा सर्व प्रदेशांत सारखी वाटलेली नाहीं. नद्यांच्या कांठीं

ही वस्ती फार दाट आहे. उदाहरणार्थ, बंगालचा विस्तार फ्रान्स इतका आहे; परंतु तेथील लोकसंख्या फ्रान्सपेक्षां सुमारें २,८०,००,००० जास्त आहे. असें आहे तरी बंगाल्यांतील कित्येक जिल्ह्यांत डोंगरांच्या आजूबाजूचा मुलूख व कित्येक जंगलें ह्यांतून वस्ती मुळींच नाहीं. ह्या देशांतील लोकसंख्येपैकीं निमेहून अधिक लोक शेतकींत गुंतलेले आहेत. सर्व लोकसंख्येपैकीं शेंकडा ८० चा संबंध शेतकीशीं असतो; व इंग्लंदांत शेंकडा ८ जणांचाच असतो. तेव्हां एकंदरीनें हिंदुस्थान हें कच्चे पदार्थ उत्पन्न करण्याकडे सर्वांशीं लागलेलें आहे, असें मानिलें पाहिजे. म्हणून इंग्लंदची स्थिति ह्या देशाच्या स्थितीच्या अगदीं उलट आहे, असें सहज ध्यानांत येईल. इंग्लंदांतील कारखाने व इंग्लंदचा व्यापार हीं दरसाल वाढत आहेत. हिंदुस्थानांत शेतकऱ्यांशिवाय राहिलेल्या लोकांचे धंदे म्हटले म्हणजे उदीम व्यापार, कापड तयार करणें, धातूंचीं व मातीचीं भांडीं करणें, वगैरे आहेत; व बरेच लोक केवळ भिक्षा मागून चरितार्थ करणारे आहेत. ज्या लोकसमूहावर राज्य करण्याचें जोखीम इंग्लिशांवर पडलें आहे, तो वरील प्रकारचा आहे.

हिंदुस्थानांतील प्रदेशाचे दोन मुख्य भाग आहेत. १ला भाग म्हणजे खुद्द ब्रिटिश सरकारच्या ताब्यांतील प्रदेश व २रा भाग म्हणजे नेटिव्ह संस्थानिकांच्या ताब्यांतील प्रदेश. मागील प्रकरणांत सांगितल्या-

हिंदुस्थानांतील नेटिव्ह संस्थानें.

प्रमाणें कित्येक प्रांतांवर नामधारी राजे ठेवून त्या प्रांतांचा राज्यकारभार कंपनीनें आपल्याकडे घेतला होता. कित्येक नेटिव्ह संस्थानिकांबरोबर तिनें तह केले होते. आपल्या पदरीं मोजकें सैन्य ठेवणें, परराष्ट्रांशीं सल्ला मसलत न करणें, ब्रिटिश सरकारची सल्ला मसलत घेण्यासाठीं ब्रिटिश रेसिडेंत आपल्या दरबारीं ठेवणें, व कधीं कधीं खंडणी देणें, इत्यादि गोष्टी ह्या तहांत ठरलेल्या होत्या. हाच कंपनीचा क्रम १८५८नंतर इंग्लिश सरकारानेंहि चालू ठेविला; आणि १८७७त राणीनें "बादशाहीण" ( एंप्रेस ) अशी पदवी स्वीकारिल्यामुळें सर्व नेटिव्ह संस्थानिकांत ती प्रमुख झाली; मग तीं संस्थानें प्रत्यक्ष इंग्लिश सरकारच्या ताब्यांत असोत वा नसोत.

नेटिव्ह संस्थानें हल्लीं हिंदुस्थानांत सुमारें १००० असून त्या सर्वांची मिळून हिंदुस्थान सरकारास सालीना सुमारें ७२,५०,०००रुपये खंडणी मिळत आहे. तसेंच ह्या सर्व संस्थानिकांचें एकंदर सैन्य ३,८१,००० आहे. ह्या सर्व संस्थानांत महत्त्वाचें संस्थान हैदराबादच्या निजामाचें होय. हें संस्थान इंग्लिश सरकारास सैन्याची मदत देण्यास नुकतेंच इ. स. १८८५त तयार झालें होतें. निजामाच्या राज्यांत १ कोटीवर लोकसंख्या आहे. म्हणजे आयर्लंद व स्काटलंद ह्यांची लोकसंख्या एकत्र

केली असतां जी संख्या होणार तिजपेक्षांहि ह्या संस्था-नाची लोकसंख्या जास्त आहे. म्हैसूर हेंहि एक महत्त्वाचें संस्थान आहे; त्याची राजधानी म्हैसूर शहर आहे. ह्या संस्थानची लोकसंख्या ४०,००,००० म्हणजे स्कातलंदा-पेक्षां जास्त आहे; व आणखी दुसरीं ८ मोठालीं संस्थानें असून त्यांतील प्रत्येकाची लोकसंख्या १०,००,००० वर आहे. हे राजे व्हाइसराय साहेबास भेटावयास जातात, तेव्हां त्यांच्या सन्मानार्थ ज्या*तोफा झडतात, त्या तोफां-च्या संख्यांच्या प्रमाणानेंच ह्यांचे मानमरातब असतात. ह्यांचें राज्य ह्यांच्या वंशांकडे चिरकाळ चालविण्याविषयीं ब्रिटिश सरकारचें ह्यांना अभिवचन असतें; तथापि ह्यांनीं आपल्या मुलखांत कांहीं एक नियमित प्रमाणानें उत्तम प्रकारची राज्यव्यवस्था ठेविली पाहिजे, असा बोजा ह्यांच्या शिरावर असतो. ह्याप्रमाणें चांगल्या प्रकारची राज्यव्यवस्था न ठेविल्यामुळें कित्येक राजांना पदच्युतहि करण्यांत आलें आहे. ह्या सर्व नेटिव्ह संस्थानांतील लोक संख्या सुमारें ५ कोटि म्हणजे जर्मनींतील लोकसंख्येपेक्षां

*हिंदुस्थानांतील मुख्य मुख्य संस्थानिकांना सन्मानार्थ ज्या तोफा आहेत, त्या पुढें लिहिल्याप्रमाणें:—बडोदें २१; हैदराबाद (निजाम) २१; म्हैसूर २१; भोपाळ १९; काश्मीर १९; ग्वाल्हेर १९; इंदूर १९; कोल्हापूर १९; मेवाड १९; त्रावणकोर १९; भावलपूर १७; भरतपूर १७ आणि बिकानेर १७. शिवाय खुद्द राणी सरकारास १०१, गव्हर्नर जनरल (व्हाइसराय) यांस ३१, मुंबई व मद्रास येथील गव्हर्नरांस १७ व बंगाल, वायव्य प्रांत आणि पंजाब येथील लेफ्तेनंत गव्हर्नरांस १५ तोफा आहेत.

जास्त आहे. म्हणून राणी सरकारच्या प्रत्यक्ष अमला-खालीं असणारी लोकसंख्या सुमारें २० कोटि राहिली.

हिंदुस्थानचा राज्यकारभार समजून घेणें फार घोटाळ्याचें आहे. कंपनीची राज्यपद्धति व इंग्लिश राज्य-

हिंदुस्थानची राज्यपद्धति.

पद्धति ह्यांच्या संमेलनामुळें हा घोटाळा झाला आहे. ह्यांतील महत्त्वाच्या गोष्टी पुढें थोडक्यांत सांगि-तल्या आहेत. इंग्लिश राज्यपद्धतीच्या नियमाप्रमाणें हिंदुस्थानासंबंधी सर्व राज्याधिकार राणी आपल्या एका प्रधानाच्या द्वारें चालविते; व एकंदर राज्यकारभाराबद्दल ह्या प्रधानाला पार्लमेंट सभा जबाबदार धरिते. ह्याला "सेक्रेटारी ऑफ् स्टेट फॉर इंडिया" ( हिंदुस्थानचा स्टेट सेक्रेटरी ) म्हणतात. हा इंग्लंदच्या मंत्रिमंडळामध्यें ( क्याबिनेटमध्यें ) असावयाचाच. स्टेट सेक्रेटरीस मदत करण्याकरितां एक कौन्सिल म्हणजे मंत्रिसभा असते. हिंदुस्थानासंबंधी कामकाजांचा ज्यांना अनुभव असतो, असेच सभासद ह्या सभेंत असतात; व त्यांची नेमणूक राजाकडून होते. परंतु त्यांच्या अभिप्रायाप्रमाणें वागलेंच पाहिजे, असें बंधन स्टेट सेक्रेटरीवर नाहीं. त्याच्या मर्जीस वाटेल तेव्हांच तो ह्या सभासदांच्या अभिप्रायाप्रमाणें चालतो.

राणी सरकारचा हिंदुस्थानांतील प्रतिनिधि **व्हाइ-सराय** हा होय. ज्या पक्षाच्या प्रधानमंडळाकडे अधि-कार असतो, त्या पक्षाच्या मताप्रमाणेंच बहुधा अलीकडे व्हाइसराय राज्यकारभार पाहतो, म्हणजे लिबरल पक्षाचें

प्रधानमंडळ असलें, व व्हाइसराय स्वतः कान्सरव्हेटिव मताचा असला, तरी त्याला लिबरल पक्षाच्या मताप्रमाणें राज्यकारभार करावा लागतो; व असें करण्यास तो कबूल नसेल तर तो राजीनामा देऊन जातो. "व्हाइसराय" हा हुद्दा त्याला अलीकडे मिळालेला आहे; परंतु ह्याचा वास्तविक फार दिवसांचा हुद्दा "गव्हर्नर जनरल" हा होय. मुंबई, मद्रास व बंगाल ह्या तीन इलाख्यांच्या गव्हर्नरांवर बंगालच्या गव्हर्नरास मुख्य नेमून त्यालाच "गव्हर्नर जनरल" हा हुद्दा दिला; व ही व्यवस्था इ. स. १७७३त झाली. ह्याला मदत करण्यास एक मंत्रिमंडळ ( कौन्सिल ) असतें. त्यांत ७ सभासद असतात; व त्यांना आर्डिनरी (साधारण) सभासद म्हणतात; आणि त्यांची नेमणूक राणीच्या वतीनें हिंदुस्थानचें स्टेट सेक्रेटरी करितात. ह्या सातांमध्यें एक नेहमीं हिंदुस्थानचा सेनाधिपति असतो. तसेंच त्यांत एक नेहमीं जमाखर्च पाहणारा ( फिनॅन्शल ) सभासद असतो; व एक कायद्यांसंबंधी ( लीगल ) सभासद असतो. साधारणपणें पाहिलें असतां ह्या मंत्र्यांच्या बहुमताप्रमाणें व्हाइसरायानें वागावयाचें; परंतु विशेष प्रसंगी त्यांचें मत एकीकडे ठेवून आपल्याच मताप्रमाणें तो वागतो. ह्या ७जणांच्या प्रधानमंडळास एक्झिक्यूटिव्ह ( प्रवर्तक ) कौन्सिल म्हणतात. कायदेकानू करण्यासाठीं व्हाइसराय आणखी कांहीं सभासद नेमितात; व त्यांना आडिशनल ( अधिक )

सभासद म्हणतात; आणि ह्यांपैकीं कांहीं तरी नेटिव्ह असतात. ह्या कायदे करणाऱ्या कौन्सिलास *लेजिस्लेटिव्ह ( विधायक ) कौन्सिल म्हणतात. प्रवर्तक कौन्सिलांतले ७ सभासद ह्या विधायक कौन्सिलांतहि असतात.

सर्व हिंदुस्थानावर व्हाइसराय ह्यांची साधारण देखरेख असते; परंतु ह्या देशांत पुष्कळ स्थानिक सरकारेंहि आहेत. ह्यांत अति महत्त्वाचीं मद्रास व मुंबई हीं होत. ह्यांतील प्रत्येकावर गव्हर्नर असतो. गव्हर्नरांची नेमणूक इंग्लंदाहून होते, व त्यांना कांहीं नियमित स्वातंत्र्य असतें. बंगाल, वायव्येकडील प्रांत व औद ( अयोध्या ) आणि पंजाब ह्या तिहींवर तीन लेफ्तेनेंत गव्हर्नर आहेत. ब्रह्मदेश, आसाम व मध्य प्रांत (सेंत्रल प्राव्हिन्सेस ) ह्या तिहींवर चीफ कमिशनर आहेत. ह्या सर्व प्रांतांचे जिल्हे केलेले आहेत. हिंदुस्थानांतील राज्यका-

*हिंदुस्थानांतील कौन्सिलांच्या सुधारणेचा कायदा पार्लमेंटानें १८९२ त पसार केला आहे. त्या अन्वयें निरनिराळ्या विधायक ( लेजिस्लेटिव्ह ) कौन्सिलांतील अधिक ( ऍडिशनल) सभासदांची संख्या पुढें लिहिल्याप्रमाणें ठरविली आहे:—हिंदुस्थानच्या म्हणजे गव्हर्नर जनरल ह्यांच्या कौन्सिलांत १०—१६ पर्यंत; मद्रास व मुंबई येथील कौन्सिलांत ( आड्व्होकेट जनरलशिवाय ) ८–२० पर्यंत; बंगालच्या कौन्सिलांत २० पर्यंत; आणि वायव्येकडील प्रांत व औद येथील कौन्सिलांत १५ पर्यंत. ( ह्यांशिवाय प्रवर्तक कौन्सिलांतील सभासद ह्यांत असावयाचे ते निराळेच. ) तसेंच ह्यांतील नियमित सभासद निवडून देण्याचा अधिकार युनिव्हर्सिटया, म्युनिसिपालिटया, लोकल बोर्डें, चेंबर्स ऑफ् कॉमर्स ( व्यापाऱ्यांच्या सभा ) वगैरे संस्थांना देण्यांत आला आहे.

रभाराचा पाया म्हटला म्हणजे हा जिल्हा होय. जिल्ह्यावरील मुख्य अधिकाऱ्याला जमाबंदी संबंधानें कलेक्टर व फौजदारी संबंधानें डिस्ट्रिक्ट माजिस्ट्रेट म्हणतात. पूर्वी ह्या कामगाराचें मुख्य काम फक्त जमिनीचा वसूल गोळा करण्याचें असे, व तेव्हांपासून कलेक्टर हा हुद्दा चालत आला आहे. कलेक्टर हा हिंदुस्थानांतील राज्यसूत्रांचा आदि चालक होय. प्रत्येक जिल्ह्यांतील प्रदेशाचा विस्तार कमजास्त असतो; परंतु त्यांतील लोकसंख्या साधारणपणें १० लक्षांपेक्षां जास्त असते; व ह्या सर्वांवर कलेक्टरचा व त्याच्या हाताखालच्या अंमलदारांचा पूर्ण अंमल असतो.

हिंदुस्थानची राज्यपद्धति इंग्लंदच्या राज्यपद्धतीहून फार भिन्न आहे. परराष्ट्रानें हल्ला केल्यास संरक्षण करणें, व न्यायाचीं कोर्टें चालविणें, इतकींच कायतीं सरकारचीं कामें आहेत, असें इंग्लिश लोक मानितात, इतर कोणत्याहि कामांत सरकारची मदत ते मिळवूं इच्छित नाहींत. सर्व प्रकारची स्थानिक स्वराज्याची व्यवस्था त्यांची तेच करितात. तसेंच तेथील शहरांच्या म्युनिसिपालिट्यांच्या कौन्सिलरांची ( सभासदांची ) निवड ते लोकच करितात; आणि ते सभासद नंतर मेयरची ( प्रेसिडेंटाची ) निवड करितात. हे शहरचे सभासद शहरांतील कामकाजांच्या व्यवस्थेकरितां आपल्यांतीलच कित्येकांची एक पोट कमिटी नेमितात.

ती कमिटी घरपट्टी वगैरे ठरविते; व शहराच्या सुधारणे- संबंधी सर्व प्रकारचीं कामें करिते. म्युनिसिपल कमिट्यांशिवाय शाळांसंबंधी कमिटचा ( स्कूल बोर्ड्स् ) व लोकलबोर्डासारख्या संस्था ( बोर्ड्स् ऑफ् गार्डियनस्) आहेत; व त्यांतील सभासदांची निवडहि तेच करितात. सारांश, प्रत्येक शहरासंबंधी कामकाजांची व्यवस्था अप्रत्यक्ष रीतीनें त्या शहरांतील लोकच करितात, असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. म्युनिसिपालिट्यांच्या अधिकारांत नसणारें एखादें कृत्य करणें झाल्यास शहरांतील कित्येक उद्योगी पुरुष तें हातीं घेतात, व तें तडीस नेण्यासाठीं कंपनी तयार करितात.

आतां हिंदुस्थानांत ह्याच्या अगदीं उलट प्रकार आहे. येथें लोक आपण होऊन कोणतेंहि कृत्य करीत नाहींत; सर्व प्रकारची व्यवस्था सरकारासच करावी लागते. म्हणून इंग्लंदांतील शहरांतून जी व्यवस्था म्युनिसिपालिट्या करितात, किंवा खेड्यांतून माजिस्ट्रेट व लोकलबोर्डें वगैरे करितात, ती सर्व व्यवस्था हिंदुस्थानांत प्रत्येक जिल्ह्यावरील मुख्य अधिकारी जो कलेक्टर त्याला त्याच्या जिल्ह्यापुरती करावी लागते. ह्यामुळें कलेक्टराला फार काम पडतें. 'कलेक्टर' ह्या नात्यानें त्याच्या जिल्ह्याच्या जमाबंदीची जबाबदारी त्याच्यावर असते. तसेंच माजिस्ट्रेट ह्या नात्यानें त्याच्या जिल्ह्याच्या शांततेची व त्यांतील लोकांच्या कल्याणाची जबाबदारी त्याच्याच

शिरावर असते; आणि त्याजकडे आलेल्या बारीक सारीक खटल्यांचा निकाल करून मोठाले खटले त्याला वरिष्ठ कोर्टाकडे पाठवावे लागतात. शिवाय त्याच्या इलाख्यावरील गव्हर्नर जी जी माहिती विचारील ती ती माहिती त्याला गव्हर्नरास द्यावी लागते; आणि गव्हर्नराच्या मनांत जी गोष्ट करण्याचें येईल, ती सिद्धीस नेण्याचीं साधनेंहि त्यालाच पुरवावीं लागतात. कांहीं शहरांतील लोकांस × स्थानिक–स्वराज्यसंबंधी थोडा बहुत अधिकार आहे. परंतु साधारणपणें पाहिलें असतां हिंदुस्थान सरकार हें एक प्रकारचें जुलमी सरकार आहे. मात्र हें जो जुलूम लोकांवर करितें, तो खरोखरीचा जुलूम नसून लोकांच्या कल्याणाचा जुलूम असतो. सारांश, सार्वजनिक कल्याणाचें एकहि काम लोकांकडून होत नसल्यामुळें सर्व कामें सरकारास करावीं लागत आहेत.

---

× म्युनिसिपालिट्या, लोकलबोर्डें वगैरे संस्थांच्या सभासदांपैकीं कांहीं नियमित सभासद निवडून देण्याचा अधिकार हिंदुस्थानचे माजी व्हाइसराय लार्ड रिपन ह्यांच्या कारकीर्दीत प्रजेला मिळाला, व तेव्हांपासून ह्या स्थानिक संस्थांना अधिकाधिक महत्त्व येऊं लागलें आहे. तसेंच थोड्या दिवसांपूर्वी ( इ. स. १८९२ त ) पार्लमेंटांत पसार झालेल्या "इंडियन कौन्सिल्स् ऍक्टाच्या सुधारणेच्या कायद्याच्या" अन्वयें विधायक ( लेजिस्लेटिव्ह ) कौन्सिलांतील अधिक (ऍडिशनल) सभासद नेमण्याच्या संबंधानें जे नियम करण्यांत आले आहेत, त्यांप्रमाणें कांहीं सभासद निवडून देण्याचा अधिकार ह्या संस्थांना मिळाला आहे; व म्हणून ह्यांचें महत्त्व पुढेंहि वाढत जाईल असें अनुमान आहे.

ही स्थानिकस्वराज्याची स्थिति झाली. देशांतल्या देशांत स्वस्थता राखण्याचें काम हिंदुस्थानांत फार सुलभ आहे. हिंदुस्थानांत दर १२०० मनुष्यांस १ ह्या प्रमाणानें पोलिसची संख्या आहे; परंतु इंग्लिश लोक कायदेशीर रीतीनें अधिक भांडणारे असल्यामुळें इंग्लंदांत दर ६३५ मनुष्यांस १ ह्या प्रमाणानें पोलीस लागतात. न्यायाची सत्ता व अंमल बजाविण्याची सत्ता ह्या निरनिराळ्या अधिकाऱ्यांकडे आहेत. तसेंच दिवाणी व फौजदारी खटल्यांच्या चौकशीकरितां इंग्लंदांतल्याप्रमाणेंच हिंदुस्थानांतहि कोर्टांची मालिका आहेच. कलकत्ता, मद्रास, मुंबई व अलाहाबाद येथें हायकोर्टें आहेत. हायकोर्टांच्या जज्यांपैकीं बहुतेक इंग्लिश असून थोडे नेटिव्ह असतात. येथें चालणारे दिवाणी कायदे कांहीं अंशीं देशाच्या चालीरितीस धरून व कांहीं अंशी इंग्लिश कायद्यांस धरून ठरविलेले आहेत. तसेंच लार्ड मेकाले ह्या विख्यात बुद्धिमान् पुरुषानें केलेल्या नियमांच्या आधारानें फौजदारी कायदे ठरविलेले आहेत. देशाच्या संरक्षणास जें सैन्य आहे त्यांत इंग्लिश सुमारें *६०,००० आहेत; व नेटिव्ह त्यांच्या दुपटीहून म्हणजे १,२०,०००हून कांहीं अधिक आहेत.

ह्या देशांतील सैन्य.

* १८८७ मध्यें हे आंकडे पुढें लिहिल्याप्रमाणें होते:—युरोपियन ६९,७६४; नेटिव्ह १,४१,०००; मिळून एकंदर सैन्य २,१०,७६४.

सारांश, २ नेटिव्ह शिपायांस १ इंग्लिश शिपाई हें प्रमाण हल्लीं आहे. १८५७च्या बंडापूर्वी हें प्रमाण ३:१होतें; व कंपनीच्या अमलाच्या प्रारंभीं तर कधीं कधीं ५:१ होतें.

इतकें मोठें लष्करी सैन्य व शिवाय पोलीस सैन्य ठेवणें मोठ्या खर्चाचें काम आहे, हें उघड आहे. तथापि हा एकंदर खर्च हिंदुस्थानच्या तिजोरींतून चालला आहे. वसूल गोळा करणें हें काम हिंदुस्थानांत फारच सोपें आहे. फक्त बंगाल्यांत मात्र मोठ मोठे पुष्कळ जमीनदार आहेत. ते इंग्लंदांतल्याप्रमाणें आपल्या जमिनी शेतकऱ्यांस लागवडीस देतात. ह्याशिवाय इतर सर्व ठिकाणच्या जमिनींवर सरकारचें पूर्ण स्वामित्व आहे; व लागवड करणाऱ्यापासून भाड्यादाखल सरकार धारा घेतें; आणि हिंदुस्थानांतील जमाबंदीची मुख्य बाब हीच आहे. जमिनीच्या धाऱ्याशिवाय मिठावर कर आहे. दरसाल दर माणशीं सुमारें ७ पेन्स ह्या प्रमाणानें हा कर आहे. बाकीच्या जमेच्या बाबी म्हटल्या म्हणजे अफूवरील कर, कष्टमचे कर, वगैरे होत. इन्कम्×टॅक्स [प्राप्तीवरील कर] हिंदुस्थानांत

येथील जमेच्या बाबी.

×अलीकडे ५००रुपयांपेक्षां ज्यांचें सालीना उत्पन्न जास्त आहे, असे सर्व व्यापारी, शेट सावकार, सरकारी कामगार, वगैरे ह्यांजवर दरसाल दर रुपयास ४पै प्रमाणें इन्कम टॅक्स बसविला आहे. मात्र २०० रुपयांहून अधिक टॅक्स कोणावर नसतो.

मुळींच नाहीं; व ह्यामुळें ज्यांच्या जमिनी नाहींत, परंतु जे व्यापारी किंवा सावकार आहेत, त्यांच्यापासून सरकारच्या तिजोरींत फारच थोडा पैसा जातो.

हिंदुस्थानांतील सैन्यास ३ धोक्यांच्या संबंधानें सावधगिरी ठेवावी लागते; ( १ ) नेटिव्ह संस्थानिकांचें त्यांच्या ३,८०,००० सैन्यासह बंड;( २ ) ब्रिटिश हिंदुस्थानांतच बंडाचा उद्भव; व (३) परराष्ट्राची स्वारी. ज्याच्या संबंधानें हल्लीं फार भीति आहे, तो ३रा धोका

ह्या देशाचें संरक्षण.

होय; कारण परराष्ट्राची मदत आल्याशिवाय पहिले दोन धोके येण्याची हल्लीं फारशी भीति नाहीं. इंग्लिशांना मोठी भीति काय ती रशियाची आहे. रशियन लोकांना हल्ला करणें झालें तर अफगाणिस्थानांतील दोन रस्त्यांपैकीं कोणत्या तरी रस्त्यानें केला पाहिजे. पहिला रस्ता काबुल व खैबर खिंडीमधून, व दुसरा कंदहार व क्वेटावरून. ह्या दोहोंतून कोणत्याहि रस्त्यावर आपलीं सैन्यें आपणांस त्वरित गोळा करितां यावीं, हा हिंदुस्थान सरकारचा हल्लींचा मुख्य हेतु आहे; व म्हणून हिंदुस्थानांतील मोठमोठ्या रेल्वेच्या रस्त्यांची अशी व्यवस्था केलेली आहे कीं, तिच्या योगानें कलकत्ता, मद्रास व मुंबई ह्यांचा ह्या सरहद्दीशीं निकट संबंध जोडिला गेला आहे. तसेंच सिंधु नदीच्या मुखापाशीं असणाऱ्या कराची शहरापासून खैबर खिंडीशीं असलेल्या पेशावर शहरापर्यंतहि रेल्वे रस्ता केला आहे;

अशासाठीं कीं तसाच प्रसंग आल्यास इंग्लंदाहून आणिलेल्या सैन्यास सरहद्दीच्या अगदीं नजीकच्या बंदरांत उतरून तावडतोब धोक्याच्या ठिकाणीं नेतां यावें.

हिंदुस्थानच्या संरक्षणाच्या कामीं इंग्लिशांस यश येणें मुख्यत्वें दोन गोष्टींवर अवलंबून आहे. ह्यांपैकीं **पहिली गोष्ट अफगाणिस्थानाशीं त्यांचा संबंध**, ही होय. त्या देशांतून आल्याशिवाय रशियन लोकांस हिंदुस्थानांत येतांच येणार नाहीं. एक तर ह्या कामीं त्यांस अफगाण लोकांचें साहाय्य मिळालें पाहिजे; अथवा अफगाण लोकांशीं लढाई करून आपला रस्ता त्यांना जबरीनें खुला करून घेतला पाहिजे. रशियाच्या मनांत स्वारी करण्याचें आल्यास त्याला लढाई करण्याचाच प्रसंग यावा, असा इंग्लिश सरकारचा हेतु असून त्या धोरणानेंच त्यांचीं कारस्थानें हल्लीं सुरू आहेत; म्हणजे अफगाणिस्थानच्या अमिराशीं जितका मित्रभाव ठेववेल, तितका ठेवण्याची खटपट आहे. अफगाण लोक जर रशियास अनुकूळ झाले तर त्यांना १,००,००० सैन्य आयतेंच मदत मिळाल्याप्रमाणें होईल. हे अफगाण लोक लिचेपिचे नसून ज्यांनीं पूर्वी दोनदां हिंदुस्थान जिंकिलें अशा लोकांचे हे वंशज होत. आतां अफगाण लोक प्रतिकूळ असतांहि जर रशियन लोक ह्या देशांत शिरले तर ते रानटी अफगाण लोक इंग्लिशांच्या बाजूस

ह्या संरक्षणासंबंधानें अफगाणिस्थानाचें महत्त्व.

आल्याप्रमाणेंच होईल; आणि अशा स्थितींतहि जर रशियन लोक अफगाणिस्थानांतील खिंडींतून हिंदुस्थानावर हल्ला करण्यास येऊं लागले, तर त्यांच्या सैन्याच्या अघाडीवर इंग्लिश फौजेचा मारा होऊन पिछाडीवर ह्या अफगाणांच्या टोळ्यांचे निर्दयपणाचे हल्ले होतील. ह्यावरून पराक्रमी अशा अफगाण लोकांशीं स्नेहभाव ठेवणें इंग्लिशांस किती आवश्यकतेचें आहे, हें सहज ध्यानीं येईल; व म्हणूनच अफगाण लोक आपले हल्लीं स्नेही आहेत, ह्याबद्दल त्यांना आनंद मानण्यास हरकत नाहीं. ह्यास्तव हिंदुस्थान कबज्यांत ठेवण्यासाठीं अफगाणिस्थानाशीं स्नेह ठेवण्याचें जोखीम त्यांच्यावर येतें.

**दुसरी गोष्ट हिंदुस्थानांत इंग्लंदाहून जाण्यायेण्याचा रस्ता खुला ठेवणें**, ही होय.

सुएझच्या कालव्याचें महत्त्व.

ह्याच संबंधानें ह्या रस्त्याचा मध्यभाग सुएझचा कालवा होय. सुएझ कालव्यापर्यंतच्या इंग्लिशांच्या रस्त्याचें संरक्षण जिब्राल्टर व माल्टा ह्यांच्या योगानें हल्लीं होत आहे. ह्या रस्त्यानें सुएझच्या कालव्यांतून तांबड्या समुद्रांतून एडनपर्यंत व तेथून सिंधु नदीच्या मुखाशीं असलेल्या कराचीपर्यंत इंग्लिशांना जोंपर्यंत सुरक्षितपणें येतां येईल, तोंपर्यंत हिंदुस्थानच्या सरहद्दीवर त्यांना इंग्लंदाहून ३ आठवड्यांत सैन्य पाठवितां येईल. रशियाला युरोपांतून अफगाणिस्थानच्या सरहद्दीवर सैन्य पाठविण्यास जो काळ लागणार त्यापेक्षां वरील

काळ फार कमी आहे. म्हणून सुएझचा कालवा चांगल्या स्थितींत असून जाण्या येण्यास खुला आहे, तोंपर्यंत सैन्य- नेण्या आणण्याच्या संबंधानें रशियापेक्षां इंग्लिशांस जास्त सवलत राहणार आहे; परंतु त्यांनीं सुएझ कालवा जर शत्रूंच्या हातीं जाऊं दिला, अथवा त्याचा नाश होऊं दिला, [ आणि असा नाश अंदाधुंदीच्या वेळीं त्याजकडे लक्ष न दिल्यास लवकरच होईल, ] तर मग त्यांना केप आफ गुड होपच्या जुन्या रस्त्यानें सैन्य पाठविणें भाग पडेल; व असें झालें असतां त्यांच्यापेक्षां सरहद्दीचें ठिकाण रशियास * अधिक जवळ होईल.

हिंदुस्थान ताब्यांत असल्यामुळें इंग्लिशांवर काय जबाबदारी आली आहे, त्याजबद्दल थोडी हकीगत आतां- पर्यंत सांगितली. अफगाणिस्थान आपणांस अनुकूळ राहील असें करणें, व सुएझच्या कालव्याचें स्वातंत्र्य व

हिंदुस्थानापासून इंग्लंदास फायदे काय आहेत?

सुरक्षितपणा सदोदित कायम राखणें ह्या दोन महत्त्वाच्या गोष्टींची जबाबदारी हिंदुस्थान ताब्यांत असल्यामुळें त्यांच्यावर पडली आहे, असें वर स्पष्ट करून दाखविलेंच आहे. परराष्ट्रांशीं त्यांचे जे बखेडे उत्पन्न होतात, त्यांपैकीं बहुतेक वरील २ जबाबदाऱ्यांमुळेंच उत्पन्न होतात; व म्हणून ह्या गोष्टी अगदीं

---

* मध्य एशियांतील रशियन रेलवेचें काम दिवसें दिवस वाढत चाललें असल्यामुळें, जेव्हां कधीं लढाईचा प्रसंग येईल तेव्हां, रशियाला इंग्लिशांपेक्षां सरहद्दीवर सैन्य आणण्यास किती काळ कमी लागेल, तें आजच नक्की ठरविणें अशक्य आहे.

स्पष्ट रीतीनें ध्यानांत आणिल्या पाहिजेत; कारण हिंदुस्थान ताब्यांत असल्यापासुन त्यांना तोटे म्हणून जे आहेत ते हे तंटे बखेडे होत. म्हणून हे तंटे बखेडे सोसण्यापासून त्यांना फायदे काय आहेत ते पाहूं.

इतर ब्रिटिश वसाहतींपासून त्यांना जे फायदे होतात ते पुढें लिहिल्याप्रमाणें:—

१—इंग्लंदांतील लोकसंख्या फार वाढत चालल्या-मुळें त्या वाढणाऱ्या लोकसमूहाला ह्या वसाहतींमुळें राहण्यास नवीन जागा झाली आहे.

२—ह्या वसाहतींमुळें त्यांचें सामर्थ्य फार वाढलें आहे.

३—ह्या वसाहतींमुळें त्यांच्या मालाचा खप फार वाढला आहे.

इतर वसाहतींपासून होणारे हे तिन्ही फायदे हिंदुस्थानापासून त्यांना होत आहेत, असें म्हणतां येत नाहीं. इंग्लिशांच्या वाढत चाललेल्या लोकसमूहाला राहण्यास हा देश हल्लीं उपयोगी पडत नसून पुढेंहि पडण्याचा संभव नाहीं. कांहीं इंग्लिश लोकांस चाकऱ्या व काम-काज हिंदुस्थानांत मिळेल; परंतु हा देश असा आहे कीं, जो कोणी येथें येतो तो इंग्लंदांत परत जाण्याच्या आशेनें येतो; स्वतःचें घरच तो ह्या देशांत बांधील असा हा देश नाहीं; कारण येथील हवा इतकी उष्ण आहे कीं, ती त्या लोकांस मानवत नाहीं. युरोपांतील प्रौढ

माणसांस येथील हवा वाईट असून लहान मुलांस त घातकच आहे. म्हणून इतर वसाहतींपासून असलेल पहिला फायदा हिंदुस्थानापासून त्यांना मुळींच नाहीं असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं.

तर मग दुसरा फायदा तरी आहे किंवा कसें त्याचा विचार करूं. हिंदुस्थानामुळें त्यांच्या सामर्थ्यांत भर पडत आहे काय ? पडते, असें म्हणतां येईल दिसत नाहीं. माल्टा व सौदन येथें हिंदुस्थानांतील सैन्य मदतीस आणिलें होतें, व त्यामुळें इंग्लिशांना यश येऊ न त्या त्या ठिकाणीं त्यांचें सामर्थ्य वाढलें असें, ह्या संबं धानें कदाचित् कोणी म्हणतील, परंतु ही गोष्ट क्षुल्लक आहे. हिंदुस्थानांतील एकून एक शिपाई त्यांना कधीं हि काढितां येणार नाहीं. इतर वसाहतींचें असें नाहीं त्या त्यांचें स्वतःचें संरक्षण करितात, व प्रसंगीं इंग्लि शांसहि मदत करितात, ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे हिंदुस्थानापासून त्यांच्या सामर्थ्यांत भर पडत नाहीं एव ढेंच नाहीं, तर हिंदुस्थान ताब्यांत आहे म्हणून पररा ष्ट्रसंबंधी राजकारस्थानांच्या बाबतींत त्यांना वारंवा मोठी काळजी उत्पन्न होते; आणि रशिया, ईजिप्त तुर्कस्थान ह्या देशांशीं त्यांचे वारंवार बखेडे पडतात हिंदुस्थान ताब्यांत नसतें तर त्यांना ह्या बखेड्यांची जरूर नव्हती. सारांश इतर वसाहतींपासून होणारा दुसरा फायदाहि ह्या देशापासन त्यांना होत नाहीं.

हिंदुस्थानापासून त्यांना जो फायदा होतो तो केवळ तिसऱ्या प्रकारचा, म्हणजे व्यापारासंबंधाचा होय. ह्या व्यापाराचें महत्त्व समजण्यासाठीं बऱ्याच आंकड्यांची घडामोड करावी लागणार आहे. हे आंकडे होतील तितक्या सुलभ व ठोकळ रीतीनें विचारांत घेऊं.

हिंदुस्थानच्या व्यापारीची वृद्धि.

इ. स. १८१४पर्यंत हिंदुस्थानाशीं व्यापार करण्याची सनद फक्त ईस्त इंदिया कंपनीलाच होती. त्या वेळीं व्यापार फारच थोडा होता. *जरसी अथवा आइल आफ मॅन बेटाबरोबर जेवढा इंग्लंदचा व्यापार हल्लीं चालतो तेवढाच तो होता, असें म्हटलें तरी चालेल. तसेंच हिंदुस्थानांतील लोकांच्या रितीभाती इतक्या ठाम आहेत कीं, युरोप खंडांत तयार झालेले पदार्थ ते कधींहि खरेदी करणार नाहींत, असा त्या वेळचा अजमास होता. इ. स. १८१४ पासून व्यापार करण्याची सर्वांस मुभा मिळाली; व पुढच्या ३०वर्षांत हा व्यापार १८,००,००,००० रुपये किंमतीपर्यंत, म्हणजे कानडा देशाशीं त्यांचा जितका व्यापार हल्लीं चालत आहे तितका, जवळ जवळ येऊन ठेपला. ही वाढ सर्व जगास आश्चर्यकारक वाटली, परंतु तो केवळ आरंभच होता. इ. स. १८८४त हिंदुस्थानाशीं एकंदर व्यापार १,९४०,०००,००० रुपयांचा

---

*ह्या बेटांपैकीं पहिलें इंग्लंदच्या दक्षिणेस इंग्लिश चानलमध्यें आहे, व दुसरें इंग्लंदच्या पश्चिमेस ऐरिश समुद्रांत आहे.

झाला; म्हणजे ५० वर्षांत सुमारें ८ पट वाढला. आतां इंग्लिश व्यापाराची त्यांच्या देशांत जी वृद्धि झाली ती त्यांना फार विलक्षण वाटते. परंतु हिंदुस्थानांत जितकी वृद्धि होण्यास ५० वर्षें लागलीं, तितकी इंग्लंदांत होण्यास ६० वर्षें लागलीं आहेत.

हिंदुस्थानच्या हल्लींच्या व्यापाराकडे आतां आपण लक्ष देऊं. ग्रेट ब्रिटन व आयर्लंद ह्यांमधून दरसाल जे जिन्नस हल्लीं बाह्य प्रदेशीं जातात, त्यांची एकंदर किंमत सुमारें २,४०,००,००,००० रुपये होते; व फक्त हिंदुस्थानांत जे पदार्थ येतात, त्यांची किंमत सुमारें ३२,००,००,००० रुपये होते; म्हणजे $\frac{1}{8}$ पेक्षां जास्त होते. म्हणजे युनायतेद स्तेत्सशीं जो व्यापार चालतो, त्यापेक्षां हा व्यापार ९,००,००,००० रुपयांनीं जास्त आहे; व आस्त्रेलियाशीं जो चालतो, त्यापेक्षां त्याच्याच $\frac{1}{3}$ नें जास्त आहे.

हल्लींचा येथील व्यापार.

ह्या व्यापाराचे मुख्य जिन्नस कापसाचें कापड, धातु, यंत्रें, आगगाडीचें सामान, लोंकरीचे पदार्थ, व दगडी कोळसा, हे होत. ह्यांतहि मुख्य जिन्नस कापसाचें कापड. इ. स. १८८२।८३त लांकाशायरमधून एकंदर ७६,००,००,००० रुपये किंमतीचें कापड बाह्य प्रदेशीं रवाना झालें; ह्यापैकीं फक्त हिंदुस्थानांत २९,००,००,००० रुपयांचें आलें. म्हणजे लांकाशायरच्या सर्व मालापैकीं

इंग्लंदाहून येथें येणारे व्यापाराचे मुख्य जिन्नस.

$\frac{१}{२}$ माल एकट्या हिंदुस्थानांत खपला असून राहिलेला $\frac{१}{२}$ माल पृथ्वीवरील बाकीच्या प्रदेशांत खपला, असें म्हणण्यास हरकत नाहीं. कापडाच्या खालोखाल व्यापाराचा मोठा जिन्नस धातु. धातूंचा व्यापार ६,००,००,००० रुपयांचा आहे. ह्यांत शेफील्ड व बकिंगहाम येथील सुऱ्या चाकू वगैरे, आणि स्वान्सी येथील तांब्याचे पदार्थ, ह्यांचा समावेश होतो. तिसऱ्या प्रतीचा जिन्नस यंत्र सामान. हीं यंत्रें बहुतकरून लीड्स्, मांचेस्तर व ग्लासगो येथून १,७९,००,००० रुपयांचीं रवाना होतात. चौथ्या प्रतीचा जिन्नस आगगाडीचें सामान. हें १,५०,००,००० रुपयांचें मुख्यत्वें लीड्स्, मिड्लबरो, शेफील्ड, बर्मिंगहाम, ड्यारो व ब्रिस्तल येथून रवाना होतें. पांचव्या प्रतीचा जिन्नस लोंकरीचे पदार्थ. हे १,२९,००,००० रुपयांचे यार्कशायरमधील वेस्ट रायडिंग येथून जातात. सहाव्या प्रतीचा जिन्नस दगडी कोळसा. ह्याचा व्यापार १,००,००,००० रुपयांचा असून तो मुख्यत्वें न्यूक्यासलशीं चालतो.

हिंदुस्थानासाठीं पदार्थ तयार करण्याचे इंग्लिशांचे जे कारखाने आहेत ते किती महत्त्वाचे आहेत, व त्यांचा संबंध किती शहरांशीं आहे, हें वरील वर्णनावरून वाचकांच्या ध्यानांत येईल. इंग्लंदांतील मोठ मोठ्या शहरांच्या भरभराटीस जीं महत्त्वाचीं कारणें आहेत, त्यांपै-

कींत, हिंदुस्थानांतून येणाऱ्या मालाच्या मागण्या, हें एक कारण आहे असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं.

येथून इंग्लंदांत जाणारे मुख्य जिन्नस.

इंग्लंदांतून हिंदुस्थानांत येणाऱ्या मालाची ही हकीगत झाली. आतां येथून जे जिन्नस त्या देशांत जातात, त्यांविषयीं विचार करूं. ह्या जिनसांपैकीं अति महत्त्वाचे जिन्नस कापूस व धान्य हे होत. दहा वर्षांपूर्वीं ह्या देशांतून त्या देशांत प्रतिवर्षीं सुमारें १०,००,००० हंड्रेडवेट गहूं जात असत; परंतु ही संख्या इतकी झपाट्यानें वाढत आहे कीं, गेल्या वर्षीं १,००,००,००० हंड्रेडवेट गहूं गेले. गव्हांच्या व्यापाराची वृद्धि पुढील गोष्टींवर अवलंबून असते, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. ( १ ) ह्या देशांत पिकाची सुबत्ता; ( २ ) युनायूतेद स्तेत्स व युरोप ह्यांत नेहमींपेक्षां धान्य कमी उत्पन्न होणें; ( ३ ) बारदान वाहण्याच्या नोराचा दर कमी असणें; व ( ४ ) वटावाचा भाव कमी असणें. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या पार्लमेंटाच्या ब्ल्यू बुकांत ( पार्लमेंटाच्या माहितीकरितां प्रसिद्ध केलेल्या सरकारी रिपोर्टांत ) असें लिहिलें आहे कीं, "ज्या वेळीं ह्या ४हि गोष्टी अनुकूळ असतील, त्या वेळीं इंग्लंदांतील बाजारच्या पेठांतून हिंदुस्थानच्या गव्हांचा इतका कांहीं विलक्षण खप होईल कीं, तो खप पाहून हिंदुस्थानांत गहूं, किती उत्पन्न करितां येईल ह्याविषयीं ज्यांना पूर्ण ज्ञान नाहीं, त्यांना फारच आश्चर्य वाटेल; व ह्याप्रमाणें मागें

वाटलेंहि आहे." म्हणजे युनायूतेद स्तेत्समधील गव्हांच्या पिकास जर जबर धक्का बसला, किंवा इंग्लंदांत व त्या संस्थानांत जर लढाई उत्पन्न झाली तर हिंदुस्थानांतून इंग्लिशांस गव्हांचा फारच मोठा पुरवठा होईल. हा देश जोंपर्यंत त्यांच्या ताब्यांत आहे, व सुएझचा कालवा जोंपर्यंत जाण्या येण्यास खुला आहे, तोंपर्यंत भाकर महाग होण्याची भीति बाळगिण्याचें इंग्लिशांस कारण नाहीं, असें म्हटलें असतां त्यांत कांहीं अतिशयोक्ति नाहीं.

गेल्या पांच वर्षांत साधारणपणें पाहिलें असतां व्यापार जरी विशेष जोरावर नव्हता, तरी देखील इंग्लिशांनीं हिंदुस्थानांत जो माल पाठविला, त्याचें प्रमाण त्या मुदतींत फार वाढलें आहे. पांच वर्षांत त्यांचा कापडाचा व्यापार $\frac{1}{4}$ नें वाढला, आगगाडीचें सामान दीडपट खपूं लागलें, लोंकरीच्या जिनसांचा व्यापार $\frac{1}{2}$ नें वाढला, आणि बूट व जोडे पूर्वींच्या जवळ जवळ दुप्पट खपूं लागले.

हिंदुस्थानाशीं त्यांचा व्यापार आजपर्यंत कोणत्या प्रमाणानें चालत आला आहे, ह्याचा आतांपर्यंत आपण विचार केला. आतां ह्याच्या भावी स्थितीचा विचार करूं.

एतद्देशीय लोकांस ज्या वस्तूंची गरज लागेल त्याच वस्तु इंग्लिश लोक विकणार हें उघडच आहे. म्हणून

हिंदुस्थानच्या स्थितीची सुधारणा.

ब्रिटिश व्यापाराची भावी स्थिति हिंदुस्थानच्या सुधारणेवर अवलंबून आहे.

आतां हिंदुस्थानास ३ गोष्टींची उणीव आहेः—( १ ) येथील शेतकीची रीति अव्यवस्थित आहे; ( २ ) येथें पाण्याचा पुरवठा कमी आहे; व ( ३ ) येथें दळणवळणाच्या सोई कमी आहेत. पहिल्या मुद्द्याच्या संबंधानें ग्रेटब्रिटन व आयर्लंदमध्यें ज्याप्रमाणें जमिनीची लागवड करण्यांत येते, त्यापेक्षां हिंदुस्थानांतील जमिनीच्या लागवडीचें पाऊल हल्लीं फार मागें आहे. उदाहरणार्थ, इंग्लंदांत गव्हाचें पीक सरासरी एका एकरामागें १७ बुशील आहे; परंतु हिंदुस्थानांत फक्त ११ बुशील आहे; व ह्याचें कारण उघड आहे. तें हेंच कीं, ह्या देशांतील एकहि शेतकरी खतांचा चांगला उपयोग करित नाहीं; तसेंच फार प्राचीन काळापासून चालत आलेल्या लांकडी नांगरांनींच तो जमीन नांगरतो; आणि शेतकीच्या दुसऱ्या कृतींच्या संबंधानें यंत्रांचा उपयोग त्याला बहुधा माहितच नसतो. इंग्लंदांतील जमिनीप्रमाणें ह्या देशांतील लागवड जमिनीची जर शास्त्रीय रीतीनें लागवड केली तर ४१,००,००,००० लोकांस पुरेसें धान्य तींत सहज उत्पन्न होईल. शेतकीच्या संबंधानें ह्या देशांत लवकरच सुधारणा होईल, ह्यांत शंका नाहीं; व ही सुधारणा सुरू झाली म्हणजे वाफेनें चालणारे नांगर व शेतकीचीं इतर हत्यारें करणाऱ्या इंग्लंदांतील कारागिरांस पुष्कळ काम मिळून त्यांचा व्यापार वाढणार आहे.

परंतु लागवड करण्यासारखी हिंदुस्थानांत जी

एकंदर जमीन आहे, तिच्यापैकीं फारच थोड्या भागाची

पाट बंधाऱ्यांची आवश्यकता.

हल्लीं लागवड होत आहे. कांहीं प्रांतांतून तर लागवड जमिनीच्या ७ पट लागवड होण्यासारखी जमीन पडीत राहिलेली आहे. प्रायः हें प्रमाण ३ : १ आहे; म्हणजे लागवड जमिनीच्या तिप्पट पडीत जमीन आहे; व सिंधुनदीच्या कांठचा सुंदर मळईचा भाग अद्यापि देखील पडीत राहिला आहे. अशा प्रकारें जमीन पडीत राहण्याचें मुख्य कारण पाण्याची कमताई. इंग्लंडांत तेथील शेतकरी पाणी पुष्कळ म्हणून ओरडतात, हिंदुस्थानांत कमी म्हणून ओरडतात. हिंदुस्थानांत कोठें कोठें पाऊस फार कमी पडतो; म्हणून पिकांना केव्हां केव्हां पाटाच्या पाण्यावरहि अवलंबून रहावें लागतें.

ह्या गोष्टीच्या महत्त्वाची थोडी बहुत कल्पना करितां यावी, म्हणून ईजिप्त देशाची स्थिति लक्षांत

ह्या संबंधानें ईजिप्त देशाचें उदाहरण.

आणा. सुपीकपणाविषयीं त्या देशाची नेहमीं प्रसिद्धि आहे. परंतु नैल नदीचें पाणी पाट बंधाऱ्यांनीं जेथपर्यंत नेतां येतें, तेथपर्यंतच काय ती तेथील जमीन सुपीक असते. ईजिप्तमध्यें पाटबंधाऱ्यांचें काम शेंकडों वर्षें सुरू आहे; हिंदुस्थानांत त्या कामास नुकताच आरंभ झाला आहे, असें म्हटलें तरी चालेल. ही गोष्ट जास्त स्पष्ट करून सांगण्यासाठीं इ. स. १८०५ च्या “ नाइ-

न्टीन्थ सेंचरी " ( १९ वें शतक) ह्या नांवाच्या मासिक पुस्तकांत कर्नल स्कॉट मानक्रीफ ह्यांनीं दिलेलें उदाहरण येथें सांगतों.

वीस वर्षांपूर्वीं कायरो शहराच्या दक्षिणेच्या बाजूस १२ मैलांवर नैल नदी सखल आहे त्या ठिकाणीं पाणी अडवून धरण्यासाठीं एका फ्रेंच गृहस्थानें धरण बांधिलें. त्याचा उद्देश असा कीं, असें धरण बांधिलें म्हणजे जमिनीवरून पाणी आपाप वाहत जाईल, व बंब लावून पाणी वर घेण्याची आवश्यकता राहणार नाहीं. हें धरण बांधिलें तरी त्याचा उपयोग झाला नाहीं; कारण गेल्या वर्षापर्यंत त्याचे सांडवे उघडे ठेविले होते; कां तर धरणाचें बांधकाम कच्चें असल्याबद्दल रिपोर्ट झाला होता. ह्यामुळें शेतकऱ्यांस बंबानें पाणी चढविण्यास अतिशय खर्च करावा लागे; नाहीं तर पाण्यावांचून रहावें लागून हातांतून पीक अजीबात घालवावें लागे. पुढें हिंदुस्थानांतील कांहीं इंग्लिश एंजिनीयर इजिप्त सरकारनें ह्या धरणाच्या बांधकामाच्या तपासणीसाठीं नेमिले. तेव्हां त्यांना असें आढळून आलें कीं, बांधकाम जितकें कच्चें वाटत आहे तितकें कच्चें तें नाहीं. म्हणून नैल सखल होती, त्या प्रदेशाच्या नेहमींच्या सपाटीपेक्षां ७ फूट ३ इंच इतक्या उंचीवर पाणी राहील, अशा बेतानें त्यांनीं धरणाचीं द्वारें बंद केलीं. ह्यामुळें ह्या धरणाच्या वरच्या बाजूस कित्येक मैलांपर्यंत बंबाच्या खर्चावांचून

शेतांस पाणी मिळालें; व त्या एंजिनीयरांच्या ह्या सत्कृत्यामुळें गरीब व श्रीमान् ह्या दोघांसहि त्यांचें कापसाचें पीक निर्भयपणें प्राप्त झालें. ईजिप्तांतील लोक ह्या धरणास " ब्रिज् ऑफ् ब्लेसिंग्ज् " ( सुखाचा पूल ) असें म्हणतात. हिंदुस्थानांत सिंधु व गंगा ह्या मोठाल्या नद्या व दुसऱ्या पुष्कळ लहान लहान नद्या अशाप्रकारच्या धरणाच्या कामास फार उपयोगाच्या आहेत; मात्र हीं धरणें बांधण्यास खर्च लागणार आहे. तेव्हां शेतकीला कमी खर्च लागेसें करणें, व पडीत जमीन लागवडी खालीं आणणें, ह्या गोष्टींस जरूर काय ती भांडवलाची व श्रमाची आहे.

दुसरें असें आहे कीं, हिंदुस्थानांत दळणवळणाच्या साधनांची फार उणीव आहे. अशा विस्तीर्ण देशांत जिकडे तिकडे दळणवळणाचे मार्ग खुले होण्यास किती तरी मैल रेलवे पाहिजे. ग्रेट ब्रिटन व आयर्लंड मिळून १८,००० मैल रेलवे आहे; आणि हिंदुस्थानचें क्षेत्रफळ ह्यांच्या ११ पट असतांहि येथें इ. स. १८८४त ११,००० मैलच रेलवे होती. तथापि रेलवे व पाटबंधारे ह्या उपयुक्त कामांकडेच सरकारचें हल्लीं फार लक्ष आहे. इंग्लंदांत रेलवे, ट्राम वे व ह्यांसारखीं दुसरीं कामें लोकांनींच खाजगी रीतीनें आरंभिलीं आहेत. परंतु हिंदुस्थानांत जर हीं कामें सरकारनें केलीं नाहींत, तर तीं कधींहि घडून

हिंदुस्थानांतील रेलवे.

यावयाचीं नाहींत. रेल्वे व पाट बंधारे ह्यांची उणीव भरून यावी म्हणून राज्यकारभाराचा खर्च भागून नेहमीं कांहीं तरी रक्कम ह्या कामाला शिल्लक राहत जाईल, अशा रीतीनें हिंदुस्थानच्या जमा खर्चाची व्यवस्था केलेली असते.

देशाची सुधारणा करण्याकडे ही शिल्लक रक्कम लावण्यांत येते. इ. स. १८६९पासून अशाप्रकारच्या कामांकडे दरसाल सुमारें ९,९०,००,००० रुपये सरकार खर्च करीत आलें आहे. "दरसाल नवे नवे रस्ते होऊन रेल्वे वाढत चालली आहे; नव्या शाळा, इस्पितळें, बराकी व दवाखाने बांधण्यांत येत आहेत; व पाटबंधाऱ्यांचीं कामें वाढत चाललीं असल्यामुळें दुष्काळापासून देशाला असणारें भय कमी कमी होत चाललें आहे. ह्याशिवाय ज्या रेल्वे रस्त्यांची सरकारानें हमी घेतली आहे, त्या रेल्वे रस्त्यांसंबंधानें (ग्यारंटीड रेल्वेसंबंधानें) जें देणें वगैरे निघतें, तें सरकारला द्यावें लागतें. तसेंच हल्लीं असलेले सडकांचे सर्व रस्ते, पूल, दवाखाने, शाळा, कोर्टें, व सरकारी कचेऱ्या, ह्यांचीहि दुरुस्ती सरकार करितें; मोठ्या खर्चानें बांधिलेल्या बराकी, तटबंदीचीं ठिकाणें व लष्करी इमारती दुरुस्त करुन व्यवस्थित राखितें; जवळ जवळ ११,००० मैल रेल्वे चालवितें, व प्रतिवर्षी सरासरी प्रमाणानें सुमारें २७,५०,००० पौंड खर्च करून पाटबंधाऱ्याच्या कामांचीहि दुरुस्ती करितें.

ग्रेट ब्रिटन व आयर्लंद, फ्रान्स, जर्मनी व इताली हे सर्व देश एकत्र केले असतां जो विस्तार होईल, त्याच्या दुप्पट आकाराच्या देशांत हे असंख्य पाटबंधारे पसरले आहेत. हीं सर्व कामें ज्या खात्याकडून होतात, त्याला पब्लिक वर्क खातें म्हणतात. सारांश, उत्तम रीतीच्या दळणवळणाचा फायदा, उत्तम रीतीनें आयुष्य घालविण्यास लागणारीं साधनें, आणि अर्वाचीन सुधारणेचीं साधनें, दर माणशीं ३ $\frac{1}{4}$ पेन्स खर्चानें २० कोटि लोकांस ह्या पब्लिक वर्कस् खात्यामुळें मिळालीं आहेत." ('इंडियन रेलवेज' हिंदुस्थानांतील रेलवे—पृष्ठ २०९)

हिंदुस्थानच्या व्यापार ऊर्जितदशेस आणण्यास रेलवेचा किती उपयोग झाला आहे, हें दाखविण्यासाठीं मुंबईच्या व्यापारी लोकांच्या सभेनें ( चेंबर ऑफ् कॉमर्सनें ) जमविलेले कांहीं आंकडे येथें उतरून घेऊं. "इ. स. १८५२।५३ ह्या वर्षी रेलवे प्रथम सुरू झाली, व त्या वर्षी १०,०७,०८,६१० रुपयांचे व्यापाराचे जिन्नस ह्या देशांत आले; इ. स. १८७२।७३ त जेव्हां ५,६७१ मैल रेलवे झाली, तेव्हां ३१,८७,५०,००० रुपयांचे आले; व इ. स. १८८२।८३ त जेव्हां १०,३१७ मैल रेलवे झाली तेव्हां ५२,०९,८६,७०० रुपयांचे आले. तसेंच गेल्या ३० वर्षांत हिंदुस्थानांत येणाऱ्या जिनसांच्या किंमती हळू हळू उतरत आल्या आहेत; म्हणून

व्यापाराच्या वृद्धीचें वर दाखविलेलें प्रमाण नक्की नसून वास्तविक प्रमाण पुष्कळ अधिक असलें पाहिजे, ही गोष्टहि आपण लक्षांत आणिली पाहिजे. " सरासरीनें हिंदुस्थानांतील रेलवेपासून शेंकडा ५ टक्के व्याज सुटतें; व पाटबंधाऱ्यांच्या कामांपासून सुमारें शेंकडा ६ टक्के सुटतें. " तसेंच, जेव्हां ही पाटबंधाऱ्यांची रीति अधिक पूर्णतेस येईल, तेव्हां हल्लींहूनहि जास्त नफा खचित होईल. हल्लीं देखील वायव्येकडील प्रांतांत पाटबंधाऱ्यांपासून शेंकडा ८ टक्के व्याज सुटत आहे. तसेंच इ. स. १८७८।७९ च्या दुष्काळामध्यें १५।१६ कोटि रुपयांचीं धान्यें पाटबंधाऱ्यांमुळें बचावलीं गेलीं. ह्या पाटबंधाऱ्यांस एकंदर जो खर्च आला, तो सर्व ह्या एका वर्षांत भरून आला, इतका मोठा फायदा त्या वेळीं झाला. " (एन्. एस्. कनिंग्हॅम ह्यांचें पुस्तक, पृष्ठ ३७)

गहूं व कापूस हे जिन्नस बाहेर पाठविण्याचा व्यापार उत्तरोत्तर वाढत आहे; व पुढेंहि वाढतच जाणार. हल्लीं ज्या मार्गानें इंग्लिशांचे दीर्घ प्रयत्न सुरू आहेत, त्याच मार्गानें पुढें जसजसे ते सुरू राहतील, तसतसा त्यांनीं तयार केलेल्या जिनसांचा खप हिंदुस्थानांत अधिकाधिक होत जाईल; आणि उलट पक्षीं इंग्लिशांस लागणारे कच्चे पदार्थ व धान्यें ह्यांचा पुरवठाहि त्यांना हिंदुस्थानांतून अधिकाधिक होऊं लागेल. हिंदुस्थानांतील लोक जितका जितका अधिक माल उत्पन्न करूं लागतील, तितका तितका ते ब्रिटिश

माल अधिक खरेदी करूं लागतील. गेल्या पांच वर्षांत बूट व जोडे ह्यांची मागणी दुप्पट झाली आहे; व ह्यावरून युरोपांतील ऐषआरामाच्या पदार्थांचा एतद्देशीय लोक उपभोग घेऊं लागले आहेत, ही गोष्ट स्पष्ट आहे.

इंग्लंदाशीं व ब्रिटिश वसाहतींशीं हिंदुस्थानचा व्यापार सतत चालू राहील, ह्याविषयींहि शंका घेण्याचें कारण नाहीं. हल्लीं ह्या देशाशीं व्यापार करण्याची सर्व देशांना सारखीच मोकळीक आहे; परंतु सर्व जगांतून ह्या देशांत जो माल येत आहे, त्याच्या १२ पट किंमतीचा माल, फक्त ग्रेट ब्रिटन व आयर्लंद व इंग्लिशांच्या इतर वसाहती, ह्यांतून येत आहे. हिंदुस्थानच्या सर्व व्यापारापैकीं ग्रेट ब्रिटन व आयर्लंद ह्यांशीं शेंकडा ९६ ह्या प्रमाणानें आहे; फ्रान्साशीं शेंकडा ६ प्रमाणानें आहे; व जर्मनीशीं ह्याहूनहि कमी आहे. इ. स. १८८२त सुएझ कालव्यामधून गेलेल्या गलबतांपैकीं २,५६५वर इंग्लिश राष्ट्राचें निशाण फडकत होतें; व बाकीच्या सर्व राष्ट्रांचीं मिळून काय तीं ६३५ च गलबतें होतीं. सुएझ कालव्याचें महत्त्व कोणत्या राष्ट्रास अतिशय आहे, ही गोष्ट ह्यावरून स्पष्ट होते. तसेंच गेल्या सालीं हिंदुस्थानाशीं झालेल्या ब्रिटिश व्यापारापैकीं शेंकडा ८७$\frac{1}{4}$ ह्या कालव्यांतून झाला; व केप ऑफ् गुड होपावरून फक्त १२$\frac{1}{4}$ झाला. ह्या दोन्ही गोष्टी लक्षांत

सुएझ कालव्यांतून हिंदुस्थानाशीं व्यापार.

आणिल्या म्हणजे, ईजिप्तच्या राजकारस्थानांसंबंधानें इतर कोणतेंहि राष्ट्र उदासीन राहिलें, तरी इंग्लिशांस तसें करितां येणार नाहीं, हें उघड आहे.

आतां क्षणभर कल्पना करूं कीं, हिंदुस्थानांतून इंग्लिशांना रशियानें हकलून दिलें, अगर तेच हा देश सोडून देऊन परत इंग्लंदास गेले; असें झालें असतां काय होईल बरें ? हल्लीं आहे त्याचप्रमाणें व्यवस्था पुढें चालेल

हिंदुस्थान इंग्लिशांच्या ताब्यांतून गेल्यानें होणारे तोटे.

काय ? खरोखर चालणार नाहीं. पहिल्या कल्पनेप्रमाणें पाहिलें असतां, इंग्लिशांस हकलून देण्यास रशियाबरोबर त्यांचें मोठ्या निकराचें युद्ध होऊन त्यांत त्यांचा पराभव झाला पाहिजे. अर्थात् अशा घोटाळ्यामुळें हिंदुस्थानांत ब्रिटिश मालाचा हल्लीं जो खप होत आहे त्याला म्हणजे ब्रिटिश व्यापाराला भयंकर धक्का बसेल; आणि अशांतूनहि जर कदाचित् त्यांचा व त्यांच्या इतर वसाहतींचा ह्या देशाशीं थोडा बहुत व्यापार शिल्लक राहिला, तर रशिया शत्रुत्वामुळें जकाती वगैरे बसवून तोहि बंद करण्याचा प्रयत्न खचित करील. आतां दुसऱ्या कल्पनेप्रमाणें इंग्लिशांनींच हा देश सोडून दिला तर, १४०० वर्षांपूर्वीं ब्रिटनमधून रोमन लोकांनीं पाय काढिल्यामुळें तेथें ज्याप्रमाणें थोडी बहुत बेबंद पातशाही माजली होती, त्याप्रमाणें हिंदुस्थानांत खरोखर माजेल. अशी स्थिति आली म्हणजे ह्या देशाच्या

वास्तविक भरभराटीसाठीं त्यांनीं आजपर्यंत जी खटपट केली आहे, ती सर्व फुकट जाईल. अशा अंदाधुंदीच्या स्थितींत व्यापारामध्यें त्यांनीं घातलेलीं भांडवलें फुकट जातील; आणि एवढ्या मोठ्या श्रमानें बांधिलेली त्यांची हिंदुस्थानची व्यापारसंबंधाच्या भरभराटीची इमारत ढासळून जाऊन स्वप्नवत् होईल.

अशा दुष्परिणामामुळें इंग्लंदावर जे भयंकर प्रसंग गुदरतील, त्याचें चित्र ह्याहून स्पष्ट वठविण्याची आवश्यकता दिसत नाहीं. कित्येक वाईट प्रसंगांचा थोडा बहुत अनुभव इंग्लिशांना आहेच. परंतु हिंदुस्थानासंबंधानें वरील प्रकारचा प्रसंग आल्यास ह्यापासून जे भयंकर परिणाम त्यांच्यावर घडणार आहेत, त्यांच्या पासंगासहि ते मागील परिणाम लागणार नाहींत. लांकाशायरच्या व्यापाराचा समूळ नाश होईल; व यार्कशायरच्या व्यापाराला भयंकर धक्का बसेल. हिंदुस्थानापासून त्यांना हल्लीं अतोनात फायदा होत आहे, व त्यांच्या मुलांनातवांसहि ह्या देशापासून पुढें मोठा द्रव्यलाभ व्हावयाचा आहे; ह्या गोष्टींचा त्यांनीं विचार केला असतां ह्या देशाच्या भावी परिणामाविषयीं उदासीन राहण्यास त्यांच्यापैकीं कोणी क्षणभर देखील तयार होणार नाहीं; व हा देश ताब्यांत राखण्यास ज्या ज्या गोष्टी करणें जरूर पडेल, त्या त्या करण्याविषयीं कधींहि पाऊल मागें घेणार नाहीं. कारण अशा प्रकारची हयगय केली असतां

त्यापासून चालू पिढीचें तर नुकसान होणारच, परंतु पुढील पिढ्यांचेंहि होणार, ही गोष्ट त्यांच्या ध्यानांत आल्यावांचून राहणार नाहीं.

परंतु हा देश ताब्यांत राखणें किंवा न राखणें ह्याचा त्यांनीं दुसऱ्याहि एका दृष्टीनें विचार करणें जरूर आहे.

ह्या देशासंबंधानें इंग्लिशांचें नीतिदृष्ट्या कर्तव्य.

ह्या देशापासून त्यांना जे साक्षात् फायदे आहेत, त्यांसंबंधानेंच आतांपर्यंत आपण विचार केला. आतां ह्या देशाशीं असलेल्या त्यांच्या संबंधाचा आपण नीतिदृष्ट्या विचार करूं. अशा दृष्टीनें विचार केला असतांहि, हा देश त्यांनीं आपण होऊन सोडून देणें, किंवा आपल्या हातून जाऊं देणें, ही फार मोठी चूक होईल; एवढेंच नव्हे, तर तो मोठा अपराध होईल.

परकीय लोक आपल्या ताब्यांत असल्यामुळें आपणांवर त्यांच्या कल्याणाची फार मोठी जबाबदारी आहे, असा इंग्लिश लोकांना नेहमीं अभिमान वाटत असतो. **कर्तव्यकर्माविषयीं अत्यन्त तत्परता**, हा विशेष गुण त्यांचे पूर्वज जे प्यूरिटन ह्यांपासून त्यांच्यामध्यें आला आहे; व ह्या गुणामुळें परकीय लोकांवर केवळ स्वार्थबुद्धीनें राज्य करण्याची कल्पनाहि त्यांच्या मनांत येत नाहीं. हा त्यांच्या मनाचा कल सांप्रत तर फार दृढ झाला आहे. सार्वभौमत्व असणें ही एक मोठी जबाबदारी आहे, अशी त्यांची समजूत एडमंड

र्क ह्याच्या वेळेपासून झाली असून हिंदुस्थानासंबंधाने तर ही समजूत फार दृढ झाली आहे. म्हणून केवळ स्वार्थासाठीं तो देश आपल्या ताब्यांत ठेवावयाचा, हा विचार त्यांनीं अगदीं सोडून दिला पाहिजे. अमुक एक प्रमाणापर्यंत उत्तम प्रकारची राज्यव्यवस्था आपणांस हिंदुस्थानांत ठेवावयाची आहे, असें धोरण त्यांनीं ठेविलें आहे; आणि येथील नेटिव्ह लोकांच्या भोळ्या व वेडसर समजुतींत हात न घालितां पाश्चिमात्य सुधारणांपैकीं उत्तम सुधारणा ह्या देशांत हळू हळू सुरू करण्याचा त्यांचा मुख्य हेतु आहे. कायद्यांची समता, छापखान्यांचें स्वातंत्र्य आणि विद्या, हीं त्यांनीं येथील लोकांस दिलीं आहेत; व युरोपियन लोकांच्या श्रमानें लागलेल्या शोधांपासून जे फायदे इंग्लिशांस होऊं लागले आहेत, ते सर्व फायदे ( आगगाड्या, तारायंत्रें वगैरें ) त्यांनीं ह्या देशांतील लोकांस करून दिले आहेत. तेव्हां इंग्लिश लोकांच्या बुद्धिसामर्थ्यामुळें, त्यांच्या स्वार्थपराङ्मुखतेमुळें आणि त्यांच्या दूरदृष्टीमुळें हिंदुस्थानांत ज्या ह्या अनेक सुधारणा झाल्या आहेत, त्या जर त्यांनीं बुद्धिपुरःसर रानटी व जुलमी रशियन लोकांच्या स्वाधीन केल्या, किंवा ह्या देशांतील झोटिंग पातशाही, दरोडे, दंगेधोपे, ह्यांच्या गडबडींत सोडून दिल्या, तर इतिहासांत त्यांच्याविषयीं काय उद्गार निघतील ?

हा देश सोडून देणें किंवा आपल्या हातून

जाऊं देणें, हें नीतिदृष्ट्याहि इंग्लिशांना वाईट आहे, असें वर दाखविलेंच आहे. हें अयोग्य कृत्य करण्याविषयीं जर कोणी मनुष्य एखाद्या इंग्लिश गृहस्थास सांगेल तर त्याचें तें करणें विलक्षण धाडसाचें होईल. सारांश, हिंदुस्थान ताब्यांत राखणें त्यांच्या फायद्याचें असून त्यांचें कर्तव्यहि आहे. म्हणून त्यांनीं हा देश ताब्यांत राखावा किंवा नाहीं, ह्या प्रश्नाला आतां एकच उत्तर राहिलें, हें उघड आहे. तसेंच जर त्यांनीं हा देश कबज्यांत ठेवण्याचा निश्चय केला, तर त्यामुळें उत्पन्न होणारीं संकटेंहि सोसण्यास त्यांना तयार झालें पाहिजे. हिंदुस्थान ताब्यांत ठेवावयाचें असल्यास परराष्ट्रांसंबंधानें त्यांना उदासीन राहतां येणार नाहीं, असेंहि वर दाखविलें आहे. हा देश त्यांच्या ताब्यांत असल्यामुळें अफगाणिस्थान, ईजिप्त व हिंदुस्थानास येण्याचा मार्ग, हीं तीन त्यांना अत्यन्त महत्त्वाचीं झालीं आहेत. अशा दृष्टीनें विचार केला असतां खुद्द इंग्लंदांतील उलाढाली त्यांना जितक्या महत्त्वाच्या आहेत, तितक्याच परराष्ट्रांतील उलाढालीहि त्यांना महत्त्वाच्या आहेत, असें झालें. ह्या उलाढाली इंग्लंदांतील एकाच पक्षास, एकाच वर्गास, बडे लोकांस, सैन्यास, व्यापाऱ्यांस किंवा मजुरदारांस मात्र महत्त्वाच्या आहेत असें नाहीं; तर सर्व प्रकारच्या व सर्व धंद्यांच्या इंग्लिश लोकांस सारख्याच महत्त्वाच्या आहेत.

शेवटीं थोडें लिहावयाचें आहे. ह्या दोन प्रकरणांतील व पुढील दोन प्रकरणांतील हकीगतीवरून ध्यानांत येईल कीं, ब्रिटिश राष्ट्राचा सांप्रत जो एवढा मोठा विस्तार झाला आहे, तो होण्यास इंग्लिशांना अनेक युद्धप्रसंग करावे लागले आहेत. आजमितीस देखील सरहद्दीवर वारंवार लढाया होतात. तथापि ब्रिटिश राज्यसत्तेमुळें हल्लीं ब्रिटिश राष्ट्राएवढ्या अफाट प्रदेशांतहि युद्धप्रसंगाचें फारसें भय राहिलें नाहीं; व अशा प्रकारचें उदाहरण जगाच्या इतिहासांत दुसरें एकहि सांपडावयाचें नाहीं, असें म्हणण्यास कांहीं शंका दिसत नाहीं. हिंदुस्थानांतील २८ कोटि प्रजेपैकीं किती-जणांनीं लढाईमध्यें निघालेला बंदुकीचा आवाज ऐकिला असेल बरें? इंग्लंदावर शेवटची स्वारी झाल्यापासून आज-पर्यंत किती वर्षें लोटलीं बरें? कानड्यांत हल्लीं हमेषा लढाया होत आहेत काय? आस्ट्रेलियांतील किंवा न्यूझी-लंदमधील युरोपियन लोकांत झालेल्या लढाईचा इतिहास कोठें सांपडेल? अर्थात् असे प्रकार सांप्रत घडत नाहींत, असेंच उत्तर द्यावें लागेल. स्पेन, फ्रान्स, जर्मनी, इताली, आस्ट्रिया व रशिया ह्या राष्ट्रांच्या संबंधानें असेच प्रश्न केले असतां जें उत्तर निघेल, त्याशीं ह्या वरील उत्तराची तुलना करा, म्हणजे खातरी होईल कीं, ब्रिटिश राष्ट्रानें गेल्या कांहीं वर्षांत जीं महत्त्वाचीं कृत्यें केलीं आहेत, त्यांपैकींच

जगाच्या शांततें-वर ब्रिटिश राष्ट्रानें होणारे परिणाम.

**सर्वत्र शांतता राखणें,** हें एक कृत्य आहे. तसेंच ह्या शांततेचें महत्त्व ब्रिटिश राष्ट्रास ह्यापुढें कमी वाटेल, असाहि संभव नाहीं. त्यांच्या वसाहती व त्यांच्या ताब्यांतील इतर देश, ह्यांचा व खुद्द त्यांच्या देशाचा जो संबंध आहे, त्यापासून उभयतांचेंहि हितच होत आहे, व म्हणून हा संबंध जसजसा दृढतर होत जाईल, तसतशी जगाच्या शांततेला धोका बसण्याची भीतिहि कमी कमी होत जाईल. कारण पृथ्वीवरील सर्व खंडांतून ज्यांचा मुलूख आहे, असें मोठें राष्ट्र क्षुल्लक कारणांवरून मोठमोठ्या युद्धांस तयार होण्याचा संभव नाहीं. लहानसान लढाया होतीलच; परंतु कालेंकरून अशा लढायाहि क्वचित् होत जातील, अशी आशा आहे. तसेंच, ब्रिटिश राष्ट्रांतील निरनिराळया ठिकाणच्या लोकांची "इंग्लिश" ही एकच भाषा हळू हळू होत चालली असल्यामुळें त्यांचें ऐक्य होत चाललें आहे, म्हणून जगांतील सर्व मनुष्यजातीचें ऐक्य होण्याचा आणि **सर्व जगाचें एक-राष्ट्र होण्याचा हा आरंभच** होईल, अशी आशा आहे.

**पूर्वार्ध समाप्त.**

# प्रकरण तिसरें.

## ब्रिटिश वसाहतींची पूर्वस्थिति कशी होती व त्या त्यांनीं कशा मिळविल्या.

उपोद्घात.

अशी एक आख्यायिका सांगतात कीं, एकदां इंग्लंदांतील कोणा एका मुत्सद्द्याला कलोनियल ( वसाहतींसंबंधी ) स्टेट सेक्रेटरीचें काम पाहण्याचा एकाएकीं प्रसंग आला. तेव्हां हे मुत्सद्दी आपल्या चिटणिसास म्हणाले, "नकाशा आणून ह्या वसाहती कोठकोठें आहेत, हें प्रथमतः आपण पाहिल्यास बरें होणार नाहीं काय?" ही आख्यायिका सर्वथा खरी आहे कीं काय हें पाहण्याचें विशेष कारण नाहीं. तथापि इतकें मानण्यास हरकत नाहीं कीं, वसाहतींसंबंधानें खुद्द इंग्लंदांतील मोठमोठ्या मुत्सद्द्यांना सुद्धां इतकी कमी माहिती होती. आतां इंग्रज लोक हिंदुस्थानांतील २८ कोटि प्रजेचे प्रत्यक्ष राज्यकर्ते आहेत; व पृथ्वीच्या पृष्ठभागावर सर्वत्र पसरलेल्या १ कोटि इंग्लिश लोकांच्या कल्याणाशीं त्यांचा अप्रत्यक्ष रीतीनें निकट संबंध आहे. ह्या गोष्टी लक्षांत आणिल्या म्हणजे ज्या प्रदेशांसंबंधानें व त्यांतील लोकांच्या संबंधानें ब्रिटिश लोकांवर इतकी जबाबदारी आहे, त्यांच्याविषयीं त्यांचें फार अज्ञान आहे, असें म्हणावें लागतें.

आतां अशा प्रकारचें अज्ञान त्या लोकांच्या ठिकाणीं कां असावें, ह्याचें कारण शोधीत बसण्याची आवश्यकता दिसत नाहीं. हा वसाहतींच्या इतिहासाचा विषय फार विस्तृत आहे, हें कदाचित् त्याचें कारण असेल; कदाचित् ह्या विषयाची अरसिकता हेंहि कारण असेल. तथापि ह्या वसाहतींसंबंधानें प्रत्येक ब्रिटिश मनुष्यावर जी एक विलक्षण प्रकारची जबाबदारी आहे, तिची योग्यता तो पूर्णपणें ध्यानांत आणीत नाहीं, हें कारण सर्वांत अधिक संभवनीय दिसतें. परंतु वसाहतींसंबंधी प्रश्न आणि वसाहती व हिंदुस्थान ह्यांच्या संबंधानें परराष्ट्रांशीं उत्पन्न होणारे तंटे बखेडे ह्यांकडे पार्लमेंट सभेचा काळ दिवसेंदिवस अधिकाधिक खर्च होणार आहे; व मोठमोठ्या मुत्सद्द्यांच्या शहाणपणाचा उपयोगहि ह्याच विषयासंबंधानें व्हावयाचा आहे. म्हणून ब्रिटिश राष्ट्राचा प्राचीन इतिहास व त्याची सद्यःस्थिति ह्यांची माहिती प्रत्येक ब्रिटिश मनुष्यास असणें तर जरूर आहेच; परंतु हिंदुस्थानांतील लोकांच्या हिताहिताचा त्यांच्या हिताहिताशीं हल्लीं बराच निकट संबंध झाला असल्यामुळें आपणांसहि ती माहिती असणें इष्ट आहे. असो.

ह्या वसाहती त्या लोकांनीं कशा मिळविल्या हा जो प्रस्तुत विषयाचा पहिला भाग त्याचा प्रथम विचार करूं. कारण त्यांची सद्यःस्थिति समजण्यास पहिली

अवश्य गोष्ट म्हटली म्हणजे त्यांचा प्राचीन इतिहास थोडा बहुत तरी माहीत असणें ही होय. हा इतिहास समजून घेण्यासाठीं आपणांस बऱ्याच प्राचीन काळाचा विचार करावा लागणार आहे. " रोम एका दिवसांत बांधून झालें नाहीं, " अशी इंग्रजींत एक * म्हण आहे, आणि रोमन लोकांच्या तादृशांत कोणत्याहि काळीं जेवढा प्रदेश होता, त्यापेक्षां ब्रिटिश राज्यामध्यें अधिक प्रदेश आहे. शिवाय ह्या राज्यांतील कित्येक प्रदेश तर असे आहेत कीं, ते प्रदेश पृथ्वीच्या कोणत्या तरी भागावर असतील, असें रोमन लोकांच्या स्वप्नींहि नव्हतें कारण त्या काळीं अमेरिका खंडाचा शोधच लागलेला नव्हता. तेव्हां अशा प्रकारच्या ह्या विस्तीर्ण ब्रिटिश राज्याचा विस्तार कसकसा होत गेला, ह्या विषयींच्या इतिहासाचा संबंध फार प्राचीन काळापर्यंत पोहोंचणें साहजिक आहे. तसेंच ह्या राज्याच्या विस्ताराच्या इतिहासाचा संबंध फक्त इंग्लंदाच्या किंवा युरोपाच्या इतिहासांशींच आहे असें नाहीं; तर सर्व जगाच्या इतिहासाशीं आहे, हें उघड आहे.

बाबिलन व ईजिप्त ( मिसर देश ) ह्यांसारख्या अति प्राचीन काळच्या सुधारलेल्या देशांविषयीं बायबला-

---

*" Rome was not built in a day. " ही मूळ इंग्लिश म्हण होय. ह्याच अर्थाच्या मराठी म्हणी, "पी हळद, हो गोरी, " " आज खाई तूप, उद्यां पाही रूप, " वगैरे आहेत.

मध्यें ( ख्रिस्ती धर्माच्या पुस्तकामध्यें ) वर्णन आढळतें. ह्या देशांविषयीं विचार केला असतां ध्यानांत येईल कीं, युफ्रेतिस व नैल ह्यांसारख्या नद्यांच्या कांठीं राहणाऱ्या लोकांनीं ह्या राज्यांची स्थापना केली होती. ईजिप्त व बाबिलन वगैरे देश भरभराटींत होते, ह्याचें कारण तेथील जमीन फार सुपीक होती हें होय. तसेंच त्या देशांतील नद्या तेथील लोकांस परस्परांशीं व्यापार करण्यास एक फार उत्तम साधन झालें होतें, हेंहि त्यांच्या भरभराटीचें एक कारण होतें. वरील काळाच्या जरा अलीकडे आलों असतां, त्या काळीं सुधारलेलीं सर्व राष्ट्रें भूमध्य समुद्राच्या आसमंतात् होतीं, असें आढळतें. टायर, ग्रीस, रोम व कार्थेज हीं चार राष्ट्रें अशा प्रकारचीं होत. हीं सर्व एकमेकांशीं व्यापार करीत, व ईजिप्त देशाशीं ह्यांचा व्यापार चालत असे. तसेंच ह्यांनीं युरोप, एशिया व आफ्रिका ह्या तिन्ही खंडांत भूमध्य समुद्राच्या आजूबाजूंस वसाहती स्थापिल्या होत्या. सुधारणेच्या संबंधानें ईजिप्त व बाबिलोनिया ह्या देशांतील प्राचीन लोकांस ह्या राष्ट्रांनीं मागें टाकिलें. कारण एकाच नदीच्या तीरावर कोंडून राहिलेल्या त्या लोकांपेक्षां ह्यांना सुधारणा करण्याचीं अधिक साधनें अनुकूळ होतीं. आपणांस असें दिसून येतें कीं, जेव्हां सुधारणेनें **नदी-तीर** सोडून **समुद्र किनारा** आपलें घर केलें, तेव्हां तिच्या वृद्धींत मोठें अंतर पडलें. भूमध्य

समुद्राच्या आसपास असलेल्या ह्या चार देशांपैकीं रोमचें लष्कर सर्वांत जास्त होतें, व व्यापार कमी होता; म्हणून कांहीं काळानें रोमन लोकांनीं टायर, ग्रीस व कार्थेज हे देश जिंकून घेतले, व भूमध्य समुद्राचा सर्व किनारा आपल्या ताब्यांत आणिला. तसेंच ब्रिटन देश ह्या काळापर्यंत सुधारणेच्या टप्प्याच्या बाहेर होता, तो त्यांनीं जिंकून ब्रिटिश लोकांना सुधारणेच्या मर्यादेच्या आंत आणून सोडिलें, हा त्यांजवर रोमन लोकांनीं मोठा उपकार केला.

कित्येक शतकें भूमध्य समुद्र हें सुधारणेचें माहेरघर होतें. जरी रोमन राष्ट्रावर एका बाजूनें गाथ ( फ्रान्स ) व जर्मनी ह्यांनीं व दुसऱ्या बाजूनें मुसलमान लोकांनीं स्वाऱ्या केल्या, तरी युरोपांतील राष्ट्रें भूमध्य समुद्रालाच धरून होतीं. त्यांचा बहुतेक व्यापार भूमध्य समुद्रांतून व युरोप खंडाच्या उत्तरेकडील देशांमधील लहान लहान समुद्रांतून चालत असे. ह्याशिवाय जो थोडा बहुत व्यापार राहिला, तो फक्त हिंदुस्थानाशीं चालत असे, व तो कारवानांच्या द्वारें चालत असे. हे कारवान हिंदुस्थानांतील जिन्नस भूमध्य समुद्राच्या किनाऱ्यापर्यंत आणून टाकीत; व नंतर त्या जिनसांचा खप ज्या देशांत होत असे, त्या देशांत ते जलमार्गानें पाठविण्यांत येत. खुद्द हिंदुस्थानाविषयीं त्या लोकांस थोडीच माहिती असे. चीन देशाची त्या

काळीं वार्ताहि नव्हती असें म्हटलें तरी चालेल. तसेंच आफ्रिका खंडांत उत्तरेकडे अबिसीनिया व पश्चिमेकडे मोरोक्को ह्यांच्या पलीकडे कोणाचाहि प्रवेश झाला नव्हता. ह्याहून अधिक लांबच्या प्रदेशांविषयींची [ अमेरिका खंडाची ] कल्पनाहि कोणाच्या मनांत आली नव्हती; कारण पृथ्वी सपाट आहे, असें लोक मानीत होते. म्हणून पृथ्वी वास्तविक गोलाकार असून आपल्या खालच्या अंगासहि वस्ती असणें साहजिक आहे, ही कल्पना त्यांस नव्हती. तसेंच ती वाटोळी आहे असें जेव्हां त्यांस पुढें आढळून आलें, तेव्हां देखील तिचा वास्तविक जेवढा आकार आहे, त्यापेक्षां ती पुष्कळ लहान आहे, असें ते लोक मानीत असत. म्हणून त्यांना जेवढा प्रदेश माहित होता तेवढीच पृथ्वी आहे, असें त्यांना वाटणें साहजिक होतें.

तथापि १५व्या शतकाच्या अखेरीस, म्हणजे ट्यूडर घराण्यांतील पहिला राजा ७वा हेन्री हा इंग्लंदांत राज्य करीत होता त्या वेळेच्या सुमारास, अशा दोन विलक्षण गोष्टी घडून आल्या कीं, त्यांमुळें भूगोलाविषयींचा लोकांचा पूर्वग्रह बदलून गेला. १ली गोष्ट ही कीं, थेट पश्चिमेकडे जातां जातां ख्रिस्तोफर कोलंबस ह्यानें अमेरिका खंड शोधून काढिलें; व २री गोष्ट ही कीं, वास्को दी गामा ह्यानें केप आफ गुड होप ह्या भूशिरास वळसा घालून हिंदुस्थानास जलमार्गानें जाण्याचा

रस्ता शोधून काढिला. हे दोन्ही शोध अत्यन्त महत्त्वाचे होते. कारण प्राचीन काळापासून सुधारणेचें मुख्य स्थान जें भूमध्य समुद्र झालें होतें, तें ह्या शोधांमुळें नाहींसें होऊन त्याच्या ऐवजीं अतलांतिक महासागर हें मुख्य स्थान झालें. शिवाय कोणत्याहि राष्ट्राच्या सत्तेचा अजमास ह्या वेळापर्यंत त्या राष्ट्राचें युरोप खंडांत जें महत्त्व असे त्यावरून करीत असत; परंतु ह्यापुढें सर्व जगांत त्या राष्ट्राचें महत्त्व ज्या प्रमाणानें असेल, त्या मानानें त्याचें युरोप खंडांत महत्त्व समजूं लागले. ज्याप्रमाणें बाबिलोनियाचें महत्त्व पूर्वी नाहींसें झालें होतें, त्याप्रमाणेंच इताली देशांतील फ्लारेन्स व वेनिस वगैरे लहान लहान लोकसत्ताक राज्यांचें महत्त्व आतां नाहींसें झालें. तसेंच ज्याप्रमाणें भूमध्य समुद्राच्या किनाऱ्यावरील ग्रीस व कार्थेज हे देश पूर्वी अत्यन्त प्रबळ झाले होते, त्याप्रमाणेंच स्पेन, पोर्तुगाल, फ्रान्स व इंग्लंद हे अतलांतिक महासागराच्या किनाऱ्यावरील देश जगांत आतां फार बलिष्ठ झाले.

अमेरिका खंड आणि हिंदुस्थानास येण्याचा जलमार्ग ह्या दोन शोधांपैकीं एकहि शोध इंग्रजांच्या हातून लागलेला नाहीं, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. हे दोन शोध लाविल्याचें यश अनुक्रमें स्पेन व पोर्तुगाल ह्या देशांनीं घेतलें. म्हणून ह्या आपल्या शोधांचा उपयोग आपण पाहिजे त्या रीतीनें करून घेऊं,

असा हक्क तीं राष्ट्रें साहजिकच सांगूं लागलीं. तथापि तीं राष्ट्रें ह्या संबंधानें आपापसांतच भांडतील, अशी थोडीशी भीति होती. परंतु हें भय फार सुलभ उपायानें नाहींसें झालें. त्या काळीं युरोप खंडांतील लोकांची समजूत अशी होती कीं, नवीन शोधून काढिलेलीं बेटें व इतर प्रदेश, ह्यांजवर मालकी पोपाची [ ख्रिस्ती धर्माच्या मुख्य गुरूची ]. ज्या मूर्तिपूजक लोकांनीं त्या प्रदेशांत प्रारंभीं वसाहत केली होती त्यांची त्या प्रदेशांवर कांहीं तरी सत्ता आहे, असें मानणें रीतीचेंच आहे, हा विचार क्षणभर देखील कोणाच्या लक्षांत आला नाहीं. पुढें आपल्या हक्कांचा निर्णय करण्यासाठीं स्पेन देशांतील लोकांनीं व पोर्तुगीज लोकांनीं जेव्हां पोपाला विनंति केली, तेव्हां त्यानें ह्या प्रकरणाचा निकाल केला तो असा. त्या वेळच्या देवभोळे लोकांच्या मताप्रमाणें पृथ्वी सपाट आहे असें त्यानें ठरविलें, व नकाशा घेऊन ओझोर्स बेटांच्या पश्चिमेस एक दक्षिणोत्तर सरळ रेषा ओढिली; आणि ह्या रेषेच्या पश्चिमेकडील सर्व प्रदेश स्पेन देशाला व पूर्वेकडील सर्व प्रदेश पोर्तुगाल देशाला देऊन टाकिला. स्पेन देशानें लाविलेल्या शोधाचा—अमेरिका खंडाचा—फायदा स्पेनला मिळावा, व पोर्तुगाल देशानें लाविलेल्या शोधाचा—हिंदुस्थानच्या जलमार्गाचा—फायदा पोर्तुगालला मिळावा, असा पोपाचा उद्देश होता. ( प्रारंभीं दिलेला नकाशा पहा. ) अर्थात् प्रत्येकाचें

पाऊल जसं जसें पुढें पडणार, तस तसे ते एकमेकांपासून अधिकाधिकच अलग होत जाणार. म्हणून ह्या ठरावामुळे त्यांचें परस्परांमध्यें भांडण होण्याचा संभव नाहींसा झाला.

पोपाचा हा ठराव जर इंग्लिशांनीं मानिला असता तर नव्या जगांत (अमेरिका खंडांत) त्यांस पाऊल टाकण्यासहि जागा मिळाली नसती. परंतु त्यांनीं पोपाचा अधिकार लवकरच झुगारून दिला; म्हणून

इंग्रजांच्या वसाहतीं-संबंधी राज्याचा प्रारंभ.

जे जे नवीन प्रदेश माहित होत चालले होते, त्या त्या प्रदेशांत जाऊन व्यापारासंबंधानें आपला फायदा त्यांना करून घेतां आला. हा एक तत्कालीन *धर्मक्रांतीचाच परिणाम होय. ह्या नवीन वसाहतींना मूळच्या देशांशीं (ज्या ज्या देशांतील लोकांनीं त्या स्थापिल्या असतील त्या देशांशीं) मात्र व्यापार करूं द्यावयाचा, अशी युरोप खंडांतील सर्व राष्ट्रांची त्या वेळीं समजूत होती. तेव्हां आपण स्वतः जर वेळींच कांहीं हालचाल केली नाहीं, तर व्यापारासाठीं नवीन उघडणाऱ्या ह्या पेठांचा (अमे-

*युरोप खंडांतील ख्रिस्ती देवालयांतून चालू असलेल्या धर्माचें स्वरूप बदलून त्यांत सुधारणा करण्याची सुरवात १६व्या शतकांत झाली; तीस "रेफर्मेशन" (धर्मक्रांति) म्हणतात. ही हकीगत ८व्या हेन्रीच्या कारकीर्दीत घडली; व ह्या वेळेपासून पोपाची सत्ता फार कमी होत चालली.

रिका, आस्ट्रेलिया, वगैरे प्रदेशांचा ) आपणांस कांहींच उपयोग होणार नाहीं, आणि स्पेन व पोर्तुगाल ह्या राष्ट्रांनीं उदयास येण्याची जी संधी साधिली, ती आपण गमाविल्याप्रमाणें होईल, असें इंग्लिश लोकांस वाटलें. "*दूध सांडून गेल्यावर त्यासाठीं रडत बसण्यांत कांहीं अर्थ नाहीं, " असें त्या काळच्या इंग्लिश लोकांस घरीं स्वस्थ बसून म्हणतां आलें असतें; अथवा अन्य रीतीनें आपलें समाधान करून घेतां आलें असतें; परंतु त्यांनीं तसें कांहीं केलें नाहीं. त्या काळीं स्पेन देशाशीं त्यांचें फारसें सख्य नव्हतें; म्हणून इंग्रजांच्या खलाशांनीं जहाजें तयार केलीं, आणि स्पेन देशाच्या वसाहतींतून खजिन्याचीं गलबतें भरून स्पेन देशास येत असतां, व्यापार करण्यास प्रतिबंध केल्यामुळें आपलें जें नुकसान झालें होतें तें इंग्रजांनीं आपलें आपणच भरून काढिलें! स्पेन देशाच्या व्यापाराचें जें हें नुकसान झालें त्यामुळें तेथील राजा फिलिप ह्यास फार त्वेष आला; व पुढें लवकरच त्यानें '**स्पॅनिश आरमाडा**' ( स्पेन देशचीं लढाऊ गलबतें ) म्हणून जें मोठें आरमार इंग्लंदावर पाठविलें, त्याचें मुख्य कारण हेंच होय.

ह्या आरमाराचा पराभव झाल्यामुळें फिलिपाच्या

" * It was no use crying over spilt milk, " ही मूळ इंग्रजी म्हण होय. 'गतं न शोच्यम्' ही संस्कृत म्हण ह्याच अर्थाची आहे.

आरमारासंबंधी श्रेष्ठत्वाचा ऱ्हास झाला, आणि इंग्लिश व डच ह्या लोकांनीं प्रथम त्याचीं गलबतें लुटिलीं. नंतर ज्या प्रदेशावर स्पेन देशांतील लोक हक्क सांगत होते, त्या प्रदेशांत जाऊन वसाहती करण्यास त्यांनीं प्रारंभ केला. शिवाय ह्या सुमारास स्पेन देशांतील लोकांनीं पोर्तुगाल देश जिंकून घेतला होता; म्हणून पोर्तुगीज वसाहतींवरहि अशाच प्रकारचे हल्ले करण्यास अडथळा राहिला नाहीं. अशा रीतीनें मूळ शोध लावणाऱ्या राष्ट्रांचें नुकसान करून इंग्लंद व हालंद हे देश त्या शोधांपासून आपला कायमचा फायदा करून घेण्याच्या उद्योगास लागले. ससाण्यानें धनगराच्या कळपांतील कोंकरूं चोरावें; व पुढें ससाण्यापासून गरुडानें तें हिसकावून घ्यावें, त्याप्रमाणें ह्या दोन देशांचें वरील वर्तन झालें. इंग्लंदचा राजा पहिला जेम्स ह्याच्या मनांत स्पेन देशाशीं सख्य करावयाचें होतें, व तसें केल्यानें इंग्रज लोकांच्या व्यापारास धक्का बसण्याचा संभव होता. पुढें तो राजा इंग्रजांस अप्रिय होण्याचें कारण कांहीं अंशानें हेंच होतें.

अमेरिकेंत स्थापिलेल्या वसाहती ३ प्रकारच्या होत्या. त्या खंडाचा शोध लावणारांचा पहिला उद्देश सांपडेल तितकें सोनें मिळवावें हा होता; म्हणून सोन्याच्या खाणींचें काम चालविण्यासाठीं त्यांनीं प्रथम वसाहती स्थापिल्या, त्या १ल्या प्रकारच्या होत. मेक्सिको व पेरू ह्या स्पेन देशाच्या वसाहती अशा प्रकारच्या

अमेरिकेंतील वसाहती.

होत्या. उष्ण कटिबंधांत होणाऱ्या उसासारख्या पदार्थांची लागवड करून स्वदेशास त्या पदार्थांचा पुरवठा करणें हा त्यांचा दुसरा उद्देश होता; व अशा प्रकारच्या वसाहती २ऱ्या प्रकारच्या होत. वसाहत करणारांनीं ह्या झाडांची पुष्कळ लागवड केली. ह्या कामीं त्यांनीं प्रथमतः त्या देशांतील नेटिव्हांस मजुरीनें लाविलें; आणि जेव्हां तें काम त्यांच्या हातून होत नाहीं असें आढळून आलें, तेव्हां आफ्रिका खंडांतून काम करण्यासाठीं त्यांनीं शिद्दी लोकांस मुद्दाम नेलें. ह्या दुसऱ्या प्रकारच्या वसाहती म्हटल्या म्हणजे वेस्ट इंदीज बेटें ह्या होत. स्पेन व पोर्तुगाल ह्या देशांच्या वसाहतींचा समावेश ह्या २ऱ्या वर्गांत होत असे. ३ऱ्या एका प्रकारच्या वसाहती करण्यासारख्या होत्या, हें उघड आहे. त्या वसाहती अशा कीं, स्वदेशांतल्याप्रमाणेंच आंग मेहनतीनें तेथें शेतकीचा धंदा करावयाचा. स्पेन व पोर्तुगाल ह्यांच्या अशा प्रकारच्या वसाहती नव्हत्या; परंतु इंग्लंदाच्या बहुतेक वसाहती ह्या ३ऱ्या वर्गांत मोडतात.

१७ व्या शतकाच्या आरंभापर्यंत इंग्रज लोकांनीं अमेरिका खंडांत कोठेंहि स्थाइक वस्ती केली नव्हती. परंतु लवकरच उत्तर अमेरिकेच्या पूर्वेस बऱ्याच अंतरावर अतलांतिक महासागरांतील बर्म्युदा नांवाचीं बेटें त्यांनीं हस्तगत करून घेतलीं; व हाच इंग्लंदच्या

वसाहतींसंबंधी राज्याचा आरंभ होय. स्पेन व पोर्तुगाल ह्या देशांच्या वसाहती बहुतेक त्या त्या देशाच्या सरकारांकडून स्थापण्यांत आल्या होत्या; परंतु इंग्लंदच्या वसाहती खाजगी मनुष्यांनीं स्थापिल्या होत्या. पहिला जेम्स व पहिला चार्लस हे राजे इंग्लंदचें राज्य करीत असतां अनेक कारणामुळें + नॉन्-कन्फॉर्मिस्टः व * रोमन क्याथलिक हे लोक इंग्लंद देश सोडून जाण्यास तयार झाले; आणि ह्या देशांतर करण्यास तयार झालेल्या लोकांनीं व ÷ एस्टॅब्लिशड् चर्चमधील कांहीं थोड्या साहसी लोकांनीं अमेरिका खंडांत वसाहतींची एक मालिकाच स्थापिली. ह्या वसाहतींत स्वदेशापेक्षां आपणांस अधिक सुखानें राहतां येईल, असें त्यांस वाटलें. आरंभापासून ह्या वसाहती भिन्न भिन्न प्रकारच्या होत्या. व्हर्जिनिया ह्या वसाहतींतील राज्यसत्ता बडे लोकांच्या हातीं असून तेथें × चर्च ऑफ् इंग्लंद हा धर्मपंथ सुरू

---

+ दुसरा चार्लस राजा ह्यास पुन्हा राज्यपदावर बसविलें, त्या वेळीं इंग्लंदांत नवीन स्थापन झालेल्या धर्मप्रमाणें चालण्याचें ज्यांनीं नाकारिलें, त्यांस 'नॉन्कन्फॉर्मिस्ट' असें नांव दिलें होतें.

* ख्रिस्ती धर्माचे ३ पंथ आहेत: १ रोमन क्याथलिक, २ प्राटेस्टंट व ३ ग्रीक.

÷ एस्टॅब्लिशड् चर्च—सरकारानें स्थापन केलेला व ज्यास सरकारचा आश्रय आहे, असा धर्मपंथ.

× **चर्च ऑफ् इंग्लंड**—इ. स. १५३४त आठवा हेन्री ह्यानें "इंग्लंदचा श्रेष्ठ नायक" (सुप्रीम हेड ऑफ् दि चर्च

होता, व गुलामांच्या व्यापारास तेथें प्रत्यवाय नव्हता; मेरिलंद ही वसाहत रोमन क्याथलिक पंथाची असून

---

ऑफ् इंग्लंड ) हें पद धारण केलें. ह्याप्रमाणें ज्या धर्मपंथाला राजाश्रय आहे त्याला ' चर्च ऑफ् इंग्लंड ' म्हणतात. सहावा एडवर्ड हा प्राटेस्टंट धर्मपंथानुयायी असून क्रानमर, रिडले व लाटिमर ह्यांच्या साह्यानें त्यानें इंग्लंदांतील धर्माच्या सुधारणेसाठीं पुष्कळ खटपट केली. सहावा एडवर्ड ह्यानें धर्मसंबंधी केलेले कायदे चालू ठेवण्याविषयीं मेरी राणीनें वचन दिलें होतें. परंतु ती निःसीम क्याथलिक मताची पडल्यामुळें गादीवर बसल्याबरोबर धर्मसुधारणेचा विध्वंस करण्याची सुरवात तिनें केली. क्रामनर, रिडले व लाटिमर ह्यांस तिनें तुरुंगांत टाकिलें; व लवकरच ह्या तिघांस व दुसऱ्याहि पुष्कळांस धर्माच्या पायीं अग्निमुखीं पडावें लागलें. हिच्या कारकीर्दीतील शेवटच्या तीन वर्षांत पुरुष, स्त्रिया व मुलें मिळून सुमारें २८० माणसांस पाखंड मताचीं म्हणून जाळून टाकण्यांत आलें. नंतर १५५९त प्राटेस्टंट मताची पुन्हा स्थापना होऊन इंग्लंदच्या धर्मपंथास सांप्रतचें स्वरूप आलें. १५६२त क्रानमर ह्यानें लिहिलेल्या धर्मश्रद्धेच्या ३९ कलमांचा प्रार्थनेच्या पुस्तकांत समावेश करण्यांत आला. एलिझाबेथ राणीनें असें निक्षून सांगितलें कीं, सदर्हू ३९ कलमांत निर्दिष्ट केल्याप्रमाणें जें ' इंग्लंडचें एपिस्कोपल चर्च ' [ कायद्यानें स्थापन झालेला इंग्लंदांतलि धर्मपंथ तो हाच, व ह्याजवर सर्व प्रकारची देखरेख बिशप लोकांची] त्यांतील मतांपासून कार्डीभरहि अलीकडे पलीकडे पाऊल पडल्यास आपणांस सहन व्हावयाचें नाहीं. असें असतांहि इंग्लंदांत १६४९त ' प्रेसबिटेरियन ' म्हणून एक धर्मपंथ चालू झाला. धर्मसंबंधी बंडाचा इंग्लंदांत आतां अगदीं बीमोड झाला आहे. राजाश्रित धर्मपंथाचे सर्व हक्क इतर सर्व धर्मपंथाच्या लोकांसाहि देण्यांत आले आहेत.

तेथेंहि गुलामांचा व्यापार होता; आणि न्यू इंग्लंद स्टेटस् हीं ÷ प्यूरिटन पंथाचीं असून तेथें गुलामांच्या व्यापारास प्रतिबंध होता.

ह्या वसाहती अतूलांतिक महासागराच्या पूर्व किनाऱ्यावर पसरल्या होत्या. न्यू आमस्तर्दाम—जिला हल्लीं न्यूयार्क म्हणतात—ती वसाहत वरील इंग्लिशांच्या वसाहतींच्या मध्यभागीं होती; व ती डच लोकांच्या ताब्यांत होती. तसेंच ह्या वसाहतींच्या दक्षिणेस स्पेन देशांतील लोकांची फ्लारिडा ही वसाहत होती. आणखीहि खालीं दक्षिणेस मिसिसिपी नदीच्या कांठचा प्रदेश; तसेंच उत्तरेस एकेडी प्रांत व सेंट लारेन्स नदीच्या कांठचा प्रदेश हे होते. एकेडी प्रांताला हल्लीं नोवा स्कोशिया म्हणतात; व सेंट लारेन्स नदीच्या कांठच्या प्रदेशाला कानडा म्हणतात. ह्या ३ वसाहती—मिसिसिपीच्या कांठचा प्रदेश, एकेडी प्रांत व सेंट लारेन्स नदीच्या कांठचा प्रदेश—फ्रेंचांच्या ताब्यांत होत्या. इंग्लिशांच्या प्रत्येक वसाहतीचें एक एक लहानसें पार्लमेंट होतें;

---

÷ **प्युरिटन**—एलिझाबेथ राणीच्या कारकीर्दींत व तिच्यामागून लागलेच जे राजे गादीवर बसले त्यांच्या वेळीं एक नवीन धर्मपंथ उत्पन्न झाला. ईश्वराची स्तुति करण्याचा मार्ग अगदीं पवित्र ( प्यूअर ) असावा, अशी ह्या पंथांतील लोकांची इच्छा असे, म्हणून त्यांना प्यूरिटन म्हणत. १६४० पासून १६६० पर्यंत इंग्लंदाच्या इतिहासाशीं त्यांचा पुष्कळ संबंध आलेला आहे. हे लोक आपलें आयुष्य शांतपणानें व सद्गुणानें राहून घालवितात, अशी त्यांची आख्या आहे.

परंतु तिच्यावरील गव्हर्नराची नेमणूक इंग्लंदाहून होत असे; व त्या वसाहतींना इंग्लंदाशीं व्यापार करण्याची मात्र मोकळीक असे. उत्तर अमेरिकेंतील इंग्लिशांच्या वसाहतींच्या आरंभाचा इतिहास ह्याप्रमाणें झाला.

ह्यावरून असें दिसून येईल कीं, क्रामवेल ह्याची सत्ता इंग्लंदांत होती त्यावेळीं, म्हणजे १७व्या शतकाच्या मध्याच्या सुमारास, अमेरिका खंड स्पेन, पोर्तुगाल, फ्रान्स, हालंड व इंग्लंद इतक्या युरोपांतील राष्ट्रांच्या ताब्यांत होतें. ह्यांपैकीं स्पेन व पोर्तुगाल ह्यांचे भाग मोठाले होते. उत्तर अमेरिकेंत फ्रान्सच्या

लढाई करून मिळविलेल्या वसाहती.

ताब्यांत बराच मुलूख होता; व वरील दोन राष्ट्रांच्या खालोखाल फ्रान्साचेंच वर्चस्व तेथें होतें. हालंद व इंग्लंद ह्यांच्या ताब्यांत त्या काळीं सर्वांत कमी प्रदेश होता. आतां तेव्हां अमेरिका खंडांत हालंदच्या ताब्यांत फारच कमी मुलूख होता हें खरें; परंतु एशिया खंडाच्या आग्नेय किनाऱ्यापासून बऱ्याच अंतरावरील मसाल्यांच्या बेटांत व जावा बेटांत त्यांच्या पुष्कळच वसाहती होत्या. बर्म्यूदा बेटांतील व उत्तर अमेरिकेच्या किनाऱ्यावरील इतर लहानसान वसाहती इतक्याच काय त्या इंग्लंदच्या ताब्यांत होत्या. अमेरिकेंतील मूळच्या रहिवाशांच्या ताब्यांतील प्रांत जिंकण्यांतच हा वेळपर्यंत वरील युरोप खंडांतील राष्ट्रांची चढाओढ सुरू होती. परंतु आलिव्हर क्रामवेल ह्यानें

इतर राष्ट्रांनीं स्थापिलेल्या नवीन वसाहती जिंकण्यासाठीं लढण्याची सुरवात केली. बरींच वर्षें इंग्लिशांच्या आरमाराचें प्राबल्य वाढत चाललें होतें; व म्हणून क्रामवेलानें स्पेन देशाशीं उघडपणें लढाई सुरू केली; आणि जमेका बेटावर आरमार पाठवून तें स्पेन देशांतील लोकांपासून त्यानें घेतलें. तें तेव्हांपासून इंग्लिशांच्याच ताब्यांत आहे.

युरोपांतील लढायांतून आतांपासून कांहीं विशेष प्रकारचा फेरफार दिसून येऊं लागला. तेव्हांपासून वाटर्लूच्या लढाईपर्यंत ( १८१५ पर्यंत ) इंग्लिशांनीं ज्या ज्या लढाया केल्या, त्या त्या लढायांत त्यांचा मुख्य उद्देश म्हटला म्हणजे, आपल्या प्रतिपक्ष्यांच्या वसाहती घेणें, व त्यांचें ह्याप्रमाणें नुकसान करून आपल्या वसाहतींचा विस्तार वाढविणें, एवढाच मुख्यत्वें करून होता. ह्या प्रकारचें आचरण करण्यास त्यांना नीतिदृष्ट्या अधिकार होता किंवा नाहीं, हा प्रश्न स्वतंत्र आहे; तथापि १८१४ पर्यंत त्यांनीं मिळविलेल्या बहुतेक वसाहती त्यांनीं इतर राष्ट्रांपासून हिसकावून घेतल्या आहेत, इतकी गोष्ट निर्विवाद आहे.

इतर राष्ट्रांचें नुकसान करून आपल्या वसाहती वाढविण्याचा प्रयत्न इंग्लिशांनीं चालविला, तेव्हां त्या प्रयत्नाबरोबरच त्या वसाहतींतील जितका व्यापार आपल्या हातीं आणितां येईल तितका आणण्याविषयींहि

प्रयत्न त्यांनीं चालविला होता. युरोप खंडांतील भिन्न भिन्न राष्ट्रांचा परस्परांशीं चालणारा बहुतेक व्यापार त्या काळीं डच लोक करीत असत; एका राष्ट्रांतील बंदरीं त्या राष्ट्रांत उत्पन्न होणारा माल ते विकत घेत; आणि दुसऱ्या राष्ट्रांतील बंदरीं नेऊन तेथें अधिक किमतीस विकून नफा मिळवीत; अशा प्रकारची त्यांची व्यापाराची पद्धति होती. ह्या रीतीनें जलमार्गानें त्यांनीं प्रचंड व्यापार सुरू केला होता; व त्याच्या संरक्षणासाठीं बलाढ्य आरमार ठेविलें होतें. हा डच लोकांचा व्यापार इंग्लिशांच्या डोळ्यांत सलत होता; म्हणून तो त्यांच्यापासून हिसकावण्याची इंग्लिशांना फार इच्छा झाली. डच लोकांचा व्यापार अगदीं बुडविण्याच्या इराद्यानें "गलबतें जाण्यायेण्यासंबंधीं कांहीं कायदे" (नॅव्हिगेशन आक्टस्) त्यांनीं ठरविले. वसाहती व त्या ज्यांनीं स्थापिल्या असतील ते देश ह्यांमधील व्यापार कशा रीतीनें चालावा, हें त्या कायद्यांत ठरविलें होतें; व म्हणून त्यांना फार महत्त्व आलें. कोणताहि माल ज्या देशांत तयार झाला असेल त्या देशाच्या गलबतांतून किंवा इंग्लंदच्या गलबतांतून मात्र तो इंग्लंदास आणावा, असा त्या कायद्यांमुळें ठराव झाला. अर्थात् ह्यामुळें डच लोकांच्या व्यापाराला विलक्षण धक्का बसला. तेव्हां ह्याबद्दल सूड उगविण्याची इच्छा त्यांना होणें साहजिकच होतें. म्हणून इंग्लंदांत

डच लोकांबरोबर वसाहतींसंबंधानें युद्धें.

प्रजासत्ता (×कॉमन–वेल्थ ) होती त्या वेळीं व दुसऱ्या चार्लसच्या वेळीं इंग्लिश व डच ह्या लोकांमध्यें नेहमीं लढाया सुरू होत्या. तथापि डच लोकांची सत्ता हळू हळू नष्ट होत चालली; व म्हणूनच न्यू आमस्तर्दाम (न्यूयार्क) व सेंट हेलिना ह्या डच लोकांच्या दोन महत्त्वाच्या वसाहती इंग्लिशांना मिळाल्या. इंग्लिशांच्या नव्या वसाहती व व्हर्जिनिया ह्यांच्यामध्यें न्यू आमस्तर्दाम ही वसाहत होती. तसेंच सेंट हेलिना ही वसाहत आफ्रिका खंडाच्या दक्षिण किनाऱ्यावर बऱ्याच अंतरावर होती. केप आफ गुड होप इंग्लिशांनीं घेतलें, त्यापूर्वी हिंदुस्थानास जाणाऱ्या येणाऱ्या इंग्लिशांच्या गलबतांना मध्यें मुक्काम करण्यास सेंट हेलिना ही वसाहत फार उपयोगी पडत असे. डच लोकांच्या वसाहतींशीं इंग्लिशांचा जो हा सामना झाला, त्यामुळें त्यांचा एक मोठा शत्रु नाहींसा झाला.

ह्याप्रमाणें डच लोकांपासून उपद्रव होण्याची

× इंग्लंदचा राजा पहिला चार्लस हा हट्टी व खुनशी असून पार्लमेंटाशीं त्याचीं नेहमीं भांडणें सुरू असत; व पार्लमेंटापासून स्वतंत्र होण्याचा त्यानें प्रयत्न केला होता. म्हणून पार्लमेंटानें त्याची चौकशी करून त्याला गुन्हेगार ठरवून १६४९ त त्याचा शिरच्छेद केला. ह्यापुढें राजा मुळींच नाहीं, सर्व सत्ता प्रजेची, असें पार्लमेंटानें ठरविलें, व काम चालविण्यासाठीं मंत्रिमंडळ [ कौन्सिल ] नेमिलें. ब्राडशा हा ह्या मंत्रिमंडळाचा अध्यक्ष होता. परंतु वास्तविकपणें सर्व सत्ता क्रामवेल ह्याच्या हातीं होती. अशी स्थिति १६४९–१६६० चालली होती; म्हणजे ह्या मुदतींत इंग्लंदच्या गादीवर राजा मुळींच नव्हता. ह्या व्यवस्थेला "कॉमन–वेल्थ" म्हणतात.

भीति नाहींशीं झाल्यामुळें त्यांहूनाहि प्रबळ शत्रु जे फ्रेंच त्यांनकडे लक्ष देण्यास इंग्रजांना अवकाश मिळाला.

फ्रेंच लोकांबरोबर वसाहतींच्या संबंधानें युद्धें.

इंग्लिशांचा फ्रेंचांशीं निरनिराळ्या काळीं कोण कोणत्या प्रकारचा संबंध होता, ह्याचा विचार करूं लागलों असतां त्या काळाचे ४ भाग होतात. १४व्या व १५व्या शतकांत साधारणपणें पाहिलें असतां, ह्या दोन राष्ट्रांच्या लढाया सुरू होत्या. क्रेसी व पाइटियर्स येथील लढाया, तसेंच आजिंकूर येथील लढाई व जोन आफ आर्क हिची हकीगत, इत्यादि गोष्टी वरील काळांत घडलेल्या आहेत; व हाच पहिला भाग होय. पुढें १६व्या व १७व्या शतकांत सामान्यतः इंग्लिशांचें व त्यांचें सख्य होतें. मेरी राणीच्या कारकीर्दींत इंग्लिशांपासून फ्रेंचांनीं कयाले ( फ्रान्सच्या उत्तर किनाऱ्यावरील एक ) शहर परत घेतलें. तेव्हांपासून ( १५५८ पासून ) तिसरा विल्यम ह्याच्या कारकीर्दीतील लढायांपर्यंत इंग्लिश व फ्रेंच ह्यांच्यामध्यें महत्त्वाची अशी एकहि लढाई झाली नाहीं, असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. हा दुसरा भाग होय. नंतर तिसऱ्या भागास सुरवात झाली. ह्या काळांत, तिसरा विल्यम गादीवर बसल्यापासून १८१५तील वाटर्लूच्या लढाईपर्यंत ह्या उभयतांत अनेक लढाया झाल्या; मधून मधून मात्र कांही वेळ शांतता असे. नंतर चौथा भाग आला. ह्या काळांत शांतता होती; व फ्रान्स आणि इंग्लंद ह्या

देशांचा विशेष स्नेह होता. म्हणून पुढें इंग्लंदाची व रशियाची जी लढाई झाली, त्या लढाईंत व दुसऱ्या कित्येक प्रसंगीं फ्रेंच लोकांनीं इंग्लिशांस साहाय्य केलें.

इतिहास वाचीत असतां त्यांतील गोष्टींचे वर दर्शविल्याप्रमाणें ठळक ठळक भाग करितां येतील, तेव्हां तसे ठळक भाग होण्यास कांहीं विशेष कारणेंहि असलीं पाहिजेत, असें अनुमान सहज होतें. तसेंच दोन राष्ट्रांमध्यें बराच काळ लढाया व्हाव्या, पुढें बराच काळ त्यांच्यामध्यें तह व्हावे; अशा ह्या स्थित्यंतरांचें कारण काय, असा प्रश्न साहजिक उद्भवतो. कोणी म्हणतात, " राजे महत्त्वाकांक्षी असतात " हेंच ह्या लढायांचें कारण होय; पण हें उत्तर समर्पक दिसत नाहीं. कारण राष्ट्रांना राजे सर्वकाळ असतातच; व केव्हां केव्हां त्यांच्या ठिकाणीं महत्त्वाकांक्षा असते व केव्हां केव्हां नसते, असेंहि म्हणणें सयुक्तिक दिसणार नाहीं.

दुसरी एक गोष्ट ह्या संबंधानं सांगण्यासारखी आहे. राजांची महत्त्वाकांक्षा हेंच जर लढायांचें मुख्य कारण असेल, तर ज्या काळीं इंग्लंदांत राजांच्याच हातीं विशेष सत्ता होती, त्या काळीं लढायाहि विशेष होणें योग्य होतें. आतां ट्यूडर घराणें व स्टयूअर्ट घराणें ह्यांतील राजे राज्य करीत असतां राजांची सत्ता मोठी होती; तरी देखील त्या काळांत शांतता होती. उलट पक्षीं तिसरा एडवर्ड व पांचवा हेन्री, तसेंच पाहिला

जार्ज व दुसरा जार्ज ह्यांच्या कारकीर्दींत राजांची सत्ता कमी असून पार्लमेंटाची सत्ता फार मोठी होती; इतकी मोठी होती कीं, लढाईस लागणारा पैसा जर पार्लमेंटानें मंजूर केला नाहीं, तर राजांना क्षणभराहि लढाई करितां येत नव्हती. असें असतांहि त्या काळांत लढाया होत होत्या. तेव्हां राजांची महत्त्वाकांक्षा हेंच लढायांचें कारण ह्या म्हणण्याची सत्यता कोठें राहिली ?

आतां अशा प्रकारें केव्हां केव्हां लढाया होण्याचें व केव्हां केव्हां शांतता असण्याचें वास्तविक कारण काय ह्याचा विचार करूं. कैसी व आर्जिकूर येथील लढायांच्या वेळीं पार्लमेंटानें त्या लढायांसाठीं खुषीनें पैसा मंजूर केला; कारण त्या लढायांमुळें कांहीं फायदे होतील, असें त्यांस वाटत होतें. ते फायदे असे:— ( १ ) इंग्लंदचा राजा हाच जर फ्रान्सचा राजा झाला तर आपणांवरील कराचें ओझें हलकें होईल; ( २ ) त्या वेळीं इंग्लंदांतील लोंकरीचे जिन्नस सर्वांत बेलजम देशामध्यें फार खपत होते, व फ्रेंच लोक तो देश जिंकून घेतील असा संभव त्या वेळीं दिसत होता; आणि ( ३ ) क्याले व गिनी [ ह्या प्रांताचें मुख्य शहर बोर्डो ] हे प्रांत आपल्या ताब्यांत ठेवणें फार महत्त्वाचें आहे असें पार्लमेंटास वाटत होतें; कारण त्या ठिकाणीं इंग्लंदांतील लोंकरीचे जिन्नस पाठविल्यानें त्यांच्या मोबदला तेथून इंग्लिशांस दारूचा पुरवठा होणार होता. सारांश, हे ३

फायदे होण्याचा संभव दिसल्यामुळेंच त्या लढायांस पैसा खर्च करण्याची मंजुरी पार्लमेंटानें खुषीनें दिली. परंतु फ्रान्स देश अजिबात कायमचा जिंकणें अशक्य आहे, अशी कांहीं काळानें पार्लमेंटाची खात्री झाली. तेव्हां * डोंगर पोंखरून उंदीर काढिल्याप्रमाणें आपलें कृत्य होईल, असें समजून पार्लमेंटानें तो नाद सोडून दिला. ह्या लढायांपासून तादृश फायदा झाला नाहीं, अशी पार्लमेंटाप्रमाणें राजांचीहि समजूत झाली होती. परंतु प्रजेची झाली नव्हती, व युद्ध सुरू ठेवण्याविषयीं तिची ओरड सुरूच होती. ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

नंतर दुसरा काळ म्हणजे फ्रेंचांशीं सख्य असल्याचा काळ आला. आतां राजांच्या अंगची महत्त्वाकांक्षा कमी झाली, म्हणून हा काळ प्राप्त झाला असें नाहीं; तर इंग्लिशांची फ्रान्स देश जिंकून घेण्याची कल्पना स्वप्नवत् झाली, बेल्जम देश स्पेन देशाच्या ताब्यांत गेला, व इंग्लिश व्यापारी अमेरिकेंत व्यापाराचीं ठाणीं बसविण्याच्या प्रयत्नांत गुंतले; ह्या कारणांमुळें फ्रेंच लोकांबरोबरच्या लढाया बंद होऊन हा शांततेचा काळ आला. अमेरिका खंडांतील ह्या खटपटींमुळें इंग्लिशांस फ्रेंचांशीं लढण्याचा प्रसंग आला नाहीं; तर स्पेन व हालंद ह्या देशांशीं आला.

---

* "The game is not worth the candle" ही इंग्लिश पुस्तकांतील ह्या अर्थाची म्हण होय.

नंतर विल्यम ऑफ् ऑरेंज ह्याच्या वेळीं आरंभ होऊन वाटर्लू येथील लढाईनें ज्याची समाप्ति झाली, तो युद्धाचा तिसरा काळ आला. १८वें शतक व १९व्या शतकाचा प्रारंभ ह्या काळांतील अति महत्त्वाची गोष्ट म्हटली म्हणजे हें युद्धच होय. १६८९ पासून १८१५ पर्यंतच्या १२६ वर्षांत इंग्लिशांनीं ७ मोठालीं युद्धें केलीं. ह्यांपैकीं सर्वांत मोठें युद्ध १२ वर्षें सुरू होतें; व सर्वांत लहान ७ वर्षें सुरू होतें. हीं युद्धें प्रत्यक्ष फ्रान्स देशाशींच सुरू झालीं, किंवा सुरू झाल्यानंतर लवकरच त्यांचा संबंध केवळ त्या देशाशींच राहिला. तेव्हां इंग्लिशांना फ्रेंचांशींच तेवढे वारंवार लढण्याचे प्रसंग यावे, ह्याला राजांच्या आंगच्या महत्त्वाकांक्षेखेरीज कांहीं कारण अवश्य असलें पाहिजे. इंग्लंदांतील बडे लोकांच्या किंवा इतर सभ्य लोकांच्या आंगच्या महत्त्वाकांक्षेमुळें हे प्रसंग आले असतील, असें कदाचित् वाटण्याचा संभव आहे. तथापि हेंहि म्हणणें खरें नाहीं, असें त्या वेळीं घडलेल्या गोष्टींवरून ठरतें. ह्या वरील १२६ वर्षांपकीं बऱ्याच मुदतींत राज्यकारभार चालविण्याची मुख्य सत्ता बडे लोकांच्या हातीं नव्हती; इतकेंच नव्हे, तर ते ह्या युद्धांस प्रतिकूळ होते. लिबरल पक्षाचे लोक ह्या युद्धांना अनुकूळ होते; व त्यांना व्यापाऱ्यांचा व मध्यम स्थितींतील इतर लोकांचा ह्या कामीं सल्ला होता. ह्या एकंदर स्थितीवरून अशी कल्पना होते कीं, हीं युद्धें व्यापारसंबंधानें झालीं असावीं; व हीच कल्पना सयुक्तिक आहे. मा-

नवी प्राण्यांच्या ज्या स्वाभाविक मनोवृत्ति आहेत, त्यांतीलच **स्वसंरक्षण** ही एक अत्यन्त प्रबल मनोवृत्ति आहे; व हिच्यामुळेंच इंग्लिशांस वरील युद्धें करणें भाग झालें होतें.

ह्या युद्धांचीं मुख्य कारणें पुढें लिहिल्याप्रमाणें आहेत:—[ १ ] फ्रेंच लोक आपल्या वसाहती आपणांपासून जिंकून घेतील, व त्यामुळें आपला तेथील व्यापार बुडेल, अशी इंग्लिश लोकांस असलेली भीतिः आणि [२] फ्रेंचांशीं लढाई करून त्यांच्या वसाहती घेतल्यानें आपलीं व्यापाराचीं ठिकाणें वाढवितां येतील, असा जो संभव त्यांना दिसत होता, तो संभव. तेव्हां ह्या युद्धांच्या जमाखर्चाची कल्पना करणें असल्यास ( त्यांपासून इंग्लिशांचें हिताहित काय झालें तें पाहणें असल्यास ) दोन प्रश्नांचा विचार केला पाहिजे. [ १ ] इंग्लिशांच्या वसाहती त्यांच्या हातून जाण्याची भीति खरोखरच होती किंवा काय? व [ २ ] फ्रेंचांच्या वसाहती जिंकण्यास त्यांना जो खर्च आला त्याचा पूर्ण मोबदला त्यांना मिळाला कीं काय? जर मोबदला मिळाला असेल तर तो जमेच्या सदरास धरिला पाहिजे. तसेंच युद्धांकरितां व देशाच्या कर्जाच्या फेडीकरितां दिलेल्या रकमा खर्चाच्या सदरास धरिल्या पाहिजेत.

आतां इंग्लिश लोक हा जमाखर्च अशा रीतीनें ताडून पाहत नाहींत. राष्ट्राच्या जमाखर्चाचे खर्डे

राष्ट्राचें कर्ज ही वसाहती मिळविण्यास पडलेली किंमत होय.

ज्यांना म्हणतात त्यांमध्यें एका बाजूस फार मोठ्या ठश्यांनीं काळ्या शाईनें राष्ट्राचें कर्ज दाखविलेलें असतें; व दुसऱ्या बाजूस अति लहान ठश्यांनी तांबड्या शाईनें राष्ट्राचें वैभव दाखविलेलें असतें ( सारांश, कर्जाचा मोठा बाऊ करून दाखविलेला असतो, व त्या कर्जामुळें जो अति मोठा फायदा होत असतो तो कांहींच नाहीं, असें दाखविण्याचा प्रयत्न असतो. ) इंग्लिशांच्या पूर्वजांनीं युद्धें वगैरे करण्यांत जें द्रव्य खर्चिलें त्याचा वर लिहिल्याप्रमाणें त्यांचेच वंशज सांप्रत त्यांच्या वतीनें जमाखर्च दाखवितात. आपल्या पूर्वजांनीं लढाया करून इतकें वैभव आपणांसाठीं संपादून ठेविलें, ह्याबद्दल हल्लीं इंग्लिशांनीं वास्तविक त्यांचा गौरव केला पाहिजे; परंतु असें न करितां उलट हें वैभव संपादण्यासाठीं त्यांनीं केलेल्या खर्चाचा ते मोठा बाऊ करून दाखवितात, हें योग्य नाहीं.

समजा, एक भांडवलवाला एका खाणीचें काम चालवीत आहे; ह्या कामांत प्रतिवर्षी तो पुष्कळ पैसा घालीत आहे; वारंवार पैसा कर्जी काढूनहि तो त्या धंद्यांत घालीत आहे; ती खाण फार भयंकर प्रकारची असल्यामुळें मोठाले अपघात होण्याची तेथें फार भीति आहे; तसेंच वारंवार ह्याप्रमाणें भयंकर अपघात घडलेलेहि आहेत. अशी एकंदर स्थिति असतांहि कोणी येऊन सांगितलें कीं, ह्या एकंदर धंद्यापासून त्या भांडवलवाल्याला

फारच नफा झाला, तर काय वाटणें साहजिक आहे बरें ? अर्थात् तसें सांगणारा तेव्हांच वेडा ठरेल, व त्याला तावडतोब वेड्यांच्या दवाखान्यांत पाठविलें पाहिजे, असें सर्वांस वाटेल. इंग्लिशांचे आजे पणजे म्हणजे ह्याप्रमाणें मूर्ख होते, असें मानण्यास आधार नाहीं; व तसें सिद्धहि करून दाखवितां येईल.

आतां दुसरें एक उदाहरण घेऊं. इंग्लिशांच्या वसाहतींपैकीं एका वसाहतींतील एका मनुष्यानें तेथील सरकारापासून मेंढ्या चारण्याचें एक कुरण भाड्यानें घेतलें. हें कुरण उत्तम प्रकारचें होतें; व त्यापासून त्याला मोठा नफा झाला. इतक्यांत त्या ठिकाणच्या कायद्यांत फेरफार झाला; आणि त्याला व तेथील इतर लोकांना कांहीं नियमित आकारापर्यंत मर्जीस वाटेल ती जमीन फुकट घेण्याची परवानगी मिळाली. आतां त्या गृहस्थानें आपलें जें कुरण होतें त्यापैकीं जितका भाग कायद्यानें घेण्यासारखा होता तितका पसंत करून त्यानें तो घेतला ह्यांत कांहीं विशेष नाहीं. परंतु इतर लोकांना त्याच्या नफा नुकसानीशीं कांहीं करावयाचें नसल्यामुळें त्या कुरणापैकीं राहिलेले तुकडे त्यांनीं पसंत करून घेतले; व ते तुकडे आपण घेतले असतां त्यानें घेतलेल्या तुकड्यास त्यांपासून फार नुकसान होईल असें समजून उमजून त्यांनीं तसें केलें. ह्याप्रमाणें त्याच्या जमिनीचे तुकडे झाल्यामुळें तिची नासाडी झाली. त्याचें कुटुंब तर मोठें

होतें, व त्या सर्व कुटुंबाच्या चरितार्थाचा बोजा त्याच्यावरच होता. आतां त्यानें काय करावें बरें ? त्यानें असें केलें; पैसा कर्जों काढिला; व तो पैसा त्या दुसऱ्या लोकांस देऊन त्यांच्यापासून ते जमिनीचे तुकडे त्यानें विकत घेतले. ह्याचा परिणाम असा झाला कीं, कांहीं काळपर्यंत त्याच्या शिरावर त्या कर्जाचा बोजा पडला; परंतु तें कर्ज फेडण्याची त्याला उमेद होती. ह्याप्रमाणें तें फेडिल्यानंतर त्याला असें आढळून येईल कीं, आपणास उत्तम प्रकारचें वतन मिळालें आहे, व आपण पूर्वींपेक्षां फार श्रीमान् झालों आहों.

आतां हेंच उदाहरण विशेष मोठ्या प्रमाणावर ध्यानांत आणावें, व त्याप्रमाणेंच इंग्लिशांनीं हुबेहुब केलें, असें समजावें. आपल्या वतनाचे ( वसाहतींचे ) तुकडे होतील, अशी त्या काळीं त्यांना मोठी भीति होती, त्याचें कुटुंबहि मोठें होतें ( इंग्लंदांतील सर्व लोक हेंच कुटुंब व तेथील लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत चालल्यामुळें ह्या वाढणाऱ्या लोकसंख्येच्या चरितार्थाची कांहीं तजवीज होणें जरूर होतें. ) ; आणि हें वतन एकत्र राखण्यासाठीं व तें वाढविण्यासाठीं त्यांनीं पुष्कळ पैसा खर्च केला व कर्जहि काढिला. तेव्हां राष्ट्रदृष्ट्या ह्या जमाखर्चाचा विचार करणें म्हणजे जमेच्या व खर्चाच्या सदरांची तुलना करून एकंदरींत आपला नफा झाला किंवा तोटा झाला, इतकें पाहणें हेंच आहे.

राष्ट्राला इंग्लंदानें जें एवढें कर्ज करून ठेविलें आहे, तें करण्याबद्दल एकहि सयुक्तिक कारण दाखवितां येण्यासारखें नाहीं, असें लोक वारंवार म्हणतात. ह्या राष्ट्रीय कर्जाला एकहि कारण नाहीं, हें म्हणणें फार आश्चर्यकारक दिसतें! वसाहतींसंबंधी इंग्लिशांच्या इतकें विस्तीर्ण राज्य आजपर्यंत जगांत कोणाचेंहि झालेलें नाहीं; ह्या त्यांच्या राज्याची ती किंमत होय, असें त्यांनीं समजलें पाहिजे.

इंग्लंदचें कर्ज वसाहतींसंबंधी राज्य स्थापण्यांत झालें आहे, हें दाखविण्यासाठीं एक युद्ध उदाहरणार्थ घेऊं. ह्या युद्धांतील मुख्य लढाई × ब्लेन्हिम येथें झाली. बडे लोक ह्या युद्धास प्रतिकूळ होते; परंतु व्यापारी लोक अनुकूळ होते. राष्ट्राच्या जमेंतून ह्या युद्धाकडे प्रतिवर्षी जो खर्च झाला, त्याशिवाय २,३४,०८,२३५ पौंड कर्ज काढावें लागलें. आस्ट्रिया देशच्या राजपुत्राला किंवा फ्रेंच राजपुत्राला स्पेन देशच्या गादीवर बसण्याचा हक्क पोहोंचतो किंवा नाहीं ह्या प्रश्नाचा वाद, हेंच काय तें ह्या युद्धाचें वरवरचें कारण होतें; परंतु खरीं कारणें पुढें लिहिल्याप्रमाणें होतीं:—(१) स्टयुअर्ट घराण्याकडे पुन्हा राजसत्ता जाऊं न देणें; व (२) स्पेन

मार्लबरो ह्यानें केलेल्या युद्धामुळें मिळालेल्या वसाहती.

---

× ही लढाई आन राणीच्या कारकीर्दीत १७०४त इंग्लिश व फ्रेंच ह्यांच्यामध्यें झाली. ह्यांत इंग्लिशांस जय मिळाला. त्यांचा मुख्य सरदार ड्यूक अफ मार्लबरो हा होता. ब्लेन्हिम हें जर्मनींत दान्यूब नदीच्या कांठीं बव्हेरियाच्या [illegible] पश्चिमेस खेडें गांव आहे.

देशांतील लोकांच्या वसाहती व फ्रेंचांच्या वसाहती ह्यांना इंग्लिशांविरुद्ध एकत्र होऊं न देणें. ÷ युत्रेच येथें १७१३त तह होऊन हें युद्ध संपलें. लिबरल पेक्षानें हें युद्ध सुरू केलें होतें; व कान्सरव्हेटिव्ह पक्षानें हा तह करून तें बंद केलें; म्हणून ह्या तहांतील कलमें आपणांस फार लज्जास्पद आहेत, अशी ओरड लिबरल पक्षानें केली होती. आतां ह्या तहापासून इंग्लिशांस काय फायदे झाले, ते पाहूं. ( १ ) जाकोबाइट ह्यांना ( स्टयूअर्ट घराण्यांतील राजांचा पक्ष घेणाऱ्या लोकांना ) कित्येक वर्षेंपर्यंत फ्रेंचांकडून मदत होणें अशक्य झालें. ( २ ) फ्रान्सच्या व स्पेनच्या वसाहतींना इंग्लिशांविरुद्ध एकी करितां आली नाहीं. [ ३ ] इंग्लिश वसाहतींना कशाचेंहि भय राहिलें नाहीं. [ ४ ] ज्यांना हल्लीं नोवा स्कोशिया व न्यू ब्रन्झविक म्हणतात, तीं त्यांना एकत्र करितां आलीं; व न्यूफौंडलंड त्यांच्या ताब्यांत आलें. [५] भूमध्य समुद्रांतील मिनोर्का व जिब्राल्तर हीं ठिकाणें त्यांस मिळालीं. [६] गुलामांचा सर्व व्यापार त्यांच्या हातीं आला; व स्पेनदेशांतील लोकांच्या वसाहतींस प्रतिवर्षी एक जहाज व्यापारासाठीं पाठविण्याचा हक्क त्यांस मिळाला.

ह्यानंतर स्पेन देशाशीं इंग्लिशांचीं युद्धें झालीं. त्या लोकांनीं इंग्लिशांच्या वसाहतींतील लोकांशीं तंटे बखेडे केले हें ह्या युद्धाचें एक कारण होतें; व ते लोक आपल्या वसाहतींतील लोकांना इंग्लिश वसाहतींतील लोकांशीं व्या-

÷ हें ठिकाण आमस्तर्डामच्या आग्नेयीस २१ मैलांवर आहे.

सात वर्षांच्या युद्धा-मुळें मिळालेल्या वसाहती.

पार करण्यास प्रतिबंध करण्याचा प्रयत्न करीत होते, हें दुसरें कारण होतें. येथें बारिक सारिक युद्धांचा विचार करणें नसून मोठ्या युद्धाचा विचार करणें आहे; म्हणून १७५६ पासून १७६३ पर्यंत झालेल्या **सात वर्षांच्या** मोठ्या युद्धाचाच विचार करूं. फ्रेंच लोक आणि आस्त्रियांतील लोक ह्यांनीं प्रशियाच्या फ्रेदरिक राजावर जी स्वारी केली, ती स्वारी हेंच काय तें ह्या लढाईचें बाह्यात्कारी कारण होतें. तथापि ह्या युद्धांत आपणहि पडावें, असें इंग्लिशांना वाटलें; व असा करण्यापासून त्यांचा काय फायदा झाला तें पाहिलें पाहिजे.

उत्तर अमेरिकेंतील ज्या मोठाल्या सरोवरांचें पाणी सेंट लारेन्स नदींत जातें त्या सरोवरांची ओळ ज्या प्रदेशांत पसरली आहे, तो प्रदेश वरील युद्धाच्या आरंभीं फ्रेंचांच्या ताब्यांत होता; व मिसिसिपीच्या कांठचाहि प्रदेश त्यांच्याच ताब्यांत होता. ह्या दोन प्रदेशांमध्यें असणाऱ्या प्रदेशांवरहि ते हक्क सांगूं लागले; म्हणजे इंग्लिश वसाहतींना उत्तर, दक्षिण आणि पश्चिम ह्या तिन्ही दिशांनीं ते अगदीं येऊन चिकटले; व ह्याप्रमाणें अतलांतिक महासागर व आलेघानी पर्वतांची ओळ ह्यांच्यामधील अरुंद समुद्रपट्टीच्या अलीकडे पलीकडे इंग्लिश वसाहतींतील लोकांस अगदीं होऊं द्यावयाचें नाहीं, असा त्यांचा पक्का निश्चय झाल्याचें दिसूं लागलें.

इंग्लिश वसाहतींतील लोकांस अर्थात त्यामुळें राग आला; व युरोपांत इंग्लिश व फ्रेंच ह्यांचें सख्य असलें तरी देखील वसाहतींतील त्या त्या लोकांत नेहमीं लढाया होऊं लागल्या. ह्यामुळें प्रशियाच्या राजाचा पक्ष धरून त्याला फ्रेंचांबरोबर लढण्यास इंग्लिशांनीं द्रव्यद्वारें मदत केली. त्यापासून आपणांस कोणता फायदा होईल अशी आशा त्यांना उत्पन्न झाली असेल बरें? ह्याप्रमाणें फ्रेंचांचें सर्व लक्ष युरोपांतील लढाईंतच गुंतविलें असतां त्या लांबच्या वसाहतींतील लोकांस मदत पाठविण्याची गोष्ट त्यांच्या हातून होणार नाहीं; व ह्यामुळें सदहू मुदतींत वसाहतींतील फ्रेंचांचें नुकसान करून आपला नफा करून घेण्याची संधी आपल्या वसाहतींतील लोकांस आयतीच मिळेल, अशी आशा इंग्लिशांना उत्पन्न झाली. हा परिणाम इंग्लिशांनीं प्रशियाच्या राजाचा पक्ष स्वीकारिल्यामुळेंच झाला हें उघड आहे. कांहीं काळानें स्पेन देशानेंहि फ्रान्सच्या तर्फेनें ह्या युद्धांत आंग घातलें, व ह्यामुळें स्पेनच्या वसाहतींवरहि हल्ला करण्याची संधी इंग्लिशांस मिळाली.

१७६३ त झालेल्या तहामुळें हें युद्ध संपलें. तिसरा जार्ज व त्याच्या पक्षाची मंडळी ह्यांनीं हा तह केला; व ह्यांतील कलमें आपणांस जितकीं अनुकूळ असणें अवश्य होतें तितकीं अनुकूळ नाहींत, असा मागील वेळेप्रमाणें ह्या वेळींहि लोकांनीं गिल्ला केला. युद्ध सुरू असतां इंग्लिशांनीं फ्रेंचांच्या ताब्यांतील बहुतेक वेस्त इंदीज बेटें घेतलीं होतीं; व वरील तहामुळें हीं त्यांचीं त्यांस परत

दिलीं. ह्यांपैकींच मार्तिनीक हें एक बेट होतें; व ह्या एक-ट्याशींच इंग्लिशांचा गेल्या दोन वर्षांत जो व्यापार झाला होता, तेवढ्याचाच विचार केला तरी देखील तो फार महत्त्वाचा होता. ह्या मुदतींत इंग्लिशांनीं २,००,००० पौंड किमतीचा आपला माल ह्या बेटांत पाठविला होता. तेव्हां जो माल त्यांस अन्य तऱ्हेनें विकतां आला नसता, अशा वरील किमतीच्या मालाचा खपाला हें एक ठिकाण झालें होतें. तेव्हां हीं बेटें जिंकण्यापासून इंग्रजांस पैशाच्या संबंधानें तत्काळ फायदा होणार होता, व ह्यामुळें वरील युद्ध करण्यास फार सयुक्तिक कारण आहे, असें त्यांस वाटलें असावें हें स्पष्ट आहे. आतां ह्या युद्धाला खर्च काय आला तो पाहूं. प्रतिवर्षी ज्या रकमा खर्च होत गेल्या त्यांशिवाय ह्या युद्धामुळें ९,२२,१९,९१२ पौंडांनीं राष्ट्राच्या कर्जांत भर पडली. आतां फायदे झाले ते:—[ १ ] कानडा इंग्लिशांस मिळाला; [ २ ] इंग्लिश वसाहतींच्या दक्षिण सीमेवरील फ्लारिदा प्रांत त्यांस मिळाला; [ ३ ] आपल्या वसाहतींचा समुद्र किनाऱ्यापासून आंतल्या बाजूला अधिकाधिक विस्तार करण्याची संधी मिळाली; आणि [ ४ ] वेस्त इंदीज बेटांपैकीं ग्रानाडा, सेंत व्हिन्सेंत, दोमिनिका व टोबागो हीं साखरेच्या उत्पन्नाचीं बेटें त्यांस मिळालीं.

ब्रिटिश वसाहतींसंबंधी इतिहासांतील अतिलज्जास्पद अशी जी हकीगत ती ह्यापुढें आली. ही हकीगत तिसरा जार्ज ह्याच्या कारकीर्दींत घडली. ह्या राजा-

च्या कारकीर्दीत त्याच्या मूर्खपणामुळें इंग्लिशांच्या कित्येक वसाहती त्यांच्या हातून गेल्या; व त्या वसाहतींचेंच तेव्हांपासून "युनायूतेद स्तेत्स" हें राष्ट्र बनलें.

अमेरिकेंतील वसाहती (युनायूतेद स्तेत्स) इंग्रजांच्या हातून जातात.

ह्या वसाहती त्यांच्याहातून कशा गेल्या त्याबद्दलचा इतिहास, इतःपर अशी गोष्ट न होण्यासाठीं कशा रीतीनें सावधगिरी ठेविली पाहिजे, हें समजण्यासाठीं लक्षपूर्वक ध्यानांत ठेवण्यासारखा आहे; व म्हणून ह्या विषयाच्या चर्चेपासून जरी ब्रिटिश लोकांच्या मनास दुःख होणार आहे, तरी तसें करणें अवश्य आहे. तेव्हां प्रश्न असा उत्पन्न होतो कीं, ह्या वसाहती त्यांच्या हातून जाण्याचें कारण काय? प्रथमतः ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, पहिला चार्लस राजा ह्याच्या कारकीर्दीत उत्तरेच्या बाजूस ज्या वसाहती स्थापिल्या गेल्या, त्यांपैकीं बहुतेक वसाहतींचा इंग्लंदाशीं विशेष स्नेहभाव कधींच नव्हता. दुसरा चार्लस ह्याच्या कारकीर्दीच्या आरंभींच त्या वसाहतींनीं उघड-पणें सांगितलें कीं, इंग्लंदाशीं आमचा संबंध शिष्टाचारा-पुरताच आहे; खरा कळकळीचा संबंध कांहीं नाहीं. अशी खरी स्थिति होती तर ह्या वेळेपर्यंत तरी त्यांनीं इंग्लंदा-शीं निकट संबंध कां ठेविला होता, असा प्रश्न सहजच उत्पन्न होतो. ह्याचें उत्तर इतकेंच कीं, फ्रेंच लोक आप-णांवर हल्ला करितील कीं काय अशी त्यांना भीति होती. व म्हणूनच त्या वसाहती इंग्लिशांच्या तंत्रानें चालत

होत्या. वरील युद्धांत इंग्लिशांस जो जय मिळाला, त्यामुळें ह्या वसाहतींचा इंग्लंदाशीं जो संबंध होता त्याची चलबिचल झाली. त्याचप्रमाणें फ्लारिदा घेतल्यामुळें स्पेन देशांतील वसाहतींच्या हल्लयाचेंहि सर्व भय नाहींसें झालें. इतकें झालें तरी त्यांचा व इंग्लंदाचा शिष्टाचारापुरताहि संबंध कां राहूं नये, ह्याचें कारण दिसत नाहीं. तर हा संबंध अगदींच नष्ट होण्याचीं कारणें काय? [ १ ] ब्रिटिश वसाहतींनीं इतर वसाहतींशीं व्यापार करूं नये. अशा नियमाची त्यांच्यावर इंग्लंदानें केलेली सक्ती; व [ २ ] ह्या वसाहतींवर कर बसविण्याचा पार्लमेंटास अधिकार आहे, अशाविषयीं तिसरा जार्ज व त्याच्या पक्षाची मंडळी ह्यांनीं धरिलेला हेका. ह्या वसाहती स्थापण्यास इंग्लंदास खर्च आला होता; ह्यास्तव त्याचा मोबदला कराच्या रूपानें वसाहतींनीं देणें न्यायाचेंच होतें; व ते लोक देण्यास कबूलहि होते. तथापि खुद्द इंग्लिश लोकांवर कर बसवितांना ज्याप्रमाणें त्यांचें मत घेण्यांत येतें त्याप्रमाणें. आपल्यावर कर बसवितांना आपलेंहि मत घेतलें पाहिजे. असें त्या वसाहतींतील लोकांचें म्हणणें होतें. ब्रिटिश पार्लमेंट आपल्या संबंधानें मनास येईल त्याप्रमाणें कारभार करितें. अशी त्यांची समजूत झाली होती; व ह्यामुळें त्यांनीं पाहिजे तसे कर आपल्यावर बसवावे, ही गोष्ट मात्र त्यांना मान्य नव्हती. अमेरिकेंतील इंग्लिशांच्या वसाहती त्यांच्या हातून जाण्याचीं कारणें हींच

दिसतात. युरोप व अमेरिका ह्या दोन्ही खंडांतील अति विद्वान् मुत्सद्द्यांचा म्हणण्याकडे लक्ष न देतां इंग्लिशांनीं मूर्खपणानें वसाहतींवर आपले हक्क बजाविण्याचा हेका धरिला व त्याचा असा परिणाम झाला. म्हणून **ह्याप्रमाणें मूर्खपणा पुन्हा कधीं करावयाचा नाहीं**, हीच महत्त्वाची गोष्ट ह्या इतिहासापासून त्यांना शिकावयाची आहे.

ह्या वसाहतींना पुन्हा ताब्यांत आणण्यासाठीं इंग्लिशांनीं भगीरथ प्रयत्न केले; परंतु वसाहतींना फ्रेंच लोक व स्पेन देशांतील लोक ह्यांची मदत असल्यामुळें इंग्लिशांची खटपट फुकट गेली. इंग्लिशांनीं त्या दोघांचेंहि नुकसान केलेंच होतें; व त्यामुळें इंग्लिशांचें उट्टें काढण्यास ते अगदीं संधीच पाहत होते; व म्हणूनच त्यांनीं इंग्लिश वसाहतींतील लोकांस मदत केली. वेस्त इंदीज बेटें देखी- ल इंग्लिशांच्या हातून जावयाचींच; परंतु समुद्रामध्यें राडूनें येथील लढाईंत त्यांना जो एक जय मिळाला, त्यामुळें हीं बेटें मात्र त्यांच्या हातून गेलीं नाहींत. ह्या युद्धामुळें १०,००,००,००० पौंड कर्ज वाढलें; व १७८३त हें युद्ध संपलें. तेव्हां त्यांच्या ताब्यांत कानडा व नोवा स्कोशिया, वेस्त इंदीज बेटांपैकीं त्यांच्या ताब्यांत जीं बेटें होतीं तीं, आफ्रिका खंडाच्या किनाऱ्या- वरील थोड्या बहुत जागा, व जिब्राल्तर इतकीं ठिकाणें मात्र त्यांच्या ताब्यांत राहिलीं. हिंदुस्थानासंबंधी विचार मागें झालाच आहे.

ज्या युद्धांमुळें फ्रान्स देशामध्यें मोठी राज्यक्रांति झाली त्या युद्धांचा [ फ्रेंच रेव्होल्यूशनचा ] काळ ह्यापुढें आला. ह्या युद्धांमुळें जे परिणाम घडले त्यांजबद्दलहि गैर समजूत होण्याचा संभव आहे. फ्रान्स देशांतील प्रजासत्ताक लोकांवर बर्क ह्यानें कडक टीका केली असें पुष्कळ लोकांचें म्हणणें आहे; परंतु ह्या युद्धांपासून इंग्लिशांस फायदे कोणकोणते झाले, इकडे मात्र त्यांचें अवश्य तितकें लक्ष जात नाहीं. फ्रान्स, स्पेन व हालंद ह्या युरोपांतील तीन राष्ट्रांच्याच काय त्या पुष्कळ वसाहती होत्या; व ह्या युद्धामुळें ओळीनेंच ह्या तीन राष्ट्रांशीं लढण्याचा इंग्लिशांना प्रसंग आला. ह्या युद्धासंबंधी विशेष महत्त्वाची गोष्ट कोणती? युद्ध सुरू होण्यापूर्वी इंग्लिशांच्या वसाहती त्यांच्या हातून गेल्या होत्या; परंतु युद्ध संपलें तेव्हा वसाहतींचें एक नवें राज्य त्यांच्या ताब्यांत आलें, व शिवाय एशिया खंडांतहि एक मोठा प्रदेश त्यांच्या ताब्यांत आला हीच महत्त्वाची गोष्ट होय.

प्रजासत्ताक फ्रेंच राष्ट्राशीं युद्ध केल्यामुळें मिळालेल्या वसाहती.

ह्या युद्धांतील लढायांचे दोन भाग करितां येतील. +एमिन्स येथें १८०५ मध्यें तह होऊन पहिल्या भागांतील लढाया संपल्या; व त्यामुळें १२,६०,००,००० पौंड कर्ज वाढलें. ह्या तहामुळें स्पेन देशांतील लोकां-

+एमिन्स हें ठिकाण फ्रान्समध्यें पारिसच्या उत्तरेस ७१मैलांवर आहे. हा तह इंग्लंद, फ्रान्स, स्पेन व हालंद ह्यांमध्यें झाला.

कडून त्रिनिदाद बेट इंग्लिशांस मिळालें, व डच लोकांकडून सीलोन मिळालें. युद्ध सुरू असतां माल्टा बेट इंग्लिशांनीं घेतलें होतें, व तें तेव्हांपासून त्यांच्याच ताब्यांत आहे.

युद्धाचा दुसरा भाग १८०४ पासून १८१५ पर्यंत सुरू होता. पहिल्या भागांत इंग्लिशांनींच फ्रेंचांच्या प्रजासत्ताक राज्यावर स्वारी केली होती; परंतु ह्या दुसऱ्या भागांत नपोलियन इंग्लंडावर स्वारी करण्याच्या विचारांत होता, म्हणून त्या स्वारीपासून देशाचें संरक्षण करणें, इतकेंच इंग्लिशांचें काम होतें. युरोपांत इंग्लिशांच्या ताब्यांत जेवढा प्रदेश होता, तेवढेंच काय तें

नेपोलियन ह्याच्याबरोबर युद्ध केल्यामुळें मिळालेल्या वसाहती.

इंग्लिश राष्ट्र, असें नेपोलियन मानीत नसे; तर सर्व पृथ्वीभर त्या राष्ट्राचा जो विस्तार झाला होता, तो ध्यानांत आणून त्याच्या महत्त्वाचा अंदाज तो करीत असे; आणि हिंदुस्थान व इतर इंग्लिश वसाहती ह्यांवर हल्ला करून त्यांची पृथ्वीवर सर्वत्र पसरलेली ही सत्ताच नष्ट करण्याचा त्याचा मुख्य उद्देश होता. “ह्या जुन्या युरोपाचा मला कंटाळा आला आहे,” असें तो म्हणे; व राष्ट्रांच्या सत्तेची ह्यापुढें तुलना करावयाची ती युरोपांतील त्यांच्या महत्त्वावरूनच करावयाची नसून सर्व पृथ्वीवर त्यांचें जें महत्त्व असेल त्याप्रमाणें करावयाची, अशी त्याची समजूत झाली होती, असा त्याच्या ह्या म्हणण्याचा गर्भित हेतु होता. इंग्लिशांच्या सुदैवानें नेपोलियन ह्यांचे इंग्लंड

जिंकण्याचे बेत निष्फळ झाले.त्याचीं कारणें दोन होतीं:—[ १ ] ज्यांच्या योगानें इंग्लिशांस समुद्रावरील वर्चस्व प्राप्त झालें, ते नेलसन ह्यानें मिळविलेले जय, व [ २ ] युरोपांतील इतर राष्ट्रांना पैशाचा पुरवठा करून त्यांना नेपोलियनाबरोबर वारंवार लढण्यास लावून त्याचें बहुतेक सामर्थ्य युरोपांतील इतर राष्ट्रांशीं लढण्यांतच खर्च व्हावें, अशी इंग्लंदानें केलेली युक्ति. ह्या युद्धामुळें २७,७०,००,००० पौंड कर्ज वाढलें,परंतु ह्यामुळेंच इंग्लिशांना हिंदुस्थानापर्यंत मजल मारण्याचें सामर्थ्य आलें; व फ्रान्सच्या ताब्यांतील घेण्यासारखीं जीं थोडीं बहुत ठिकाणें होतीं, तीं घेतां आलीं. त्याचप्रमाणें कोणत्याहि प्रकारचा अडथळा न येतां दक्षिण गोलार्धांत नवीन वसाहतींचें राज्य स्थापण्याचा आरंभ करण्याचेंहि सामर्थ्य त्यांना ह्या युद्धामुळेंच आलें.

टोबागो, सेंत लूसिया, व आइल् आफ् फ्रान्स [ ह्यालाच मारिशस म्हणतात ] हीं बेटें इंग्लिशांस फ्रेंचांबरोबरच्या युद्धाच्या ह्या दुसऱ्या भागामुळेंच मिळालीं. ह्या सर्व बेटांत साखरेचें उत्पन्न मोठें आहे. तसेंच केप आफ् गुड होप, डेमेरारा, एसेक्वीबो व बरबाइस हीं ठिकाणेंहि ह्याच सुमारास इंग्लिशांनीं डच लोकांपासून घेतलीं.

वाटर्लूच्या लढाईनंतर इंग्लिशांच्या सांप्रतच्या वसाहतींसंबंधी राज्याची मर्यादा पूर्णपणें ठरली, असें म्हण-

इ. स. १८१५ नंतर मिळालेल्या वसाहती.

ण्यास कांहीं हरकत नाहीं. तेव्हांपासून त्यांनीं ह्या वसाहतींत सर्वत्र इतकी झपाट्यानें वस्ती केली कीं, त्याचें आश्चर्यच वाटतें. न्यू सौथ वेल्सच हल्लींचें मुख्य शहर जें सिदनी त्यांत प्रथमतः इंग्लिशांनीं १७८८ त कांहीं कैदी पाठविले. पश्चिम आस्त्रेलियामध्यें १८२९त प्रथमतः वसाहत स्थापिली. १८३६ त दक्षिण आस्त्रेलिया व त्याचें मुख्य शहर आदिलेद येथें वस्ती केली. पुढें तीन वर्षांनीं न्यु झीलंदामध्यें पहिली वसाहत स्थापिली. १८५० त व्हिक्टोरिया ही स्वतंत्र वसाहत केली. भूगोलाच्या दुसऱ्या बाजूस ज्या ह्या वसाहती त्यांनीं स्थापिल्या, त्यांशिवाय दुसरींहि कित्येक ठिकाणें त्यांनीं आपल्या ताब्यांत घेतलीं. ह्यांपैकीं कित्येकांचा त्यांना लष्करी कामाकडे उपयोग होत असे, व कित्येकांचा व्यापाराकडे होत असे. अशा प्रकारचीं ठिकाणें पुढें दिल्याप्रमाणें:—सिंगापुर हें १८१९त घेतलें; एडन १८३९त घेतलें; आसाम १८२४ त ब्रह्मी लोकांपासून घेतलें; व हांगकांग १८४१त चिनी लोकांपासून घेतलें. ह्यांशिवाय कानड्यांतील त्यांच्या वसाहतींचा इतका विस्तार झाला कीं, पूर्वेच्या बाजूस त्या ब्रिटिश कोलंबियापर्यंत व उत्तरेच्या बाजूस हडसनच्या उपसागरापर्यंत पसरल्या.

इंग्लिशांच्या अमलाखालीं राहणें डच लोकांस पसंत न वाटल्यामुळें त्यांनीं दक्षिण आफ्रिकेंत अनुक्रमें

नाताळ, ऑरेंज फ्री स्तेत्स व त्रान्सवाल येथें नव्या वसाहती केल्या होत्या. ह्यांपैकीं नाताळ १८४४ त इंग्लिशांनीं अजी खालसा केलें. ऑरेंज फ्री स्तेत्स १८४८त खालसा केलें होतें, परंतु १८५३ त परत दिलें. त्रान्सवाल १८७७त खालसा केलें होतें, व १८८१त परत दिलें.

ह्या वेळापर्यंतच्या हकीगतीचा सारांश.

इंग्लिशांनीं आपल्या वसाहती कोणत्या रीतीनें मिळविल्या, ह्याविषयींचा इतिहास ह्याप्रमाणें झाला. हा लिहित असतां घडलेल्या गोष्टींचें महत्त्व कमी करून दाखविण्याचा, किंवा जेव्हां जेव्हां इंग्लिशांचें वर्तन दोषार्ह दिसलें, तेव्हां तेव्हां त्याच्यावर झांकण घालण्याचा प्रयत्न केलेला नाहीं. परंतु जसा खरोखर इतिहास घडला तसाच लिहिला आहे. आतां ह्या सर्व इतिहासाचा भावार्थ थोडक्यांत आणण्याचा प्रयत्न करूं. ह्यांपैकीं महत्त्वाच्या गोष्टी पुढें लिहिल्याप्रमाणें आहेत:—(१) कित्येक शतकांपर्यंत जगांत महत्त्वाचा फेरफार असा होत होता कीं, लहान लहान राष्ट्रें हळू हळू कमी होऊन मोठमोठीं राष्ट्रें बनत चाललीं होतीं. ह्यामुळें राष्ट्रांच्या मोठेपणाचा अजमास त्यांच्या युरोपांतील प्रदेशाच्या आकारावरून हल्लीं कोणी करीत नाहीं; तर सर्व पृथ्वीमध्यें त्यांच्या अमलांत जो प्रदेश असेल त्याच्या आकारावरून करितात. ब्रिटिश राज्य, युनायूतेद स्तेत्स व रशिया वगैरे विस्तीर्ण आकाराचीं राष्ट्रेंच पुढील काळीं महत्त्वाचीं बन-

तील. वसाहतींसंबंधाची फ्रान्स व जर्मनी ह्यांची उणीव त्या राष्ट्रांच्या ध्यानांत येऊं लागली आहे; व जोंपर्यंत वसाहती करण्यासारखे प्रदेश शिल्लक आहेत, तोंपर्यंत वसाहतींसंबंधी राज्य स्थापण्यासाठीं वेडे वांकडे पाहिजे तसे प्रयत्न करण्यास त्यांनीं आरंभ केला आहे. (२) आपणांस काय मिळवावयाचें आहे, तें इंग्लिशांच्या पूर्वजांनीं स्पष्ट रीतीनें ठरवून तें मिळविण्याकडेच आपलें लक्ष दिलें; व ह्यामुळेंच त्यांना दोनदा वसाहती मिळवितां आल्या. ह्याप्रमाणेंच आपला उद्देश स्पष्टपणें ध्यानांत आणून त्याजबद्दलच नेहमीं प्रयत्न सुरू ठेवणें, हाच कोणत्याहि राष्ट्राला यश येण्याचा सर्वांत उत्तम मार्ग आहे. (३) फ्रान्स, स्पेन व इंग्लंद ह्यांपैकीं प्रत्येकाच्या वसाहती गेल्या; फ्रान्सनें युरोपांतील लढायांतच सर्व लक्ष घातल्यामुळें त्याच्या वसाहती गेल्या; नवीन वसाहतींवर आपल्या देशांतील जुन्या पद्धतीप्रमाणें अंमल करण्याचा सक्तीचा प्रयत्न केल्यामुळें स्पेन देशच्या वसाहती गेल्या; आणि इंग्लंदच्या वसाहती (युनायूतेद स्तेत्स ह्या) जाण्याचें कारण असें कीं, इंग्लंदाशीं संबंध ठेवण्यापासून आपलें जितकें हित होणार त्यापेक्षां तो संबंध तोडल्यानें अधिक हित होईल, असें इंग्लंदानें एका विशेष प्रसंगीं मूर्खपणाचें आचरण करून त्या वसाहतींना दाखविलें.

वसाहतींच्या प्राचीन इतिहासापासून मुख्यत्वें ज्या गोष्टी ध्यानांत ठेवावयाच्या त्या ह्या. त्यांची सांप्रतची व भावी स्थिति ह्यांविषयीं विचार पुढील प्रकरणांत होईल.

# प्रकरण चौथें.

## ब्रिटिश वसाहतींची सांप्रतची स्थिति व त्या त्यांनीं आपल्या ताब्यांत कां ठेविल्या पाहिजेत.

ब्रिटिश लोकांच्या हल्लींच्या वसाहती.

ब्रिटिश वसाहतींच्या योग्यतेचें वास्तविक महत्त्व ध्यानांत आणण्यास पहिला मार्ग म्हटला म्हणजे, त्या सर्व एकत्र धरून त्यांच्या विस्ताराविषयीं कांहीं कल्पना मनांत आणण्याचा प्रयत्न करणें. हा विस्तार ध्यानांत आणण्यास पुस्तकाच्या प्रारंभीं दिलेल्या नकाशाचा बराच उपयोग होईल. दुसरा मार्ग आहे कीं, खुद्द ब्रिटिश बेटांशीं वसाहतींचे जे निरनिराळे संबंध आहेत, त्यांच्या अनुरोधानें त्यांचे वर्ग करणें. हिंदुस्थानाशिवाय इंग्रजांच्या ताब्यांतल्या हल्लींच्या वसाहतींचे ३ वर्ग करितां येतील.

ज्या वसाहतींत त्यांच्या वाढत चाललेल्या लोकसमूहाला जाऊन वस्ती करणें इष्ट आहे, अशा प्रकारच्या वसाहती १ ल्या वर्गांत येतात. त्यापुढें लिहिल्याप्रमाणें आहेतः—

१. उत्तर अमेरिकेंतील वसाहती; ह्यांत कानडा मुख्य होय.

२. वेस्ट इंडीज बेटांतील वसाहती; ह्यांत जमेका ही महत्त्वाची होय.

३. दक्षिण आफ्रिकेंतील वसाहती; ह्यांत केप ऑफ् गुड होप ही अति महत्त्वाची होय.

४. आस्ट्रेलियांतील वसाहती; व न्यू झीलंद.

व्यापाराच्या कामीं उपयोगी पडण्यासाठीं स्थापिलेल्या वसाहती २ऱ्या वर्गांत येतात. ह्या पृथ्वीवर सर्वत्र पसरल्या आहेत; व ह्यांतील बहुतेक ठिकाणची हवा फार रोगट आहे. ह्या वसाहतींतून व्यापारी लोक व्यापारधंद्यासंबंधानें कांहीं काळ राहतात. आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यावरील लेगास व चीनच्या किनाऱ्यावरील हांगकांग ह्या वसाहती अशा प्रकारच्या आहेत.

वाढणाऱ्या लोकसमूहाला वस्ती करण्याकडेहि ज्यांचा उपयोग होत नाहीं, व व्यापारधंद्यासंबंधानेंहि वस्ती करण्याकडे ज्यांचा उपयोग होत नाहीं, अशा प्रकारच्या इंग्लिशांच्या कित्येक वसाहती आहेत; व त्यांचा समावेश ३ऱ्या वर्गांत होतो. एखादें अफाट सैन्य असावें, व त्याच्या टोळ्या एकमेकींपासून अनेक मैलांच्या अंतरानें ठेविलेल्या असाव्या; तशासारखी त्यांच्या वसाहतींची स्थिति आहे. इंग्लंदाशीं त्यांचें दळणवळण चालू राखण्यासाठीं मधून मधून पुष्कळ ठिकाणें त्यांना आपल्या ताब्यांत ठेवावीं लागलीं आहेत. शिवाय शत्रूंचा पाठलाग चुकवून जाण्यासाठीं, वादळानें गलबतांची मोडतोड झाल्यास त्यांची दुरुस्ती करण्यासाठीं, किंवा कोळशांचा साठा संपला असल्यास पुन्हा नवीन

पुरवठा करून घेण्यासाठीं, अशा प्रकारचीं कित्येक ठिकाणें त्यांना ताब्यांत ठेवणें अवश्य आहे. अशीं ठिकाणें नसतील तर त्यांच्या गलबतांस सतत पुष्कळ मैल लांब जाणें भाग पडेल, व तसें होणें वरील अडचणी- मुळें चांगलें नाहीं. सेंट हेलेना व मारिशस हीं बेटें ब्रिटिश वसाहतींना मूळ देश जो इंग्लंद त्याशीं जोडणाऱ्या कड्याच आहेत. ह्यांतील पहिलें आफ्रिकेच्या दक्षिण किनाऱ्यापासून बऱ्याच अंतरावर असून केप ऑफ् गुड होप जेव्हां डच लोकांच्या ताब्यांत होतें, तेव्हां तें इंग्लिशांच्या फार उपयोगी पडत असे. मारिशस हें बेट आफ्रिकेच्या पूर्वेस हिंदी महासागरांत आहे. तसेंच हिंदुस्थानच्या रस्त्यावर भूमध्य समुद्रांत शिरतांनाच लागणारें जिब्राल्टर, त्याच्यापुढें माल्टा, सैप्रस, तांबड्या समुद्राच्या मुखाशीं असलेलें एदन, आणि सोकोत्रा व सिकेलीस बेटें, हीं ठिकाणें त्यांच्या ताब्यांत आहेत. हिंदुस्थानच्याहि पुढें पासिफिक महासागराच्या रस्त्यावर सिंगापूर त्यांच्या ताब्यांत आहे; आणि भूगो- लाच्या दुसऱ्या आंगास दक्षिण अमेरिकेच्या दक्षिणेस केप हार्न जवळ फाक्लंद बेटें व त्या महासागरांतील इतर निरनिराळीं कमी महत्त्वाचीं ठिकाणें त्यांच्या ताब्यांत आहेत. ह्यावरून असें दिसून येईल कीं, १ल्या व २ऱ्या वर्गांतील वसाहतींचा इंग्लिशांस प्रत्यक्ष फार उपयोग होत असल्यामुळें त्या विशेष महत्त्वाच्या आहेत;

परंतु ३ऱ्या वर्गांतील वसाहतींचें महत्त्व, त्या विशेष ठिकाणीं असल्यामुळें जाण्या येण्याच्या संबंधानें त्यांचा त्यांना जो उपयोग होतो, त्या संबंधानेंच आहे. ब्रिटिश बेटांतील लोकांना तेथें जाऊन स्थाइक वस्ती करण्यास किंवा व्यापारधंद्यास त्यांचा साक्षात् उपयोग नसल्यामुळें त्या दृष्टीनें त्यांच्या महत्त्वाची कल्पना करितां यावयाची नाहीं.

ब्रिटिश राष्ट्रांतील एकंदर प्रदेशाचा विस्तार केवढा आहे त्याविषयीं आतां विचार करावयाचा. त्याचें क्षेत्रफळ ८० लक्ष चौरस मैल आहे, असें नुसतें सांगितलें तर एवढ्या आंकड्यावरून त्याच्या विस्ताराची वास्तविक कल्पना चांगलीशी व्हावयाची नाहीं. म्हणून तुलनेच्या रूपानें तो विस्तार ध्यानांत आणिला पाहिजे. युरोप व एशिया ह्यांच्या नकाशाकडे एखाद्यानें दृष्टि दिली असतां रशियाच्या बादशहाच्या ताब्यांतील प्रदेशाचा प्रचंड विस्तार पाहून तो एकदम चकित होऊन जातो. तथापि ब्रिटिश प्रदेशाच्या गणनेंत हिंदुस्थान धरिलें असतां पृथ्वीवर सर्वत्र पसरलेल्या राणीच्या अमलांतील ह्या प्रदेशाचा विस्तार रशियाच्या विस्तारापेक्षां $\frac{1}{8}$ नें अधिकच भरेल! एका दृष्टीनें ह्या विस्ताराचा असा विचार झाला. आतां युनायूतेद स्तेत्स हेंहि रशियाप्रमाणेंच

वसाहतींसंबंधी राज्याचा विस्तार.

बरेंच विस्तीर्ण राष्ट्र आहे; तथापि हें राष्ट्र ब्रिटिश राष्ट्राच्या विस्ताराच्या $\frac{1}{२}$ पेक्षां फारच थोडें जास्त आहे. युरोपांतील इतर कोणतेंहि राष्ट्र व ब्रिटिश राष्ट्र ह्यांच्या विस्तारांत तर जमीन अस्मानीचा फरक आहे. फ्रान्सच्या ताब्यांतील सर्व वसाहती धरून देखील तो देश ब्रिटिश राष्ट्राच्या १६ व्या भागाएवढाच आहे. जर्मनीच्या ताब्यांत वसाहती मुळींच नाहींत, व तो देश ब्रिटिश राष्ट्राच्या ४० व्या भागाबरोबर आहे.

आतां ह्या विस्ताराचा दुसऱ्या एका दृष्टीनें विचार करूं. खुद्द ब्रिटिश बेटांच्या क्षेत्रफळाच्या प्रत्येक चौरस मैलास ६५ चौरस मैल वसाहती आहेत; फ्रान्सच्या पुरत्या २ चौरस मैलहि नाहींत. तेव्हां इंग्लंदाएवढालीं ६५ इंग्लंदें त्यांच्या वसाहतींत मावतील असें झालें. म्हणजे खुद्द युरोपांत इंग्लिशांचें एक इंग्लंद असून त्यांचीं तसलीं ६५ इंग्लंदें पृथ्वीवर सर्वत्र पसरलीं आहेत, असें म्हणण्यास हरकत नाहीं. विस्तारासंबंधानें इतकें विवेचन पुरें आहे. आतां लोकसंख्येसंबंधानें विचार करूं.

कानड्यामध्यें हल्लीं ४२ लक्ष लोकसंख्या आहे, व त्याची लोक संख्या. वेस्त इंदीज बेटांतील वसाहतींत १५ लक्ष आहे. दक्षिण आफ्रिकेंतील वसाहतींत १७॥ लक्ष लोक आहेत, व ह्यांपैकीं निमे म्हणजे कंबरलंद, दरहाम नार्थंबलँद व वेस्ट मोरलंद ह्यांत जितके लोक आहेत तितके देखील

इंग्रज नाहींत. आस्ट्रेलियाची लोकसंख्या ३० लक्ष आहे. सारांश, ब्रिटिश वसाहतींतील एकंदर लोकसंख्या जवळ जवळ १ कोटि १० लक्ष—म्हणजे इंग्लंद, वेल्स व स्कातलंद ह्यांतील लोकसंख्येच्या $\frac{1}{2}$ पेक्षां जास्त—आहे. ही लोकसंख्या आणखी एका दृष्टीनें ध्यानांत आणण्यासारखी आहे, ती अशीः—कानडा व वेस्त इंदीज ह्यांतील वस्ती आयर्लंदपेक्षां जास्त आहे; व आस्ट्रेलियाची लोकसंख्या स्कातलंदपेक्षां कांहीं फारशी कमी नाहीं.

हे लोकसंख्येचे आंकडे मोठाले आहेत; परंतु वसाहती अगदीं भरून गेल्या आहेत, असें त्यांवरून सिद्ध होत नाहीं. अद्यापि वस्ती करण्यास त्यांत पुष्कळ जागा आहे. ग्रेट ब्रिटनाइतकी जर कानड्यांत दाट वस्ती आली तर तेथें १०० कोटि, म्हणजे इंग्लंद, स्कातलंद व वेल्स ह्यांच्या लोकसंख्येच्या ३० पटीपेक्षां जास्त, लोक राहतील. तेव्हां इंग्लंदची लोकसंख्या दर ३० वर्षांनीं दुप्पट ह्या प्रमाणानें ( उदाहरणार्थ, इंग्लंदची लोकसंख्या ठोकळ प्रमाणानें ३ कोटि धरिल्यास पहिल्या ३० वर्षांच्या अखेरीस ६, ६० वर्षांच्या अखेरीस १२, ९० वर्षांच्या अखेरीस २४, १२० वर्षांच्या अखेरीस ४८, व १५० वर्षांच्या अखेरीस ९६ कोटि, ह्या प्रमाणानें ) वाढत चालली, असें मानिलें तरी देखील सर्व कानडा भरून जाण्यास १५० वर्षें लागतील. ब्रिटिश

वसाहतींचा विस्तार केवढा आहे, व वाढत चाललेल्या ब्रिटिश लोकसमूहाला पुढें हजारों वर्षेपर्यंत त्या वसाहतींचा राहण्याला व कामधंद्याला केवढा उपयोग होणार आहे, ह्याची थोडी बहुत कल्पना ह्या उदाहरणावरून होईल, असें वाटतें.

आंकड्यांसंबंधानें इतकी माहिती पुरे आहे; म्हणून आतां दुसऱ्या विषयाकडे वळूं. ब्रिटिश बेटांना ह्या वसाहतींशिवाय पृथ्वीवरील इतर कोणत्याहि देशाशीं व्यापार करण्याची मोकळीक नाहीं, अशी कल्पना करूं.

वसाहतींतील उत्पन्न, असें झालें असतां जगांत उत्पन्न होणाऱ्या प्रत्येक पदार्थाचा पुरवठा ह्या वसाहतींपैकीं कोणत्या ना कोणत्या तरी वसाहतीकडून त्यांना होईल; व कोणत्याहि प्रकारचा कारागिरीचा पदार्थ तयार करण्याचें मनांत आणिलें तर कोणत्या तरी वसाहतीस तो करितां येईल. पहा, धान्याची लागवड होण्याजोगी किती तरी जमीन कानड्यामध्यें ओसाड आहे; वेस्त इंदीज बेटांतून साखर, काफी व तंबाखू ह्यांचा पुरवठा होऊं शकेल; आस्ट्रेलियांतून लोंकर व मास ह्यांचा, आसाम व हिंदुस्थान येथून तांदुळ व चहा ह्यांचा, कानड्यांतून सागाचा आणि न्यू झीलंदमधून कातडीं व मास ह्यांचा पुरवठा होऊं शकेल.

ह्या वसाहतींपैकीं प्रत्येकीपासून ब्रिटिश लोकांना कोणकोणत्या जिनसांचा पुरवठा होण्यासारखा आहे

त्यांजविषयीं किंवा त्यांच्या वाढत चाललेल्या लोक समूहाला राहण्यास त्यांचा जो उपयोग होत आहे त्याजविषयीं सविस्तर हकीगत देणें हा प्रस्तुत पुस्तकाचा विषय नाहीं; म्हणून ह्या वसाहतींपैकीं प्रत्येकीचा पृथक् पृथक् विचार न करितां त्यांचा एकदम विचार करूं.

ब्रिटिश वसाहती त्या लोकांनीं ताब्यांत कां राखिल्या पाहिजेत, हा ह्या प्रकरणांतील मुख्य विषय आहे; म्हणून त्याचा आतां विचार करूं. वसाहतींच्या संबंधानें इतर राष्ट्रांचे विचार काय आहेत, तीं राष्ट्रें वसाहती ताब्यांत कां राखितात, व त्यांच्या उदाहरणावरून कोणकोणत्या गोष्टी इंग्लिशांनीं शिकण्याजोग्या आहेत, इत्यादि गोष्टींचा विचार केला असतां वसाहती ताब्यांत कां राखिल्या पाहिजेत, हें चांगलें ध्यानांत येईल.

वसाहती व मूळचे देश [त्या ज्या देशांतील लोकांनीं स्थापिल्या ते देश] ह्यांचा संबंध अनेक रीतीनें ध्यानांत आणितां येतो. एखादा वृक्ष चांगल्या सुदृढ स्थितींत असावा; त्याला फळ यावें; तें पक्व दशेस आल्यावर त्या वृक्षापासून गळून पडावें; सुदैवेंकरून तें सुपीक जमिनीवर पडल्यास त्याचा एक नवाच वृक्ष बनावा, व आणखी नवीन वृक्षांची मालिका उत्पन्न करण्याचें सामर्थ्य त्याच्याहि अंगीं यावें; अशासारखीच वसाहतींची स्थिति आहे असें कित्येक मानितात. कित्येक असें म्हण-

मूळ देशाचा वसाहतींशीं संबंध.

तात कीं, वसाहती ह्या लहान मुलांप्रमाणें आहेत. लहानपणीं आई मुलांवर देखरेख ठेविते, त्यांचें संरक्षण करिते, आणि त्यांना शिक्षण देऊन चांगल्या मार्गास लाविते. परंतु मुलें जसजशीं मोठीं होत जातात, तसतशीं तीं स्वतःचें संरक्षण करावयास शिकतात; आणि जरी तीं परस्परांशीं भांडत नसलीं, तरी देखील कांहीं काळानें त्यांच्या परस्परांमध्यें व आईमध्यें नात्याचा संबंध फारसा राहत नाहीं; राहिलाच तर फारच सूक्ष्म राहतो.

आतां मूळ देश व त्यांच्या वसाहती ह्यांजमधील संबंध ध्यानांत आणण्यास वरील दोन सादृश्यांपैकीं एकहि प्रस्तुत काळीं लागू पडतेंसें वाटत नाहीं. वृक्षाच्या सादृश्यावरून असें दिसतें कीं, त्याला प्रारंभीं जें फळ आलें, तसलीं फळें प्रतिवर्षी उत्पन्न करण्याची शक्ति निदान कांहीं वर्षें तरी त्या वृक्षाच्या खोडाच्या आंगीं आहे; व ह्या प्रतिवर्षी उत्पन्न होणाऱ्या फळांच्या आंगींहि आणखी नवीन फळें उत्पन्न करण्याचें सामर्थ्य आहेच. भूमंडळाच्या पृष्ठभागावर अनेक वसाहती करण्यासारखी जागा जोंपर्यंत शिल्लक होती, तोंपर्यंत हें सादृश्य फार चांगलें लागू पडलें असतें; परंतु युरोपियन लोकांना वसाहती करितां येण्यासारखा भूमंडळाचा बहुतेक सर्व पृष्ठभाग त्यांनीं, त्यांच्या वसाहतींनीं, किंवा चिनी लोकांसारख्या लोकांनीं व्यापून टाकिला आहे, अशी हल्लीं यांची पक्की खातरी आहे; म्हणून प्रस्तुतच्या स्थितीस

हें सादृश्य अगदीं लागू पडत नाहीं. इंग्लिश लोकांच्या पूर्वजांची त्या काळीं अशी खातरी झाली नव्हती, म्हणून त्यांना हें सादृश्य कदाचित् योग्य वाटलें असेल. तेव्हां असें गृहित घेतां येईल कीं, वसाहतींचें जें राज्य इंग्लिशांच्या हातीं हल्लीं आहे, तें त्यांचें शेवटचेंच होय; आणि हें जर का त्यांनीं आपल्या हातून गमाविलें, तर तिसरा जार्ज व त्याचे स्नेही ह्यांनीं युनायूतेद स्तेत्स गमाविलें, त्या वेळीं जसें वसाहतींचें नवें राज्य त्यांना पुन्हां स्थापितां आलें, तशा प्रकारचें वसाहतींचें नवीन राज्य स्थापण्याची संधी त्यांना सांप्रत मिळावयाची नाहीं.

आतां लहान मुलांच्या सादृश्याकडे वळूं; आणि त्या सादृश्यानें तरी वसाहतींचा व मूळ देशांचा संबंध अधिक खऱ्या रीतीनें ध्यानांत येतो कीं काय तें पाहूं. प्राचीन काळीं एकंदरींत हें सादृश्य बरेंच लागू पडलें असतें, ही गोष्ट निर्विवाद आहे. अगदीं अलीकडील काळापर्यंत आपल्या वसाहतींना आपल्याच मर्जीप्रमाणें वागविण्याची सवय मूळ देशांस होती. जसा जसा काळ लोटत गेला, तसे तसें ह्या प्रतिबंधाबद्दल वसाहतींना वैषम्य वाटूं लागलें; म्हणून मूळ देशांपासून त्यांनीं आपला संबंध अजिबात तोडून टाकिला. युनायूतेद स्तेत्स, चिली आणि पेरू ह्यांचा इतिहास अशाच प्रकारचा आहे. अमेरिकेंतील स्वातंत्र्याच्या लढाईपासून (युनायूतेद स्तेत्स इंग्लंदापासून स्वतंत्र झालें तेव्हांपासून ) इंग्लिश

लोक त्यांच्या वसाहतींशीं निराळ्या रीतीनें वागूं लागले आहेत, हें ध्यानांत ठेवणें अवश्य आहे. आपल्या मर्जीस येईल त्याप्रमाणेंच वसाहतींना वागवावयाचें, ह्या जुन्या तत्वाचा अनुभव त्यांनीं फारच थोडा काळ घेतला. उत्तर अमेरिका, दक्षिण आफ्रिका व आस्ट्रेलिया येथील त्यांच्या मोठ मोठ्या वसाहतींना स्वतःचा राज्यकारभार चालविण्याचा व स्वतःचें संरक्षण करण्याचा अधिकार आतां त्यांनीं दिला आहे. एखाद्या मुलाचें शाळेंत जाण्याचें वय सरलें म्हणजे त्या त्रासांतून सुटून जगांत स्वतंत्रतेनें राहण्यास तो फार उतावळा झालेला असतो. तशी उतावळी ब्रिटिश वसाहतींना होण्याची आतां अगदीं भीति राहिली नाहीं; कारण त्या करत्या सवरत्या झाल्या असें समजून तशा प्रकारचेंच वर्तन इंग्लिशांनीं सांप्रत त्यांच्यांशीं ठेविलें आहे. ह्यावरून असें दिसून येईल कीं, वृक्ष व त्याचें फळ अशा प्रकारचें जुनें सादृश्य वसाहतींना आतां लागू पडत नाहीं; कारण नव्या वसाहती स्थापन करण्यास आतां जागाच उरली नाहीं. त्याचप्रमाणें लहान मुलांचेंहि सादृश्य आतां लागू पडत नाहीं; कारण ह्या वसाहतींना मुलांप्रमाणें वागविण्याचें आतां इंग्लिशांनीं सोडून दिलें आहे.

तेव्हां हीं दोन्ही सादृश्यें हल्लीं लागू पडत नाहींत म्हणून सोडून दिलीं पाहिजेत; आणि वसाहतींनीं, एक तर वृक्षाच्या फळाप्रमाणें आपणांपासून च्युत झालें पाहिजे,

किंवा प्रौढ मुलें केव्हां केव्हां करितात त्या प्रमाणें आपला त्याग केला पाहिजे, अशी इच्छा इतःपर इंग्लिशांना करून उपयोग नाहीं; कारण असें झालें असतां नवीन वसाहती स्थापण्यास त्यांना जागाच नाहीं.

येथें अशी एक शंका उत्पन्न होईल कीं, ह्या वसाहतींमुळें ब्रिटिश राष्ट्राचा विलक्षण विस्तार झाला आहे; तेव्हां हें सर्व गाडें सुरळीत कसें चालेल? राष्ट्र म्हटलें म्हणजे तें फार मोठें असूं शकावयाचेंच नाहीं, अशी प्राचीनकाळीं समजूत होती; परंतु सांप्रत ह्या समजुतींत फरक झाला आहे. पहा, रशियाच्या बादशहासारख्या सर्व सत्ताधारी बादशहाच्या अमलाखालींच नव्हे, तर युनायटेड् स्टेट्स-सारख्या पूर्ण लोकसत्तात्मक राज्यव्यवस्थेखालींहि मोठालीं राष्ट्रें सांप्रत सुरळीत चालतात असें आपण पाहतों.

तेव्हां ब्रिटिश वसाहती त्या लोकांनीं ताब्यांत राखिल्या पाहिजेत, एवढी गोष्ट सिद्ध झाली. आतां त्यांपासून त्यांना उपयोग काय आहे, ह्याचा विचार करण्यास व त्या ताब्यांत ठेवण्यास काय काय केलें पाहिजे, तें पाहण्यास हरकत नाहीं.

इंग्लिशांच्या पूर्वजांना ज्या प्रश्नाचा विचार करावयाचा होता त्याहून सांप्रत उत्पन्न झालेला प्रश्न फार भिन्न आहे. "वसाहती मिळविण्यासाठीं प्राण आणि पैसा ह्यांचा पाहिजे तितका व्यय करणें फायदेशीर आहे किंवा नाहीं?" हा प्रश्न त्यांच्या पूर्वजांपुढें होता, व ह्या

प्रश्नाला त्यांचें उत्तर "आहे" असें होतें. हल्लीं इंग्लिशांना ज्या प्रश्नाचें उत्तर द्यावयाचें तो असाः— "आपल्या पूर्वजांनीं मिळवून ठेविलेल्या ह्या वसाहती ताब्यांत राखणें फायदेशीर आहे कीं नाहीं, व फायदेशीर असल्यास हा हेतु साधण्यासाठीं कोणते उपाय योजिले पाहिजेत?"

वसाहतींची स्थापना करण्यास प्रारंभ करणें फायदेशीर आहे कीं नाहीं, ह्या प्रश्नाचा फ्रेंच व जर्मन लोकांना हल्लीं विचार कर्तव्य आहे. इंग्लिशांस जरी तसा विचार करावयाचा नाहीं, तरी नवीन वसाहती स्थापन करण्यास फ्रेंच व जर्मन लोकांना जीं कारणें आहेत, तींच इंग्लिशांना आपल्या जुन्या ताब्यांत राखण्यास कांहीं अंशानें तरी लागू पडतील, हें उघड आहे.

मागील काळांत आलेले वसाहतींचे उपयोग.

म्हणून वसाहतींपासून कोणते उपयोग असल्यामुळें त्या स्थापन करण्यास प्रारंभ करण्याचें लोकांच्या मनांत आलें, आणि ते उपयोग ब्रिटिश वसाहतींपासून त्या लोकांना हल्लीं कितपत होत आहेत, ह्याजबद्दल विचार करणें इष्ट आहे. जे उपयोग त्यांना हल्लीं होत नाहींत, त्यांचाच विचार प्रथमतः करूं.

**कैदी पाठविण्यासाठीं वसाहतींची स्थापना** हा त्यांचा एक उपयोग होय. न्यू साउथ वेल्स, नारफाक बेट, व तासमानिया ह्या वसाहती केवळ

कैद्यांना पाठवि-
ण्याकडे त्यांचा
उपयोग.

कैदी पाठविण्यासाठीं म्हणूनच प्रथमतः स्थापिल्या होत्या. वास्तविक प्रकार असा दिसतो कीं, इतर ब्रिटिश वसाहतींना व विशेषेंकरून वेस्त इंदीज बेटांना मजुरांचा पुरवठा ह्या कैद्यांपासूनच झालेला आहे. कैद्यांकरितां वसाहती स्थापण्याची किंवा पूर्वी स्थापिलेल्या अशा प्रकारच्या वसाहतींस कैदी पाठविण्याची वहिवाट आतां इंग्लिशांनीं बंद केली आहे. तथापि त्यांचे शेजारी जे फ्रेंच ते अद्यापि अशा प्रकारच्या वसाहतींस महत्त्व देतात, व त्यांच्या पासिफिक महासागरांतील बेटांत ते कैदी पाठवितात, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. फ्रेंच लोकांनी आपल्या शेजारीं वसाहती करूं नयेत, अशाविषयीं आस्ट्रेलियातील लोकांच्या नेहमीं तक्रारी असतात. फ्रेंच लोक आपल्या त्या वसाहतींत कैदी पाठवितात, हें त्या तक्रारींना एक कारण आहे.

**धर्मसंबंधावरून किंवा राजकीयसंबंधावरून हद्दपार केलेल्या लोकांस राहण्यास जागा**, हा त्या स्थापण्यापासून दुसरा उपयोग आहे. रोमन क्याथलिक लोकांनीं मेरीलंद येथें

हद्दपार केलेल्या
लोकांस राहण्यास
त्यांचा उपयोग.

व प्यूरिटन लोकांनीं न्यू इंग्लंदस्तेत येथें स्थापिलेल्या वसाहती अशा प्रकारच्या होत. वास्तविकपणें हा उपयोग आतां अगदींच राहिला नाहीं. ऐरिश लोकांसंबंधानें मात्र ही

गोष्ट थोडीशी लागू पडते; पण हे लोक राजकीय संबंधावरून हा देश सोडून जातात ते कांहीं ब्रिटिश वसाहतींत जात नाहींत; तर युनायटेड स्टेटसमध्यें जातात.

**लष्करी ठिकाणें बनविणें** हा वसाहती स्थापण्याचा तिसरा उपयोग होय. रोमन लोकांनीं आपल्या बहुतेक वसाहती ह्याच उद्देशानें स्थापिल्या होत्या. आपल्या विरुद्ध असणाऱ्या लोकांवर आपला अंमल बसविण्यासाठीं किंवा राष्ट्राचें मुख्य स्थान (रोम) व लांब लांबचे प्रदेश ह्यांचा संबंध कायम राखण्यासाठीं त्यांनीं ह्या लष्करी वसाहती मधून मधून स्थापिल्या होत्या. ह्या दोन उपयोगांपैकीं पहिला—आपल्याविरुद्ध असणाऱ्या लोकांवर आपला अंमल बसविण्याकडे होणारा—उपयोग ब्रिटिश वसाहतींपासून त्यांना हल्लीं होत नाहीं.

लष्करी कामाकडे त्यांचा उपयोग.

लांब लांबच्या ठिकाणांशीं संबंध राखणें हा ह्या लष्करी वसाहतींचा दुसरा उपयोग. अशा प्रकारचीं इंग्लिशांचीं फारशीं ठिकाणें नाहींत; जिब्राल्टर व माल्टा हीं अशा प्रकारचीं आहेत. ह्यांच्या योगानें ज्या वसाहतींशीं किंवा ताब्यांतील देशांशीं इंग्लिशांचें दळण वळण चालू राहतें, त्या वसाहतींच्या अगर देशांच्या महत्त्वावर ह्यांचें महत्त्व अवलंबून आहे, हें उघड आहे. म्हणून त्या वसाहती व ते देश ताब्यांत राखणें जर फायदेशीर असेल तर त्यांच्यांशीं हें दळण वळण ज्या लष्करी

ठिकाणांमुळें चालू राहतें, तीं हीं लष्करी ठिकाणें ताब्यांत राखणेंहि फायदेशीर आहेच.

आथेन्स व इराण हीं प्राचीन राष्ट्रें आपल्या ताब्यांतील देशांपासून प्रत्यक्ष खंडणी घेत असत; आणि स्पेन व पोर्तुगाल हीं अर्वाचीन राष्ट्रें हल्लींहि आपल्या वसाहतींपासून खंडण्या घेत आहेत; किंवा आपल्या व्यापाराला उत्तेजन येण्यासाठीं वसाहतींना इतर देशांशीं व्यापार करण्याची बंदी करून अप्रत्यक्ष रीतीनें पैसा गोळा करीत आहेत. सारांश, **वसाहतींपासून पैसा गोळा करणें** हा त्यांचा प्राचीन काळीं उपयोग होता. इंग्लिश लोक ह्या दोन्हीहि तऱ्हांनीं त्यांच्यापासून हल्लीं पैसा काढीत नाहींत. तेव्हां ब्रिटिश लोकांना त्यांच्या वसाहतींचे जे उपयोग हल्लीं होत नाहींत ते असेः—(१) कैदी पाठविण्याकडे त्यांचा उपयोग होत नाहीं; (२) धर्मसंबंधावरून किंवा राजकीय संबंधावरून हद्दपार केलेल्या लोकांना राहण्याकडे त्यांचा उपयोग होत नाहीं; (३) विरुद्ध लोकांवर अंमल बसविण्याकडे त्यांचा उपयोग होत नाहीं; आणि (४) त्यांच्यापासून ते खंडणी घेत नाहींत. तर मग त्यांना त्या वसाहतींचा उपयोग तरी काय आहे?

खंडणी वगैरे संबंधानें त्यांचा उपयोग.

ह्या वसहतींचे त्यांना उपयोग आहेत ते असेः—

वसाहतींचे हल्लींचे उपयोग.

[१] त्यांच्या योगानें ब्रिटिश व्यापार

वाढतो. [ २ ] त्यांच्या वाढत चाललेल्या लोक समूहाला राहण्यास त्यांचा उपयोग होतो. [ ३ ] वसाहतींच्या ऐवजीं जर तितकीं लहान लहान स्वतंत्र संस्थानच इंग्लिश लोकांचीं असतीं, तर जी योग्यता त्यांना जगांत प्राप्त झाली असती, त्यापेक्षां जास्त योग्यता ते व त्यांच्या वसाहती एकत्र असल्यामुळें प्राप्त झाली आहे. आतां अनुक्रमानेंच वरील उपयोगांचा विचार करूं.

प्राचीन काळीं लोकांची मुख्यत्वें अशी समजूत होती कीं, वसाहती ताब्यांत असल्यानें मूळ देशांतील व्यापाराच्या जिनसांच्या खपाला अधिक जागा होते. म्हणून व्यापारासंबंधानें जे कायदे मूळ देश ठरवीत, त्यांमुळें वसाहतींना मूळ देशांशीं व्यापार करण्याची मात्र मोकळीक त्या काळीं असे. हल्लीं असा प्रतिबंध इंग्लिशांनीं ठेविलेला नाहीं. म्हणून अशा स्थितींतहि व्यापारासंबंधानें त्यांच्यापासून फायदा होत आहे कीं काय, हें पाहिलें पाहिजे. हें लक्षांत येण्यासाठीं पुढील प्रश्नांचा विचार केला पाहिजेः—( १ ) वसाहतींशीं त्यांचा सांप्रत व्यापार किती आहे ? ( २ ) पूर्वीं होता त्यापेक्षां जास्त आहे किंवा कमी आहे ? ( ३ ) तो वाढण्याचा संभव आहे किंवा कमी होण्याचा संभव आहे ? ह्या प्रश्नांचीं उत्तरें ठरविण्यासाठीं आंकड्यांचा उपयोग करावा लागेल; व तो जितक्या सुलभ रीतीनें करितां येईल तितक्या सुलभ

वसाहतींबरोबरच्या ब्रिटिश व्यापाराचें महत्त्व.

रीतीनें केला असतां समजण्यासहि अडचण पडणार नाहीं.

प्रथमतः हें ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, हिंदुस्थानासुद्धां ब्रिटिश वसाहतींची लोकसंख्या जगाच्या लोकसंख्येच्या $\frac{1}{6}$ शा इतकी आहे. दुसरी गोष्ट अशी कीं, ह्या वसाहती व हिंदुस्थान ह्यांना इंग्लिश लोक दरसाल ८,३०,००,००० पौंड किंमतीचा माल पाठवितात; आणि पृथ्वीवरील राहिलेल्या इतर देशांस १९,१०,००,००० पौंडांचा पाठवितात. म्हणजे पृथ्वीवरील इतर देशांत प्रतिवर्षी त्यांचा जितका माल खपतो, त्याच्या निम्हून अधिक माल फक्त ह्या ताब्यांतील मुलखांतच खपतो, असें झालें. तसेंच हिंदुस्थान गाळिलें तर, इंग्लिशांचीं इतर मोठालीं गिऱ्हाइकें म्हटलीं म्हणजे युनायतेद स्तेतस, फ्रान्स, जर्मनी, हालंद व बेलजम हीं होत. जर्मनीशीं जो त्यांचा व्यापार चालतो तो बेलजममधून चालतो. सन १८६९ त ह्या पांच देशांनीं ७,१०,००,००० पौंडांचा ब्रिटिश माल, घेतला, व १८८३ त ८,१०,००,००० पौंडांचा घेतला; म्हणजे १४ वर्षांत ब्रिटिश माल ते $\frac{1}{7}$ शानें अधिक घेऊं लागले. आतां वसाहतींचा विचार करूं. ब्रिटिश लोकांच्या अति विस्तीर्ण अशा चार वसाहतींनीं— कानडा, वेस्त इंदीज बेटें, दक्षिण आफ्रिका व आस्त्रेलिया ह्यांनीं—१८६९ त २,२०,००,००० पौंडांचा व

त्यांच्या बरोबरच्या व्यापाराची वृद्धि.

१८८३ त ४,२०,००,००० पौंडांचा ब्रिटिश माल घे-तला, म्हणजे १४ वर्षांत हा माल तेथें $\frac{१०}{११}$ शांनीं ज्यास्त खपूं लागला; तात्पर्य, जवळ जवळ दुप्पट माल खपूं लागला, असें म्हणण्यास हरकत नाहीं. तेव्हां ह्याच-प्रमाणानें हा खप वाढत गेल्यास आणखी २१ वर्षांनीं वरील ५ राष्ट्रें ९,८०,००,००० पौंडांचा माल घेऊं लागतील; परंतु ह्या चार वसाहती ९,९०,००,००० पौंडांचा माल घेऊं लागतील ! ! तसेंच, इतर राष्ट्रां-तील जो एकंदर माल त्या वसाहती घेतात त्याच्या वाढी-च्या प्रमाणाशीं ब्रिटिश मालाच्या वाढीचें प्रमाण ताडून पाहिलें असतां अधिक भरतें किंवा कमी भरतें असा दुसरा एक प्रश्न उत्पन्न होतो. ह्या संबंधानें थोडा बहुत विचार केला असतां असें दिसून येईल कीं, ब्रिटिश मालाच्या वाढीचें प्रमाण पूर्वींप्रमाणेंच कायम आहे; इत-केंच नाहीं, तर इतर राष्ट्रांतील मालाच्या वाढीच्या प्रमाणापेक्षां कदाचित् थोडेसें वाढलेंहि आहे. म्हणून वसाहतींना परदेशच्या मालापेक्षां ब्रिटिश माल हल्लीं किंचित् अधिक आवडूं लागला आहे, असें ठरतें.

ब्रिटिश पदार्थांचा वसाहतींत जो खप होतो त्याचें महत्त्व.

आतां ह्या विषयाचा दुसऱ्या एका दृष्टीनें विचार करूं. पुढें जे आंकडे दिले आहेत ते मारशाल आणि कंपनीमधील मि. जान मारशाल—लीड्स येथील चेंबर आफ् कामर्सचे ( व्यापाऱ्यांच्या सभेचे ) अध्यक्ष—ह्यांज-कडून मिळाले आहेत.

# इतर देशांत खप.

| देशाचें नांव. | लोक संख्या. | ब्रिटिश मालाचा खप. पौंड. | दर माणशीं खप. पौं. शि. पे. |
|---|---|---|---|
| फ्रान्स. | ३ को. ८० ल. | १ को. ७५ ल. | ० ९ ३ |
| जर्मनी. | ४॥ कोटि. | १ को. ९० ल. | ० ८ ४ |
| हालंद व वेलजम. | १ कोटि. | १ को. ८० ल. | १ १५ ६ |
| युनायूतेद स्तेत्स. | ५ को. ७० ल. | २ को. ७० ल. | ० ९ ७ |

# वसाहतींत खप.

| वसाहतीचें नांव. | लोक संख्या. | ब्रिटिश मालाचा खप. पौंड. | दर माणशीं खप. पौं. शि. पे. |
|---|---|---|---|
| कानडा. | ४५ लक्ष. | ९० लक्ष. | २ ० ० |
| वेस्तइंदीज वेटें. | १५ लक्ष. | ३५ लक्ष. | २ ६ ८ |
| दक्षिणआफ्रिका. | १५ लक्ष. | ४५ लक्ष. | ३ ० ० |
| आस्त्रेलिया. | ३० लक्ष. | २ को. ४० ल. | ८ ० ० |

( ह्यावरून युनायूतेद स्तेत्समध्यें साधारणपणें दर माणशीं १० शिलिंगांपेक्षां किंचित् कमी माल खपतो, व आस्त्रेलियामध्यें ८ पौंडांचा खपतो, असें झालें. तेव्हां युनायूतेद स्तेत्स मधल्या ३३ गिऱ्हाइकांबरोबर आस्त्रेलियांतील २ गिऱ्हाइकें झालीं. )

इतर राष्ट्रांनीं आपापल्या व्यापाराचें संगोपन केलें असतां त्यापासून ब्रिटिश राष्ट्रावर होणारे परिणाम.

ह्या आंकड्यांमध्यें २ कारणांनीं फेरफार होण्याचा संभव आहे. (१) इतर राष्ट्रांनीं अन्य देशांतील माल आपल्या देशांत येऊं न देण्याचे उपाय वाढविणें [ आपल्या व्यापाराचें संगोपन करणें ] आणि ( २ ) लोकांच्या मनोवृत्तींत बदल होणें, म्हणजे त्यांच्या आवडींत किंवा रितीभातींत बदल होणें. उदाहरणार्थ, केव्हां केव्हां जिनीवा येथील घड्याळांपेक्षां इंग्लिश घड्याळें लोकांना अधिक आवडतात; परंतु पुन्हा कांहीं काळानें इंग्लिश घड्याळांपेक्षां अमेरिकन घड्याळें अधिक आवडूं लागतात. ह्यांतील १ल्या कारणासंबंधानें विचार केला असतां असें दिसून येईल कीं, हल्लीं युरोप किंवा अमेरिका खंडांतील राष्ट्रें आपापल्या व्यापाराचें जितकें संगोपन करीत आहेत, त्यापेक्षां कांहीं कारणानें पुढें कमी संगोपन करूं लागतील, असा कांहीं फारसा संभव आज दिसत नाहीं. आपल्या देशांतील यंत्रांचाच खप व्हावा म्हणून इंग्लंदाहून येणाऱ्या यंत्रांवर अमेरिकेंतील संस्थानांनीं कर बसविला आहे; व

ह्यामुळें तेथील शेतकऱ्यांना तेथील यंत्रें अवाच्या सवा किमती देऊन विकत घ्यावीं लागत आहेत; म्हणून ते शेतकरी कदाचित् त्या संस्थानांविरुद्ध उठण्याचा संभव आहे. परंतु अशा प्रकारचा फेरफार होईल, असेंहि आपणांस धरून चालून उपयोग नाहीं.

तसेंच व्यापारासंबंधीं हे प्रतिबंध एखाद्या राष्ट्रांत जस जसे अधिक काळ सुरू असतात, तस तसे ते सोडून देण्याचेंहि अधिकाधिक जिवावर येतें. कारण ह्या प्रतिबंधांमुळें जे फायदे होण्यासारखे दिसतात ते जस जसा अधिक काळ लोटेल, तस तसे पहिल्यापेक्षां अधिक महत्त्वाचे वाटूं लागतात. आतां एखाद्या राष्ट्रांत जर आरंभींच अप्रतिबंध व्यापार [ फ्री ट्रेड ] सुरू असला, व पुढें कांहीं काळपर्यंत तो तसाच चालू राहिला, तर त्या राष्ट्राच्या हातून तेथील व्यापाराचें संगोपन [प्रोटेक्शन] होण्याचाहि संभव कमी आहे; कारण अप्रतिबंध व्यापारापासून फायदे आहेत असें ज्यांना वाटत असतें, त्यांना ते फायदेहि, वरच्याप्रमाणेंच जस जसा अधिक काळ लोटत जातो, तस तसे अधिक ढळढळीत दिसूं लागतात. अशी वास्तविक स्थिति असल्यामुळेंच काब्डन ह्याला त्याच्या वेळचे धान्यासंबंधी कायदे *[कॉर्न—लॉज्]

---

* इंग्लंदांतील लोकांची काब्डन ह्याच्या वेळेपर्यंत अशी समजूत होती कीं, परराष्ट्रांतून पाहिजे तितकें धान्य आपल्या देशांत

मोडून टाकण्यास फार प्रयास पडले; तसेंच ते आतां पुन्हा सुरू करूं म्हटलें तर त्याहूनहि अधिक प्रयास पडतील. म्हणून असें म्हणण्यास हरकत नाहीं कीं, ज्या राष्ट्रांत व्यापाराचें संगोपन करण्याची पद्धति सुरू आहे, त्यांत ती पद्धति बंद होऊन अप्रतिबंध व्यापार सुरू होण्याचा ज्याप्रमाणें संभव कमी आहे, त्याप्रमाणेंच ज्या राष्ट्रांत हल्लीं अप्रतिबंध व्यापार सुरू आहे, तेथें तो बंद होऊन व्यापाराचें संगोपन होण्याच्या भीतीचाहि संभव कमीच आहे.

मनोवृत्तींचा व्यापारावर जो परिणाम होतो, त्या विषयीं विचार करितांना ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे कीं, "ज्याच्याकडे राज्यसत्ता जाते त्याच्याकडेच व्यापारहि जातो," (Trade follows the flag)=

येऊं दिल्यास देशांतील शेतकऱ्यांचें नुकसान होईल. हें नुकसान न व्हावें, म्हणून बाहेरून येणाऱ्या धान्यावर कर बसविण्यासाठीं कायदे केलेले होते; त्यांना 'कॉर्न्-लॉज्' म्हणत. अशा रीतीनें व्यापारास प्रतिबंध करण्यांत राष्ट्राचें खरें हित नाहीं, अशी रिचर्ड काब्डन ह्याची व जान ब्राइट प्रभृति त्याच्या मित्रांची खातरी झाली. तेव्हां काब्डन ह्यानें कॉर्न्-लॉज् रद्द करण्याच्या उद्देशानें १८३८ त 'ऍन्टी-कॉर्न-लॉ-लीग' (धान्याच्या कायद्यांविरुद्ध मंडळी) नांवाची संस्था स्थापिली. आपला उद्देश सिद्धीस नेण्यास त्याला फार प्रयास पडले; परंतु १८४६ त त्याला यश येऊन हे कायदे रद्द झाले; व बाह्य देशांहून येणाऱ्या धान्यावरील कर बंद झाले. त्याच्या श्रमाबद्दल त्याला त्याच्या देशबांधवांनीं ७० हजार पौंड बक्षीस दिले. हा १८०४त जन्मला, व १८६५त मृत्यु पावला. हा मांचेस्तर येथील कापसाच्या कारखान्यांत भागीदार होता.

अशी जी पुरातन समजूत आहे, तींत पुष्कळ तथ्य आहे. तसेंच ब्रिटिश वसाहतींत त्या लोकांचा अंमल सुरू होण्या-पूर्वी त्या इतर राष्ट्रांतल्या मालापेक्षां ब्रिटिश माल कमी घेत; परंतु हल्लींहि कमीच घेतात, असें मानण्यास कांहीं आधार नाहीं, असें मागें दाखविलेंच आहे. शिवाय सर्व ब्रिटिश राष्ट्राचे ब्रिटिश लोक प्रमुख आहेत; व हा संबंध-हि व्यापाराच्या बाबतींत त्यांना फारच हितावह आहे. जोंपर्यंत त्यांच्याकडे हें वरिष्ठपणाचें नातें आहे, तोंपर्यंत वसाहती त्यांचा माल घेणारच. इंग्लंदांतील रितीभाती व पोषाख ह्यांचें अनुकरण इतर सर्व ठिकाणचे इंग्लिश लोक करणारच; आणि जर कांहीं कारणांमुळें त्यांची सत्ता वसाहतींना अप्रिय झाली तर त्या त्यांच्या हातून जातील, व त्यांचें फार नुकसान होईल.

सारांश, वरील एकंदर विवेचनावरून पुढें लिहि-ल्याप्रमाणें गोष्टी ठरतात :—[ १ ] परमुलखीं रवाना करण्यासाठीं ब्रिटिश लोक जितका माल तयार करितात, त्याच्या $\frac{१}{३}$ शापेक्षां अधिक माल खुद्द त्यांच्या वसाहती व हिंदुस्थान ह्यांच्यांतच खपतो; [ २ ] परराष्ट्रांत दर माणशीं जितका त्यांचा माल खपतो, त्यापेक्षां ह्या त्यांच्याच ताब्यांतील मुलखांत किती तरी अधिक खपतो;[३] त्यांच्या ताब्यांतील मुलखांत होणारा त्यांच्या मालाचा हा खप, पृथ्वीवरील इतर देशांत होणाऱ्या खपाशीं ताडून पाहतां, फारच सपाट्यानें वाढत चालला—

आहे; [ ४ ] पुढील काळांत मोठ मोठ्या देशांत जर व्यापाराचें संगोपन होऊं लागलें, तर ब्रिटिश व्यापारापासून त्यांचे व त्यांच्या वसाहतींचें अधिकच हित होण्याचा संभव आहे; आणि [ ६ ] मनोवृत्तींचा व्यापाराशी पुष्कळ संबंध आहे; म्हणून ब्रिटिश सरकारानें एकंदर वसाहतींशीं व प्रत्येक वसाहतींतील लोकांशीं चांगलें वर्तन ठेवणें हें फार महत्त्वाचें आहे; इतकेंच नाहीं तर इंग्लंदांतील लोकांनींहि त्यांच्यांशीं चांगलें वर्तन ठेवण्यास जपणें हें फार महत्त्वाचें आहे.

वसाहतींच्या योगानें ब्रिटिश व्यापार वाढतो, हा जो त्यांचा पहिला उपयोग त्याविषयीं हें एवढें विवरण झालें. आतां मूळ देशांत वाढत चाललेल्या लोकसमूहाला राहण्यास जागा, हा जो त्यांचा दुसरा उपयोग त्याजबद्दल विचार करावयाचा. आतां शेतकरी जर सरकाराला आपला धारा देण्यांत कसूर करणार नाहींत, तर जोंपर्यंत राहण्यास जागा शिल्लक आहे, तोंपर्यंत ब्रिटिश लोकसंख्या कितीहि वाढली तरी हरकत नाहीं, व तोंपर्यंत आपला चरितार्थ चालण्यासहि कांहीं अडचण पडणार नाहीं, असें मि. जार्ज ह्यांचें म्हणणें आहे. तथापि ह्या वाढत चाललेल्या लोकसमूहाची काय वाट लावावयाची ह्या प्रश्नास पुढें फार महत्त्व येईल, असें धोरण दिसत आहे.

वाढत चाललेल्या इंग्लिश लोक समूहाला राहण्याकडे वसाहतींचा उपयोग.

ब्रिटिश बेटांची लोकसंख्या ३,६०,००,००० आहे; व ही लोकसंख्या दर ३० वर्षांनीं दुप्पट होत

जाणार असा अजमास आहे. शिवाय भिक्षेकऱ्यांची संख्या हल्लीं १९ लक्ष आहे, असेंहि माहीत आहे. तसेंच लंडन शहरांत व ब्रिटिश बेटांतील इतर मोठ मोठ्या शहरांत चांगले सशक्त लोक काम करण्यास तयार असतांहि त्यांना कामधंदा मिळत नाहीं, असेंहि आपण नेहमीं वाचितों. तेव्हां ह्या एकंदर स्थितीचा विचार केला असतां, ह्या फाजील लोकसमूहाची सोय लावणें हा प्रस्तुत काळीं इंग्लिशांपुढें एक फारच महत्त्वाचा प्रश्न आहे, असें म्हणावें लागतें.

वाढत चाललेल्या लोकसमूहाला राहण्यासाठीं वसाहतींची आवश्यकता आहे, असें प्राचीन काळच्या लोकांस वाटत असे; इतकेंच नव्हे, तर १०० वर्षांमागें लोकांची अशीच समजूत होती, ह्यांत संशय नाहीं. अगदीं परकीय देशांत जाऊन राहणें लोकांच्या फार जिवावर येत असे; कारण तेथें कायदे नवे, धर्म नवा व कदाचित् भाषाहि नवीनच; सारांश तेथें सर्व कांहीं नवें. ह्यामुळें त्या दूरच्या देशांत जाऊन राहणाऱ्या मनुष्याला आपण अगदीं परक्या ठिकाणीं येऊन पडलों आहों, असें मरेपर्यंत वाटावयाचें. युनायूतेद स्तेत्स हें ह्या संबंधानें अपवादक आहे; कारण इंग्लंदांतील भाषा तीच तेथील भाषा आहे; व इंग्लंदच्या राज्यव्यवस्थेच्या नमुन्यावरच थोडी बहुत तेथील राज्यव्यवस्थाहि आहे. म्हणून त्या राष्ट्रांत जाऊन राहणें त्या लोकांस हल्लीं परक्याप्रमाणें वाटत नाहीं. ह्यास्तव इंग्लंदांतून बाहेर राहण्यास जाणाऱ्या लोकांना ब्रिटिश वसाहतींशीं टक्कर मारण्यास युनायूतेद स्तेत्स हल्लीं तयार आहे.

ह्या प्रश्नाचा वर वर विचार केला तर असें वाटेल कीं, ब्रिटिश बेटांतील वाढत चाललेले लोक ब्रिटिश वसाहतींत राहण्यास जावोत, किंवा युनायृतेद स्तेत्समध्यें राहण्यास जावोत; ते ब्रिटिश बेटें सोडून गेले म्हणजे झालें. बाहेर

बाह्य प्रदेशीं जाणाऱ्या लोकांनीं इतर देशांत जाऊन राहण्यापेक्षां ब्रिटिश वसाहतींतच जाऊन राहवें, ह्या गोष्टीचें महत्त्व.

कोणत्याहि देशांत गेले तरी त्यापासून इंग्लिशांचें नफा नुकसान कांहीं नाहीं. एखादा मनुष्य देश सोडून गेला म्हणजे अर्थातच देशांतील इतर मजुरदारांना एक जागा रिकामी झाली. म्हणून ज्याला कामधंदा मिळत नसेल असा एखादा मनुष्य त्याची जागा घेईल. ह्यामुळें हा दुसरा मनुष्य निरुद्योगी राहिला असता तर देशांतील भिक्षेकऱ्यांच्या संख्येंत आणखी जी एक भर पडली असती, तिचें भय नाहींसें झालें. तेव्हां वाढत चाललेला लोकसमूह परदेशीं राहण्यास गेल्यानें देशांतील भिक्षेकऱ्यांची संख्या कमी होत जाईल, हा त्यापासून एकच फायदा जरी असता, तरी देखील हा प्रश्न फारच महत्त्वाचा समजणें अवश्य होतें. परंतु हा फायदा एकंदर फायद्याच्या निमेच आहे. आणखी दुसरा फायदा आहे; तो असा. एखादा मनुष्य इंग्लंड सोडून दुसऱ्या देशांत राहण्यास चालता झाला म्हणजे त्याचा व इंग्लंदचा संबंध अगदीं तुटला असें होत नाहीं. इंग्लंदांत तो असतो तेव्हां तो तेथील जिनसांचा **उत्पादक** असतो; परदेशांत जाऊन राहिला कीं, **ग्राहक** बनतो. अ इंग्लंद

सोडून परदेशांत राहण्यास गेला अशी कल्पना केली; तर ह्यामुळें त्याची रिकामी जागा बला मिळते, एवढा एकच कांहीं फायदा नाहीं. आणखी दुसरा फायदा आहे, तो असा कीं, परदेशांत जाऊन तो जो पैसा मिळविणार त्या पैशानें इंग्लंदांत उत्पन्न होणारे जिन्नस मागविणार; व ह्यामुळें इंग्लंदांतील क मजुराला थोडा बहुत कामधंदा मिळणार. तेव्हां ज्या देशांत ब्रिटिश व्यापाराला बंदी नाहीं, अशा कोणत्याहि देशांत जर तो जाईल, तर वर लिहिलेले दोन्ही फायदे होतील. परंतु कोणत्या देशांत ब्रिटिश माल कोणत्या प्रमाणानें खपतो, ह्याविषयीं मागें जे आंकडे दिले आहेत, तिकडे लक्ष दिलें पाहिजे; आणि तो कोणत्या देशांत जातो, तेंहि इंग्लिशांस किती महत्त्वाचें आहे, तें ध्यानांत आणिलें पाहिजे. अशी कल्पना करूं कीं, क्ष, य आणि ज्ञ हे इंग्लंद सोडून परदेशांत राहण्यासाठीं इंग्लंदाहून निघाले. क्ष युनायूतेद स्तेत्समध्यें जात आहे; तेव्हां मागील प्रमाणाप्रमाणें तो इंग्लंदचा माल दरसाल १० शिलिंगांचा घेईल. य कानडच्यामध्यें जात आहे; तो दरसाल २ पौंडांचा घेईल; व ज्ञ आस्त्रेलियांत जात आहे; तो दरसाल ८ पौंडांचा घेईल. तेव्हां इंग्लंदांतून जाणाऱ्या लोकांनीं युनायूतेद स्तेत्समध्यें न जातां ब्रिटिश वसाहतींतच राहण्यास जावें, ही गोष्ट इंग्लिशांच्या किती हिताची आहे, तें ध्यानांत येणार आहे.

सारांश, वाढत चाललेल्या ब्रिटिश बेटांतील लोक-

समूहाला कित्येक वर्षे पुरेल इतकी उत्तम जागा ब्रिटिश वसाहतींमुळें झाली आहे. तसेंच हल्लींच्या वस्तुस्थितीकडे लक्ष दिलें असतां युनायूतेद स्तेत्समध्यें न जातां ह्या लोकांनीं ब्रिटिश वसाहतींतच राहण्यास जावें; म्हणून त्या वसाहतींतील लोकांच्या मनांतील इंग्लिशांविषयींचें प्रेम त्यांनीं कायम राखणें, ही गोष्ट ब्रिटिश व्यापारास अत्यन्त महत्त्वाची आहे.

वसाहतींमुळें इंग्लिशांचें सामर्थ्य वाढतें, म्हणजे त्यांना राजकीय महत्त्वहि प्राप्त होतें, हा त्यांचा शेवटचा म्हणजे ३रा उपयोग होय. लहान लहान राष्ट्रें मोडून त्यांचीं हळू हळू मोठालीं राष्ट्रें बनत चाललीं आहेत, असें इतिहासा वरून दिसून येतें; म्हणून युरोपांतील राष्ट्रांच्या योग्यतेची तुलना त्यांच्या फक्त युरोपांतील विस्तारावरून हल्लीं कोणी करीत नाहींत, तर पृथ्वीवरील त्यांच्या विस्तारावरून करितात, असें पूर्वी लिहिलेंच आहे. शिवाय, ब्रिटिश राष्ट्र, रशिया आणि युनायूतेद स्तेत्स ह्यांसारखीं विस्तृत राष्ट्रेंच पुढील काळीं महत्त्वाचीं बनतील असेंही उघड आहे. तसेंच ह्या मोठाल्या राष्ट्रांपैकीं रशिया व युनायूतेद स्तेत्स ह्यांसारख्या राष्ट्रांचा कल व्यापाराचें संगोपन करण्याकडे दिसत असल्यामुळें लहान लहान राष्ट्रांची स्थिति हळू हळू अधिकाधिक भयंकर होत जाईल; कारण तीं राष्ट्रें आणि त्यांचा व्यापार त्यांच्या फार बलाढ्य अशा ह्या शेजाऱ्यांवर अवलंबून राहणार आहे.

वसाहतींमुळें इंग्लिशांचें सामर्थ्य वाढतें.

ह्यावर कित्येक असें म्हणतील कीं, एलिझाबेथ राणीच्या वेळीं जरी इंग्लंद अगदीं लहान होतें, तरी तेव्हां इंग्लिशांचें चांगलें चाललें होतें; तेव्हां पुन्हा कदाचित् तें तेवढेंच झालें तरी त्यांचें चांगलें कां चालणार नाहीं ? ह्यावर उत्तर इतकेंच आहे कीं, एलिझाबेथच्या काळीं इंग्लिशांचें विशेष चांगल्या रीतीनें चाललें होतें, असें त्यांच्या पूर्वजांना वाटत नव्हतें, व म्हणून राष्ट्राचा विस्तार करण्यासाठीं हरएक प्रकारची खटपट त्यांनीं केली. शिवाय लहान लहान राष्ट्रांना लहान मुलांची उपमा देतात; आणि अशा रीतीनें त्यांचा चांगलेपणा दर्शवितात. आतां लहान मुलें लहान मुलांत आहेत तोंपर्यंतच आनंदांत असतात; परंतु मोठ्या माणसांत जर तीं मिसळलीं, तर त्यांना इजा पोहोंचण्याचा फार संभव असतो. तेव्हां युनायतेद स्तेत्स हीं संस्थानें ज्याप्रमाणें परस्परांस चिकटून राहण्याचा प्रयत्न करितात, त्याप्रमाणेंच परस्परांस चिकटून राहण्याचा प्रयत्न करणें ब्रिटिश वसाहतींना व मुलखांना हितावह आहे, हें उघड आहे. स्वतंत्र झाल्यानें मोठमोठ्या राष्ट्रांकडून व्यापारासंबंधानें किंवा राजकीय संबंधानें त्यांना फार त्रास पोहोंचणार आहे; म्हणून ह्याचा विचार ब्रिटिश राष्ट्रांतील प्रत्येक वसाहतीनें व देशानें करणें अवश्य आहे.

परंतु कित्येक इंग्लिश लोक म्हणतील कीं, "इंग्लंदशीं संबंध ठेवण्याची इच्छा वसाहतींनीं करणें हें त्यांच्याच फायद्याचें आहे. पहा, आम्ही त्यांना

व्यापारासंबंधानें स्वातंत्र्य दिलें आहे; आरमार ठेवून आम्ही त्यांचें संरक्षण करितों; त्यांच्या हितासाठीं आम्ही युद्धें करितों; आणि इतकेंहि असून त्यांच्यापासून आम्हांस प्रत्यक्ष फायदा कोणताहि नाहीं. इतकेंच नव्हे, तर त्यांच्यामुळें आम्हांस वारंवार अडचणी येतात; व केव्हां केव्हां युद्धप्रसंगहि येतात. इतर राष्ट्रांना देखील त्यांच्या वसाहतींपासून व्यापारासंबंधानें इंग्लंडाप्रमाणेंच मोठाले फायदे झालेले आहेत. असें असतांहि त्या वसाहतींच्या संरक्षणाकरितां इंग्लंडापेक्षां त्यांनीं कमी खर्च केला आहे; इतकेंच नव्हे तर, त्या वसाहतींपासून मनुष्यांची व पैशांची मदतहि त्या राष्ट्रांनीं मिळविलेली आहे. तेव्हां आमच्या वसाहतींकरितां जर आम्हीं इतकें करीत आहों, तर त्या होऊनच आम्हांस धरून कां राहणार नाहींत ? ”

थोड्या वर्षांपर्यंत अशी स्थिति पुष्कळ अंशानें होती खरी. सर्व ब्रिटिश राष्ट्राचें संरक्षण करण्याचें ओझें इंग्लंडावरच होतें. प्रसंग येईल तेव्हां लढावें, नाहीं तर आपापला धंदा करावा, अशा प्रकारची वसाहतींची पुष्कळ फौज असे व त्यांच्या किनाऱ्यांच्या संरक्षणापुरतें थोडेंसें त्यांचें आरमारहि असे. ह्याशिवाय प्रत्यक्ष इंग्लंडास म्हणून त्यांची मदत मुळींच नसे. परंतु आतां हा सर्व प्रकार बदलला आहे. ह्या वसाहतींची मदत इंग्लिशांनीं मागितली नसतांहि त्यांनीं विलक्षण उदार

वसाहतींपासून त्यांना लष्करी मदत होते.

वृद्धीनें एका युद्धांत इंग्लिशांस उत्तम प्रकारची मदत करण्याची इच्छा प्रदर्शित केली. वास्तविक रीतीनें पाहिलें असतां ह्या युद्धाशीं त्यांचा कांहींच संबंध नव्हता; ब्रिटिश राष्ट्रांत त्या मोडतात, एवढाच काय तो त्यांचा संबंध. अशा प्रकारचें उदारपणाचें उदाहरण इतिहासांत सांपडणें फार कठीण. ह्यांपैकीं एका वसाहतीच्या मदतीचा इंग्लिशांनीं स्वीकारहि केला. ही वसाहत न्यू साउथ वेल्स होय. तांबड्या समुद्राच्या किनाऱ्यावर लढाई सुरू असतां इंग्लिश शिपायांबरोबर ह्या वसाहतींतील इंग्रज लोक त्यांच्याप्रमाणेंच निकरानें लढले आहेत. ह्यापुढें जेव्हां जेव्हां एखाद्या राष्ट्राच्या मनांत इंग्लंदावर हल्ला करण्याचा विचार येईल, तेव्हां तेव्हां इंग्लंद म्हणजे युरोपांतील वायव्य दिशेकडील एक लहानसें बेट, असें समजून हल्ला करून उपयोग नाहीं, तर पृथ्वीवरील लोकसंख्येच्या $\frac{1}{5}$ लोकसंख्या ज्या राष्ट्रांत. आहे, त्या राष्ट्राशीं लढावयाचें आहे, असें समजून त्यानें चाललें पाहिजे.

शेवटीं, ह्या वसाहती इंग्लिशांच्या हातून गेल्या असतां काय परिणाम होईल, ह्याची कल्पना करूं.

वसाहतींबरोबरचा इंग्लिशांचा व्यापार बुडाला असतां होणारे परिणाम.

ब्रिटिश वसाहती हीं जर तितकीं परकीय राष्ट्रें असतीं, तर त्यांच्यांशीं इंग्लंदचा जितका व्यापार असता, त्यापेक्षां त्या त्यांच्या ताब्यांतील वसाहती असल्यामुळें हल्लीं जास्त व्यापार चालत आहे. म्हणून त्या

इंग्लंदच्या हातून गेल्यानें ब्रिटिश "**व्यापाराचा ऱ्हास**" होणार आहे. "व्यापाराचा ऱ्हास" असें म्हट-ल्याबरोबर जी भयंकर स्थिति मनांत येते, त्याहून अधिक भयंकर स्थिति दुसऱ्या कोणत्याहि गोष्टीनें मनांत यावयाची नाहीं. ब्रिटिश व्यापाराचा ऱ्हास झाल्यानें इंग्लंदांतील गिरण्या बंद पडतील, पदार्थांच्या किमती वाढत जातील आणि जिकडे तिकडे लोक दुःखी व असंतोषी होऊन त्यांतून सुटका होण्याचेहि उपाय राहणार नहींत.

वसाहती निरंतर ताब्यांत कशा राखाव्या.

ब्रिटिश वसाहतींची स्थिति काय आहे व त्या त्यांनीं आपल्या ताब्यांत कां राखिल्या पाहिजेत ह्याविषयीं थोडक्यांत येणेंप्रमाणें हकीगत झाली. "**त्या त्यांनीं ताब्यांत कशा राखाव्या**" ह्याविषयीं एक दोन गोष्टी आतां सांगावया-च्या आहेत. अनेक देश जर केवळ **राजकीय संबं-धानें एकत्र** असतील, व त्या सर्वांमुळें जें एक राष्ट्र बनतें त्या राष्ट्राविषयींचा खरा **अभिमान** जर त्यांच्या ठिकाणीं नसले, तर नुसत्या राजकीय संबंधाच्या त्यांच्या ऐक्याची कांहींच किंमत नाहीं असें म्हणण्यास, गत्यवाय नाहीं. ब्रिटिश राष्ट्र हल्लीं दोन्ही दृष्टीनें एकत्र आहेच; म्हणून तें एकत्र कसें करावें, हा प्रश्न आपणां-पुढें हल्लीं नाहीं; तर त्याचें ऐक्य कायम कसें राखावें, हा आहे. हें ऐक्य कायम राखणें ही गोष्ट, इंग्लंदांतील लोकांच्या वर्तनावर मुख्यत्वें अवलंबून आहे, असें म्हण-

ण्यास हरकत नाहीं. वसाहतींपासून त्यांना मागें फायदा झालेला आहे, हल्लीं होत आहे, आणि पुढें ह्याहूनहि अधिक होण्याचा संभव आहे. तर मग ज्या मित्रापासून ह्याचप्रमाणें तिन्ही काळीं फायदा होतो, अशा मित्राला ज्या रीतीनें वागविणें योग्य होईल, त्याच रीतीनें ह्या वसाहतींनाहि इंग्लिशांनीं वागविलें पाहिजे; ज्या गोष्टी केल्या असतां त्यांचीं मनें क्षुब्ध होतील त्यांचा अत्यन्त तिरस्कार केला पाहिजे; वसाहतींचें जें कल्याण तेंच आपलेंहि कल्याण, असें त्यांनीं स्पष्टपणें समजलें पाहिजे; आपल्याबद्दल पूज्यबुद्धि वसाहतींनीं प्रदर्शित केली असतां त्याजबद्दल त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन केलें पाहिजे; इंग्लिशांस मदत करण्याची इच्छा त्यांनीं दर्शविली असतां त्या प्रसंगीं त्या मदतीची जरी विशेष आवश्यकता नसली तरी पुढील काळावर नजर देऊन त्यांच्या मदतीबद्दल आपली संमति इंग्लिशांनीं त्यांना प्रदर्शित करण्याची, सावधगिरी ठेविली पाहिजे; आणि इतक्या सर्व गोष्टी जोंपर्यंत इंग्लिश लोक करीत आहेत, तोंपर्यंत इंग्लिशांपासून स्वतंत्र होण्यासाठीं वसाहती आपण होऊनच प्रयत्न करावयास लागतील, अशी भीति बाळगण्याचें त्यांना कांहींच कारण नाहीं.

**समाप्त.**

# पुस्तकावरील अभिप्राय.

आपल्या पुस्तकाचा बराच भाग वाचून पाहिला. एकंदरीनें भाषांतर सुरेख झालें आहे. पुस्तक आश्रय देण्यास अगदीं योग्य आहे.

( सही ) **बळवंत रामचंद्र सहस्त्रबुद्धे, बी. ए.**
एज्युकेशनल इन्स्पेक्टर, दक्षिण भाग.

" I have gone through a considerable portion of your book. The translation, on the whole, is very well done. The book fully deserves patronage. "

( Sd. ) B. R. Sahasrabudhe, B. A.
Educational Inspector, S. D.

" आपलें भाषांतर सरळ व सुबोध झालें आहे. एकंदरींत आपलें पुस्तक संग्राह्य आहे, याबद्दल कांहीं संशय नाहीं. "

( सही ) **विष्णु मोरेश्वर महाजनि, एम्. ए.**
एजुकेशनल इन्स्पेक्टर, वऱ्हाड.

" Your translation is simple and in-

telligible. Your book undoubtedly is worth having."

( Sd. ) V. M. Mahajani, M. A.
Educational Inspector, Berar.

I have gone through the proof-sheets of your work. I am glad to say that the translation is intelligible and simple. You have selected a useful book for your translation. Marathi readers ought to patronize your work more than translations of novels.

( Sd. ) C. V. Vaidya, M. A. L. L. B.
Prant Judge, Ujjain.

In returning the 3rd. Vol. of your Manuscript Translation of " Our Colonies & India, " I am glad to say that I have gone through it, and found it very instructive and interesting at the same time. The style is plain and pure, and is sure to attract a large number of the Marathi readers. The subject is grand and most instructive, and as it is intimately connected with the rise and prosperity of our rulers, it is quite necessary that the book, which treats of it, must be within the reach of all the Marathi readers.

The merits of the book shall speak for themselves. In fine, your attempt is laudable, and your translation will be a very useful and valuable addition to Marathi literature.

( Sd. ) R. V. Gadre, B. A.
Dy. Edl. Inspector, Thana.

पुस्तक उत्कृष्ट झालें आहे.

( सही ) निळकंठ विनायक छत्रे, बी. ए.
एल. सी. ई.
डेप्युटि एज्यु. इन्स्पे. नाशिक.

तुमची भाषा साधी सुबोध आहे. अशीं पुस्तकें मराठींत भाषांतर झालीं असतां फार उपयोग होईल, असें माझें मत आहे. पुस्तक तयार झालें म्हणजे एक प्रत माझेकडे पाठवावी. मी आनंदानें विकत घेईन. आपल्या पुस्तकास लोकाश्रय चांगला मिळेल, असा मला भरंवसा आहे.

( सही ) आणणाजी रामचंद्र अत्रे. बी. ए.
डेप्युटि एज्यु. इन्स्पे. अहंमदनगर.

I have gone through a considerable portion of your manuscript copy of "Our Colonies & India." The style is easy and simple, and the Marathi reading public ought to feel highly obliged to you for giving them an easy access to such a store of useful and instructive information as your book contains on questions of the greatest importance. I trust that your book will be a very valuable addition to the vernacular literature, and that it deserves the fullest patronage from those for whom it is intended.

( Sd. ) S. K. Bhagwat, B. A. L. L. B.

I have read a considerable portion of your हिंदुस्थान आणि ब्रिटिश वसाहती. The story is told in an interesting manner, and will be of great use to Marathi readers, in as much as it gives the events in a connected series without puzzling the reader with a crowd of dates.

( Sd. ) B. V. Bhide, B. A.
Dy. Edl. Inspector, Khandesh.

I have gone over a considerable portion of " **हिंदुस्थान आणि ब्रिटिश वसाहती,** "— being an adaptation of Pro: Cyril Ransome's " Our Colonies and India. " The original is in the form of an address; but Mr. Natekar has done well in giving it the form of a narrative in Marathi. On the whole, the work has been fairly well done; and as to the importance of the subject to us all, and especially to pure Marathi readers, there can be no two opinions on the subject. I trust, therefore, that the book will be largely patronized by the public.

(Sd.) Narayan L. Phadke, B. A.
First Asstt. B. J. High School, Thana.

---

वि. वि. रानसमकृत " कॉलनीज ऍन्ड इंडिया " पुस्तकाच्या लेखी भाषांतराची प्रत आपण मजला वाचण्याकरितां दिली, त्यांतील बरेच भाग मीं वाचून पाहिले; व कित्येक ठिकाणीं मुळाशींहि तें ताडून पाहिलें. सदर पुस्तक हें **प्रोफेसर सीलीच्या** " Expansion of England " नांवाच्या पुस्तकाचें थोडक्यांत सार आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. भाषांतराची भाषा सोपी व सरळ आहे, व शुद्ध मराठी वाचकांस हें इंग्रजीचें

भाषांतर आहे, असें वाटणारें नाहीं. **सीलि** ह्यांच्या पुस्तकाचें भाषांतर माझ्या हातून झालें असल्यामुळें त्याच विषयावर हें पुस्तक फार चांगलें झालें आहे, असें मला म्हणावें लागतें. आज आपल्या देशास अशाप्रकारच्या लेखांची अत्यंत आवश्यकता आहे, हें कोणीहि कबूल करील. ह्यावरून आपलें पुस्तक चांगल्या आश्रयास पात्र आहे, व तो आश्रय आपणांस मिळेलहि, अशी मला आशा आहे. कळावें, लोभ करावा, हे विनंति.

(सही.) **गोविंद सखाराम सरदेसाई. बी ए.**
गायकवाड राजकुमारांचे शिक्षक.

---

I have read a portion of your translation of Ransome's well-known work on India. From the few pages, kindly sent by you for my perusal, the translation appears to be well executed; and I make no doubt that it would be a welcome addition to Marathi literature, and such an agreeable relief from the dull monotony of trashy novels which seem to form the main bulk of the modern day Marathi Literature.

Wishing your new enterprize every success.

(Sd.) Gopal V. Panandikar.
Dy. Edl. Inspector, Kolaba.